

म. ग्रं. सं. ठाणें
विषय— चरित्र
सं. नं. ७१६

REFBK-0008916

# शाहीर हैबती

# शाहीर हैबती

## चरित्र आणि काव्य

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २०२९४ वि:
क्रमांक ७९६ नों: दि:

लेखक व संग्राहक

वि. कृ. जोशी

द. दि. परचुरे

★

संपादक

राजाभाऊ थिटे

REFBK-0008916

व्हीन ... २

प्रथमावृत्ति १९५६ ]　　[ किंमत १। रुपया

प्रकाशक :
**राजाभाऊ थिटे**
संपदा प्रकाशन,
३६० नारायण, पुणें २.

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
**चिं. ग. वझे**
साधना प्रेस,
३७४ शनवार, पुणें २.

२०२९४ 
५०१६ दिः २९।८।५४

# प्रस्तावना

"शाहिरी वाङ्मय म्हणजे लावणी-तमाशा. कांहींतरी अश्लील नि आचकट-विचकट. अर्थात् 'सभ्य' लोकांना अगदीं वर्ज्य!" अशी शाहिरी वाङ्मया-संबंधींची समजूत अगदीं अलीकडच्या काळापर्यंत होती. शाहिरी परंपरेंतील शेवटचा तेजस्वी तारा पठ्ठे बापूराव याला समाजाकडून बहिष्कृत होऊन अन्नान्न-दशेंत मरण पत्करावें लागलें. केवळ पंधरा वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. परंतु शाहिरी वाङ्मयासंबंधींचा जुनाट दृष्टिकोन आतां पालटला असून त्या वाङ्मयाला आतां नामाचेंच नव्हे, तर मानाचेंहि स्थान प्राप्त झालें आहे. होनाजी बाळा आणि रामजोशी चित्रपटांचे हीरोहि बनले, व त्यांनीं असें दाखवून दिलें कीं, शाहीर हे जितके रसिक तितकेच विचारवंतहि होते.

पुणें विद्यापीठातर्फे आंखण्यांत आलेल्या बहिःशाल व्याख्यानमालेंतून असा प्रश्न निघाला कीं, शाहिरी वाङ्मयाचा मुख्य विषय कोणता? कांहींनीं एका टोंकाला जाऊन असें प्रतिपादन केलें कीं, शृंगार (नि तोहि षंढांचा शृंगार) हाच शाहिरी वाङ्मयाचा मुख्य विषय होय. अर्थात् हें वाङ्मय उपेक्षितच राहावें व विस्मृतीच्या गर्तेंत गाडलें जावें. या नीतिशत्रुवांच्या विरुद्ध टोंकाला जाऊन कांहींनीं असा अट्टाहास धरला कीं, शाहिरी वाङ्मयांत जो शृंगार आहे तो वास्तविक शृंगारच नव्हे. शाहिरांनीं वापरलेल्या प्रत्येक शृंगारिक शब्दाचा व त्यांनीं वर्णन केलेल्या प्रत्येक शृंगारिक चेष्टेचा आध्या-त्मिक अर्थ लावण्यांत येऊं लागला. कोणत्याहि वादांत अंधपक्षाभिनिवेश सत्याला मारकच ठरतो. तेंच या वादांत झालें. शाहीर शृंगारिक वाङ्मय लिहीत होते हें खरें, पण ते अनीति पसरवीत होते, असें मात्र नव्हे. आपल्या वाङ्मयांत त्यांनीं ठिकठिकाणीं नीतीचे पाठ दिले आहेत, पातिव्रत्याची तरफदारी केली आहे, धर्माची शिकवण दिली आहे, कोणताहि विषय लोकांचें मनोरंजन करून कसा मांडावा, ही हातोटी त्यांना साधलेली असल्यामुळें त्यांनीं अध्यात्माचीहि मांडणी शृंगारिक रूपकांच्या सहाय्यानें केली. या रूपकांचा गर्भित अर्थ ध्यानांत न घेतल्यामुळें कांहीं जणांची दिशाभूल झाली, तर

वरवरचा अर्थ शाहिरांनीं कोणत्या हेतूनें श्रोत्यांपुढें ठेवला होता याचा विचार न केल्यानें इतरांची दिशाभूल झाली.

शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास करीत असतांना हैबतीबुवा घाटगे या अज्ञात आणि उपेक्षित शाहिराचीं कवनें पाहण्यांत आलीं. आजपर्यंत लोकांसमोर आलेल्या शाहिरांपेक्षां हा शाहीर कांहीं निराळाच आहे, असें दिसून आलें. इतकेंच नव्हे, तर शाहिरी वाङ्मयाच्या द्वारा अध्यात्माचा किती जोरदार प्रचार करतां येतो याचें उदाहरण म्हणून हैबतीचें कवन उल्लेखनीय वाटलें. तमाशा आणि लावणीविषयींचें आमचें पुस्तक यानंतर लवकरच प्रसिद्ध होणार आहे. परंतु हैबतीच्या असंख्य चाहत्यांनीं या पुस्तकाची मागणी केल्यावरून त्यांच्या इच्छेनुसार हें पुस्तक प्रथम प्रसिद्ध होत आहे. शारदेच्या मंदिरांतील या उपेक्षित मानकऱ्याचें हें चरित्र व त्याचीं कांहीं कवनें प्रकाशांत आणतां आल्याबद्दल आम्हांस आनंद होत आहे.

या पुस्तकासंबंधींचें साहित्य जमविण्यास पुष्कळ परिश्रम करावे लागले व त्या कामीं औंधचे श्री. मधुकर इनामदार, रहिमतपूरचे दादूमिया व पुसेसावळीचे श्रीपतिबुवा यांचें सहाय्य झालें. 'सकाळ' संस्थेंतील श्री. राजाभाऊ थिटे यांनीं संपादनाचें व प्रकाशनाचें काम हातीं घेतलें. या सर्व मित्रांचे आम्ही आभारी आहोंत.

दादर, मुंबई,
वर्ष प्रतिपदा, शके १८७८

विनायक कृष्ण जोशी
दत्तात्रय दिनकर परचुरे



शाहीर हैबतीबाबा घाडगे



पुसेसावळी येथील हैबतीबाबांचें समाधिस्थान

दिवंगत व हयात
शा हि रां चे
स्मृ ती स

# प्रकाशकाचे दोन शब्द

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालें. सरकार आपलें झालें. त्यामुळें कलावंतांना थोडाफार राजाश्रय मिळूं लागला. अशा मागासलेल्या कलांपैकीं तमाशा ही एक आहे. तमाशावाङ्मय अश्लील व शृंगारिकच असतें, असा समज. पण त्यांतहि अध्यात्म आहे व अशा वाङ्मयाची आज जरूरी आहे. अशा कालांत माझे मित्र व तमासगिरांचे आश्रयदाते श्री. अहमदशेठ तांबे यांचा माझा परिचय झाला व मला या लोकनाट्याची व वाङ्मयाची गोडी वाटूं लागली. हें अप्रसिद्ध वाङ्मय पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावें व जतन करावें, अशी मनीषा माझ्या मनांत निर्माण झाली. तमासगिरांच्या जीवनाचा अभ्यास करावयास मिळाल्यामुळें आणि श्री भाऊ बापू नारायणगांवकर, श्री. दत्तोबा तांबे शिरोलीकर, श्री. बाबूराव मोकाशी, पुणेंकर व अनेक नामवंत तमासगिरांचा सहवास लाभल्यामुळें मला ही कल्पना सुचली. पुण्यास १९५५ मध्यें पहिली महाराष्ट्र तमाशा परिषद भरली होती, तींतूनहि प्रेरणा मिळाली व त्याच वेळीं प्रा. द. दि. परचुरे व श्री. वि. कृ. जोशी या लेखकद्वयाचा परिचय झाला. त्यांनीं सातारा जिल्ह्यांतील पुसेसावळीचे दिवंगत शाहीर हैबतीबाबा घाडगे यांच्या वाङ्मयाचा संग्रह करून हें पुस्तक सिद्ध केलें. हें पुस्तक माझी कन्या कु. संपदा हिच्याच नांवानें 'संपदा प्रकाशन'तर्फे प्रकाशित करण्यास मला आनंद होत आहे.

'संपदा प्रकाशना'च्या या पहिल्या पुस्तकाच्या कामीं लेखकद्वयाचे, तसेंच ब्लॉक तयार करून देणारे श्री. ताकवले, 'साधना प्रेस'चे व्यवस्थापक श्री. चिं. ग. वझे व प्रुफें तपासून देणारे श्री. द. शं. खामकर यांचा मी फार आभारी आहें. पुस्तक विकण्याची एकमेव जबाबदारी व्हीनस बुक स्टॉलचे श्री. अनंतराव लिमये यांनीं स्वीकारून माझी जबाबदारी संपूर्ण उचलली, याबद्दल मी त्यांचाहि आभारी आहें. यानंतर 'संपदा प्रकाशना'तर्फे कै. दगडूबाबा तांबे शिरोलीकर यांचें चरित्र प्रसिद्ध करण्याचा संकल्प या वर्ष-प्रतिपदेच्या मुहूर्तावर करून, तो पार पाडण्यास श्रीसोमेश्वरमहाराजांचा आशीर्वाद मागून हे दोन शब्द पुरे करतों.

वर्षप्रतिपदा, शके १८७८ } —राजाभाऊ थिटे

८०९६
ग्रं. [illegible]
वि
नों: दि:

# प्रकरण १ लें

# हैबतीचा काल

पेशवाईच्या उत्तरकालांत जे अनेक शाहीर चमकून गेले त्यांपैकीं हैबतीबुवा हा एक होय. शाहिरांच्या शृंगारिक लावणी वाङ्मयाला इ. स. १७६० च्या पुढें बहर आला व तो निदान इ. स. १८४० पर्यंत तरी टिकला. लावणी वाङ्मयांतील शृंगार पायरीपायरीनें अधिक उघड आणि ओंगळ होत होता. लोकांना शृंगारानें डबडबलेलें वाङ्मय हवें होतें व शाहीर तें खुल्या दिलानें पुरवीत होते. परंतु अशा रीतीनें शाहिरांच्या लेखणीचा संयम जो एकदां सुटला तो समाजांतील साऱ्या पवित्रतेला भ्रष्ट केल्यावांचून थांबला नाहीं. शाहिरांच्या उच्छृंखल लेखणीनें देवदेवतांचें पावित्र्यविडंबन केलें, सतीसाध्वींना बाटविलें, विवाहितांना आणि कुमारिकांना चव्हाट्यावर मांडून भ्रष्ट केलें. समाजाला लागलेल्या या घसरगुंडीपासून त्याचें रक्षण कसें होईल याची चिंता वाटावी, असा काल पेशवाईच्या अखेरीस आला होता. परंतु—

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥

या भगवन्तांच्या उक्तीप्रमाणें, हैबतीचा जन्म १७९४ मध्यें झाला व सबंध जन्मभर तो या उच्छृंखल वाङ्मयाविरुद्ध लढला. शाहिरी वाङ्मय हीन दशेकडे जात असतां त्याची अधोगति थांबविण्याचें महान् कार्य या सत्कवीनें केलें, म्हणून हैबतीची योग्यता अवतारी पुरुषासारखी वाटते. हैबतीबुवासारखा शाहीर त्या काळीं होऊन गेला नसता तर शाहिरी वाङ्मय कोणत्या थराला जाऊन पोंचलें असतें याची कल्पनाच करवत नाहीं. शाहिरी वाङ्मयाच्या शृंगारिक कामुकतेचा नगारा चौफेर झडत असतांना आध्यात्मिकतेची टिमकी एका कोपऱ्यांत बसून धैर्यानें आणि चिकाटीनें वाजवीत राहण्याचें कार्य हैबतीनें जन्मभर केलें. या दृष्टीनें महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनावर आणि मराठी वाङ्मयावर हैबतीनें महदुपकार केले आहेत. अनेक दृष्टींनीं हैबतीच्या अपरंपार कवनसागराचें अवगाहन केलें असतां त्याच्या विशिष्ट योग्यतेचा एकहि कवि अथवा शाहीर मराठी साहित्याला कधींच लाभलेला नाहीं, असें म्हणावें लागतें. हैबतीनें केलेल्या कार्यामुळेंच तो 'शाहीरश्रेष्ठ' व 'कलगी-सम्राट्' अशा नांवांनीं ओळखला जाऊं

लागला. अशा या श्रेष्ठ कवनकाराच्या चरित्राविषयीं व त्याच्या कवनांविषयीं फारशी माहिती आजपर्यंत प्रसिद्ध झाली नाहीं. ती माहिती लोकांसमोर मांडण्यासाठींच प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

हैबतीचा जन्म ज्या काळांत झाला त्या काळाचा प्रथम विचार केला पाहिजे. १७५८ मध्यें ज्या वेळीं मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेवर रोवला गेला त्या वेळीं मराठ्यांचा उत्कर्ष कळसास पोंचला होता. त्यापूर्वींच शाहिरी वाङ्मयाचा जन्म झाला होता. परंतु तें वाङ्मय आध्यात्मिक स्वरूपाचें होतें. पोवाड्यांच्या स्वरूपाचें कीर्तिकाव्यहि शाहीर निर्माण करीत होते, परंतु शृंगारिक लावणीचा जन्म अजून झाला नव्हता. शृंगारिक लावणीचा जन्म अनंत फंदी (१७४४–१८१९) या शाहिरांच्या काळीं झाला. त्या वेळीं मराठे शिपाईगड्यांची स्थिति "चार महिन घरीं नि आठ महिने मुलखावरी" अशी होती. मुलूखगिरी करण्यासाठीं मोहिमेवर गेलेल्या शिपायाची कामवासना अतृप्त होती. त्याच्या घरीं सासुरवासाच्या बंधनांत राहिलेली पत्नी विरहानें झुरत होती. अशा काळीं विरह-शृंगार आणि संभोग शृंगार यांना वाहिलेली लावणी उदयास आली आणि थोडक्याच वर्षांत लोकप्रियतेच्या बाबतींत अग्रस्थान पटकावून बसली. शृंगारिक लावणीचा उदय आणि उत्कर्ष ही मराठी वाङ्मयांतील एक अत्यंत रोमहर्षक अशी घटना आहे. कोणताहि वाङ्मयप्रकार इतक्या झपाट्यानें उदयास येऊन उत्कर्ष पावलेला नाहीं. लावणी वाङ्मयाच्या या परंपरेंत एकापेक्षां एक वरचढ असे शाहीर निर्माण झाले. अनंत फंदीनंतर होनाजी, परशुराम, रामजोशी, प्रभाकर आणि सगनभाऊ असे प्रतिभावान् शाहीर चमकून गेले. यांनीं आपल्या शृंगारिक लावणीनें महाराष्ट्र रसिकांस अक्षरशः वेड लावलें. या पूर्व शाहिरांना उदार राजाश्रयहि मिळत गेला. राजदरबारांत त्यांचा सन्मान होऊं लागला. ठिकठिकाणच्या राज्यांत जाऊन ते 'दिग्विजय' करूं लागले. 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें तमाशाचे फड ठिकठिकाणीं रंगूं लागले.

१७६१ मध्यें पानिपतच्या लढाईंत मराठ्यांच्या पाडाव झाल्यानंतर मराठी साम्राज्य घसरगुंडीस लागलें. सवाई माधवराव आणि नाना फडणवीस यांनीं आपल्या कर्तृत्वानें आणि मुत्सद्देगिरीनें या साम्राज्यास टिकविण्याचा कांहीं काळ जोरदार प्रयत्न केला हें खरें, परंतु पानिपतानंतर मराठ्यांना पूर्वींची स्थिति कधींच प्राप्त झाली नाहीं. एखाद्या घराला भूकंपाचे मोठमोठे धक्के बसावे,

त्याचा पाया हादरला जावा, परंतु तें घर कोसळूं मात्र नये, अशी अवस्था मराठी साम्राज्याची झाली होती. या मोडकळीस आलेल्या घराची डागडुगी करण्याचा प्रयत्न सवाई माधवराव, नाना फडणवीस, बारभाई इत्यादिकांनीं केला. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. शेवटीं तर नादान घरबुडव्यांच्याच हातीं सारी सत्ता आली, व त्यामुळें १७६१ च्या पुढील पांच-पन्नास वर्षांत मराठी साम्राज्य लयाला गेलें.

या सर्व घटना होत असतां लावणी-वाङ्मय कोणत्या स्थित्यंतरांतून जात होतें याचा विचार आपणांस करावयाचा आहे. ज्या लावणींत शूरवीराचा मर्दानी शृंगार आणि सतीसाध्वीचें पवित्र प्रेम वर्णन केलें जात होतें त्या लावणींत ओज आणि जिवंतपणा होता. पुढील काळांत शृंगाराला वीरश्रीची पार्श्वभूमि राहिली नाहीं. तो शृंगार नेभळट पुरुषांचा आणि दुश्चरित्र स्त्रियांचा होऊन बसला. पावित्र्ययुक्त प्रेम नाहींसें होऊन स्वैराचाराचें आणि नीतिबाह्य कामुकतेचेंच रसभरीत वर्णन लावणीकार करूं लागले. वास्तविक ज्या ज्ञानेश्वर-एकनाथ-तुकारामादि संतांनीं महाराष्ट्राला सुषुप्तींतून जागें केलें, आपल्या तेजस्वी वाणीनें स्वधर्मजागृति घडवून आणली आणि स्वराज्यसंस्थापनेला चेतना दिली त्यांच्याच वाङ्मयावर हक्क सांगणाऱ्या या शाहिरांनीं त्या संतमहात्म्यांच्या तत्त्वज्ञानाला हरताळ फासला. अशा या सामाजिक अधोगतीच्या काळीं महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दलची चिन्ता तत्कालीन विचारवंतांना वाटली नसेल असें नाहीं. परंतु लावणी-वाङ्मयाची पकडच एवढी जबरदस्त होती कीं, तिच्यांतून समाजाला सोडविण्याचें कार्य अत्यंत दुष्कर होतें.

त्या वेळच्या देशस्थितीचें वर्णन परशुरामानें असें केलें आहे—

कथा कीर्तनाची लागेना गोडी। ऐके डफगाम्याची झोडी

...............

शाल दुशाले फार दौलतिच्या धुंदींत।
मोठमोठाले उंच पोशाख विनविले कंदींत।
गेले दिवस आनंदाचे जिलब्या बुंदींत ॥
शाहाण्यांचें हें शहाणपण न चाले या संधींत।
ज्या नामी नामी वस्ता गंजिल्या रद्दींत !
चाल सख्या पाय फुंकून मार्ग नीट शोधीत।
यापुढें कठीण काळ थोडक्या अवधींत

पेशवाईचा शेवट झाला त्या वेळच्या दुःस्थितीचें वर्णन रामजोशी यांनीं केलें आहे—

गुणा न कुणी मना येईल तसें जनासी जन वंचिती। धनानिमित्तें मरती किति गरती, धरून यवन अन्न चारिती। आठ दिसांमधिं पठाण तिंदां लुटावया धांवति। उठावयाला तकवा नाहीं बकवा सारा, धणि चाकर झुंजति। दार वित्त घरदार दिलें तरि मार चुकेना अति। फार वदुं मी काई, वधिल्या हो गाई, बाटविल्या द्विजसती। चिका आंत ज्या निका घडविल्या पिका शिंगळ लाविती। विकावया त्या नेल्या किति, मेल्या अबला, उरल्या जन चुंबिती। काय समय हा लया रुद्र करिल दया।

................

काळानें देश यापरी केला रोडका ॥

त्या वेळच्या शाहिरांनीं प्रत्यक्ष पाहून केलेलें हें वर्णन वस्तुस्थितीवर प्रकाश पाडणारें आहे. याच वर्णनांतील अनुरोधानें इतर बाबतींत काय स्थिति होती, याचीहि कल्पना करता येते.

एका सुंदरीला अनंत फंदी सूचना देतात—

फार चांगली तूं जर माहित कळलिस कानोकानाला। तर तुला भलताच उडविल चुना न लागेल पानाला ॥

होनाजी तर एका सौंदर्यवतीला म्हणतात—

लखलखाट चकचकाट जैसे दुकान बोहऱ्याचें।

एका युवतीचें वर्णन करतांना प्रभाकर म्हणतो—

लागले शेठ सावकार हजारों भजनीं।
घालितात घिरट्या चतुर पुरुष दिनरजनी।
घरदार विसरले लक्ष लागेना पूजनीं।

या सर्व वर्णनामागें "यावज्जीवं सुखं जीवेत्" असें विलासी थाटाचें उमर-खय्यामी तत्त्वज्ञान होतें. आपल्या आणि आपल्या देशाच्या भवितव्याबद्दल बेफिकीर होऊन त्या वेळचे लोक सुखांत आणि चैनींत मग्न झालेले होते अनंत फंदीसारखे कीर्तनकारहि म्हणत होते —

बोल गड्या मशीं नरम, नको होऊं गरम, पोकळ भरम कशाला? ज्वानी जाईल सरून। भर गेल्यावर पोर होईल, मग रंग येईना असा फिरून ॥ चालू

दे नित्य भेटीचा ठकोर । उमज मनीं कर घडा, वृद्धपणीं जोबन जातिल जिरून। पंचविशीवर झुकली म्हणजे बैस माळ हातीं धरून ॥

होनाजी बाळहि कांहीं मागें नव्हते. त्यांनींहि म्हटलें—

मन आमुचें तुजवर बसलें । येतां जातां भेटत उभी राहून द्वारीं। सोड मनांतिल अढी, घडी ही लाखाची जाती। पहा शोधून अंतरीं, शेवटीं स्वरुपाची होईल माती । रूप ईश्वरी म्हणुनियां लोक तुला चाहती। त्यांत सवड पाहून आम्हांला दे सोबत एक रात्रीं। बसून जरा एकांतीं भिडूं दे छातीशीं छाती।

शाहिरांची मजल एवढ्यावर न थांबतां याहून पुष्कळ पुढें जातें एवढेंच येथें सांगितलें असतां पुरें होईल.

पुणें शहर मराठ्यांची राजधानी असल्यामुळें नाना देशांचे प्रवासी कामकाजा-निमित्त, किंबहुना केवळ पुणें पाहण्यासाठींदेखील, येथें येत असत. मग त्यांतल्या कांहीं उमद्या सरदारांवर थोरामोठ्यांच्या स्त्रियांचेंहि मन बसे. एक स्त्री मुशाफिराला निर्भयपणें सांगते कीं —

अहो मुशाफिरा चातुरा, मनिं खरखरा नको धरूं कांहीं। कुरबान प्राणाची करीन तुमच्या पायीं ॥ तुम्ही चला हो माझ्या घरीं। रहा वरल्या माडीवरी। बसूं आपण पलंगावरी। करूं मौजा नाना परी ॥

एका घरांतील वातावरण प्रभाकरानें रंगविलें आहे—

वडील जाऊ घरांत आहे ती परपुरुषाला भजते। रात्रीं वैरिण जागृत निजते भांग सरळ सळसळीत करून न्हाणावली जशी सजते। आपण भलत्यांचीं घरें पुजते। बरें पण आपलें पाहून दूर उभी राहून कुजबुजते। उभयतां धरावया धजते॥ अहो तुम्हांसारखा भ्रतार मजला हवा। दुधखुळा बुळा पति आवडे ना ह्या जिवा। म्हणुन मैत्र म्यां सुरेख केला नवा॥ काय करूं वैभवास देखत मी नार नवी तरणी। सदां सादर तुमच्या चरणीं ॥

अशा वातावरणांतील एक स्त्री लग्नाआधींच्या आपल्या प्रियकराला विसरली नव्हती. माहेरीं आल्यावर तिनें तें संधान पुन्हा जुळविलें. ती म्हणते—

फार मजकरितां रे सख्या खराब जाहलास। नाड बंदावर आजवर तूं व्रतस्थ राहिलास। ह्याच गोष्टीवर मी खुष, उठ चल जाऊं महालास। भोग आतां रस, घे बरी ही संधी सांपडली ॥

वीस दिवसांचा, आहे हुकुम माहेरीं राहण्याचा । बेत तदनंतर होईल सासरीं जाण्याचा । तोंवर तूं आपला सुखसोहळा पुरीव निजण्याचा । कार्य साधुन आब राखावा स्नेहानें शाहण्याचा ॥

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे "भताराआड लाड हे सर्व गोड" असें समजणाऱ्या ह्या स्त्रिया आहेत. मग अशा स्त्रियांपैकीं एखादी स्पष्टपणेंच आपल्या जाराला सांगतें कीं—

"आडकाठी तुला जिवलगा रे केली कुणीं । ये दिवसां नवऱ्यावाणी ।"

बरें, या सर्व बाबतींत पापपुण्याचें काय ? त्याहि बाबतींत या स्त्रियांनीं पुराणांचे दाखले पुराणांवरच उलटविले आहेत.

त्रासला जीव घरच्या दुहिला । तशामध्यें पतिराज नित्य उठून जातात कहिला । आपण तरी भर भोगा पहिला । नाहीं मागत धनद्रव्य टांक नको लावावा वहिला । घ्यावें सुख ऋतुवंत्या महिला । लेख असा आहे पद्म पुराणीं व्यासांनीं लिहिला ॥ असो पाप पुण्य सर्वही माझें मजकडे । तुम्ही अंग संग देऊन व्हावें पलिकडे । पुढें घडेल तसें घडो, या लौकर अलिकडे ॥

या सर्व उताऱ्यांवरून स्त्रियांची उच्छृंखलता कोणत्या थराला गेली होती हें दिसून येतें. "शीलभारवती कान्ता भजते कामपि श्रियम्" या वचनानुसार लज्जा हेंच प्रधानभूषण मानणाऱ्या आर्य स्त्रिया कोणत्याहि काळांत इतक्या अमर्याद झाल्या असतील असें वाटत नाहीं.

शाहिरांच्या पूर्वी दोनतीनशें वर्षें संतांनीं राधा-कृष्णाच्या लीला गौळणींतून व्यक्त केल्या, त्यांत त्यांनीं शृंगाराचा एखादा वळसाहि उगाळून घातला. परंतु सामान्य जनांना मोहविणाऱ्या 'रसराजा'चा आश्रय त्यांनीं एका ठराविक मर्यादेपलीकडे घेतला नाहीं. लोकांसमोर अध्यात्म ठेवणें हाच संतांचा प्रधान हेतु होता. परंतु पुढें शाहिरांनीं हा ताळतंत्र सोडला. फंदीबोवांपासूनच शाहिरांनीं श्रीकृष्णाला परमात्मा न समजतां एखाद्या 'स्टंट' सिनेमांतला 'हीरो' बनवून टाकला होता. श्रीकृष्णाला दिलेल्या या भूमिकेचा कळस रामजोशी यांच्या वर्णनांत पहावयास मिळतो.

किति गुलाल केशरि रंगें भिजविल्या । किति मानवती मदभंगें निजविल्या । किति देउन रतिसुख संगें रिझविल्या ॥ कारटा तुझा हा द्वाड यशोदेबाई । गरतिला गल्लिंत गांठुनि बुल्ली काढी । या वयांत भलतिच गोडी ॥ मेल्यानें

माझी सून नागवी केली । मुलगीचीं माझ्या कुचचूचुकें धरिलीं । मैनिची माझ्या साळू नुकतिच न्हाली । झोंबला तिला ग आई निथळत होती ओली । कां घालिना आई ब्हीण अपुल्या खालीं ।। मेल्यानें गोकुळ केलें छिनाल वाडा। बाटविल्या साऱ्या रांडा ।।

या गवळणींत कविरायांनीं काय म्हणायचें बाकी ठेवलें आहे ? देवदेवतांच्या भोंवतीं जें पवित्रतेचें कवच होतें तेंच ह्या शाहिरांनीं नाहींसें केलें आणि या पवित्रतेला त्यांनींच धक्का पोंचविल्यामुळें त्यांच्या श्रोत्यांच्याहि धार्मिक भावना खालावत गेल्या.

अशा या काळांत हैबतीचा जन्म झाला. समाजाची इतकी अवनति झालेली असतांना त्याला ख़रमरीत शब्दांत जागें करणाऱ्या प्रतापी पुरुषाची वाण भासत होती. हैबतीनें आपल्या कवनांनीं हें कार्य केलें.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।

असें आश्वासन देणाऱ्या भगवंतांचेंच कार्य त्यानें केलें असें म्हटलें पाहिजे. शिमगा जाऊन कवित्व राहावें, त्याप्रमाणें ऐश्वर्याचे दिवस गेले तरी त्या काळीं लागलेल्या सुखाची चटक सुटली नाहीं. दुष्टांपासून रक्षण करण्याचें जें भगवंतांचें अवतारकार्य तें त्या काळीं हैबतीनें केलें. त्यासाठीं त्याला जन्मभर झगडावें लागलें. अनीतीचें साम्राज्य सगळीकडे पसरलें असतां स्वधर्माकडे आणि स्वकर्तव्याकडे जनतेचें लक्ष वेधणारा निर्भय कवि या दृष्टीनें हैबतीच्या जीवनाला आणि कार्याला असाधारण महत्त्व आहे. आतां पुढील प्रकरणांत त्याच्या जीवनाकडे वळूं.

# प्रकरण दुसरें

# बालपण

हैबतीचा जन्म इ. स. १७९४ सालीं सातारा जिल्ह्यांतील खटाव तालुक्यांत डिकसळ येथें घाडगे घराण्यांत झाला. घाडग्यांचें घराणें हें मराठेशाहींतील एक उच्च घराणें समजलें जात असे. हैबतीची आई तर भोसले कुलांतीलच होती. यावरून घाडगे घराण्याच्या मोठेपणाची कल्पना करता येते. हैबती हा भोसले कुलांतलाच होय अशी एक समजूत आहे, परंतु ती त्याच्या आईच्या नांवावरून प्रसृत झाली असावी. हैबतीच्या घराण्याचें खरें नांव घाडगे हेंच होय. खटाव तालुक्यानजीक संस्थान फलटण येथें राहणारे रा. गोविंद रामचंद्र उपलेकर यांनीं लिहिलेल्या 'श्रीकृष्णदेवचरित्रां'त हैबतीची कांहीं माहिती येऊन गेली आहे. यांत रा. उपलेकर लिहितात कीं, "यांचें आडनांव 'घाडगे' असें होतें." अर्थात् लेखक जवळच्याच प्रांतांत राहणारे असल्यामुळें त्यांना ही माहिती जातीनें मिळाली असणें शक्य आहे, आणि म्हणूनच ती बऱ्याच अंशीं विश्वसनीय वाटतें.

हैबती दोन-चार वर्षांचा असतांनाच त्याचे वडील डिकसळहून निघून तेथून जवळच्र पुसेगांव-राजेगांव येथें राहण्यास आले. त्या ठिकाणीं राहून ते शेती करीत असत. हैबती सहा-सात वर्षांचा झाल्यापासून त्याच्याकडे गुराख्याचें काम आलें. गुरांना घेऊन रानांत जावें व त्यांना चरायला सोडून आपण कांहींतरी गुणगुणत बसावें, असा छंद हैबतीस पहिल्यापासून होता. अर्थात् हीं गाणीं 'गाई-गुरां'बद्दलचीं (गोपाळ-गीतें किंवा वेणु-गीतें) होतीं. त्या खेडे-गांवांत एका मराठ्याच्या मुलाला शिक्षण तें काय मिळणार ? म्हणून हैबती गुरें राखीत असतांना जें कवन करीत असे, तें कुणा शिक्षकाच्या स्फूर्तीनें अगर वाचनापासून मिळालेल्या स्फूर्तीनें तो करीत नसून स्वयंस्फूर्तीनेंच करी, हें स्पष्ट होय. गुरें राखणें हें त्याचें आवडतें काम होतें व त्यांत तो रमून जात असे. इतकेंच नव्हे तर, आपल्या कवनानें तो गाई-गुरांनाहि रमवीत असे. हैबतीच्या या कवनशक्तीची माहिती कुणालाहि नव्हती. खुद्द त्याच्या मातापित्यांनाहि तिची कल्पना नव्हती, त्यामुळें हें त्याचें आद्य कवित्व बरेंच दिवस अज्ञातच राहिलें. शिवाय असें कीं, हैबतीच्या या काव्य-स्फुलिंगाला चेतविणारा असा

कुणीहि त्या गांवांत नव्हता. त्यामुळें प्रारंभीं तरी हैबतीच्या काव्यगुणांची उपेक्षाच झाली. पुढें एक दिवस हैबतीनें मोठा धीर करून आपल्या आई-वडिलांच्या कानावर आपलें हें कवन घातलें. त्याचें तें प्रासादिक आणि रसाळ कवन पाहून तीं आश्चर्यानें थक्क झालीं व या आपल्या मुलाच्या ठिकाणीं कांहींतरी विशेष बुद्धिमत्ता आहे, अशी त्यांची खात्री झाली. इकडे हैबतीच्या चौकस बुद्धीचेंहि समाधान त्या खेडेगांवांत राहून होईना. आपल्या काव्याचें जेणेंकरून चीज होईल व तें वाढीस लागेल असें कांहींहि साधन आपल्या गांवांत नाहीं, हें त्याच्या बालबुद्धीनें ओळखलें. परंतु पुसेगांव–राजेगांवपासून आठ-दहा कोसांवर, सातार्‍याच्या वाटेवर कृष्णातीरीं असलेल्या त्रिपुटी गांवची ख्याति त्या वेळीं दूरवर पसरलेली होती. म्हणून आपण त्रिपुटीस रहायला जाऊं, असा बाल हट्ट हैबतीनें धरला. पुढील घटनांवरून हा त्याचा बालहट्टच त्याच्या प्रगतीचा पाया ठरला हें दिसून येईल. या दृष्टीनें पाहतां हैबतीला त्रिपुटीस जाण्याची इच्छा होणें व त्याच्या आईबापांनीं ती पुरविणें यामागें ईश्वरी संकेतच होता असें म्हटलें पाहिजे.

त्या वेळीं साधुसंतांचें स्थान म्हणून त्रिपुटीची ख्याति होती. अर्थात् धार्मिक दृष्टीनें तें पवित्र स्थान मानलें जात असे. तेथल्या साधुसंतांच्या संगतींत आपण गेलों असतां आपल्या काव्यशक्तीचें चीज होईल असें हैबतीला साहजिकपणें वाटलें व त्यानें तसें बोलून दाखवून आईबापांचें मन त्रिपुटीस जाण्याकरितां वळविलें, हाच हैबतीचा विशेष होय.

त्रिपुटीस होऊन गेलेले एक संत श्रीदेवनाथमहाराज यांच्या कवितासंग्रहांत त्रिपुटीच्या माहात्म्यासंबंधीं कांहीं उल्लेख सांपडतात, ते असे —

कृष्णातीरीं त्रिपुटी माजी आमचें ब्रह्महो ।
अगया कृष्णेच्या निजतटीं । वसताहि ब्रह्म
आमुचें त्रिपुटी ॥ ज्ञेय, ज्ञाता आणि ज्ञान ।
नुरे त्रिपुटीचेंहि भान
ब्रह्मचारी गृहस्थ वानप्रस्थ त्रिपुटी सारी ॥

देवनाथ आपले गुरु गोपाळनाथ यांच्याविषयीं म्हणतात—

त्रिपुटीस अतीत जो त्रिपुटीं हो ।
वसे स्वामीच। स्वामि कृष्णातटीं हो ॥

या उल्लेखांवरून त्रिपुटीचें तत्कालीन महत्त्व प्रत्ययास येतें. अशा या संतपुनीत स्थानीं येऊन राहणें ही हैबतीच्या आयुष्यांतील पहिली महत्त्वाची घटना होय.

त्या वेळीं त्रिपुटीस वर उल्लेखिलेले श्रीगोपाळनाथ नांवाचे परमज्ञानी नाथ-पंथी संत होते. त्यांना गोपाळनाथ भोला किंवा भोलानाथ या नांवानेंहि ओळखीत असत. गोपाळनाथ हे कीर्तन व प्रवचन करण्याविषयीं प्रसिद्ध होते व त्यांची कीर्ति त्रिपुटीच्या परिसरांत बरीच पसरलेली होती. गोपाळनाथांचें कीर्तन व प्रवचन यांच्या श्रवणानें हैबतीस लाभ होईल, असें वाटल्यावरून त्याचे वडील पुसेगांव सोडून त्रिपुटी येथें राहावयास आले. त्रिपुटीस आल्यापासून हैबती गोपाळनाथांच्या कीर्तन-प्रवचनांचा अत्यंत नियमित श्रोता होऊन बसला. कीर्तन प्रवचनाला बसूनसुद्धां ज्यांचें मन दुसऱ्याच गोष्टींत गुंतलेलें असतें, असे बाल आणि वृद्धदेखील बरेच श्रोते असतात. परंतु हैबती अशा अर्धवट श्रोत्यांपैकीं नव्हता. अत्यंत एकाग्रचित्तानें गोपाळनाथांचा उपदेश तो ऐकत असे. एवढ्या बालवयांत इतक्या अनन्यभावानें ऐकणारा हा श्रोता पाहून गोपाळनाथांनाहि त्याचें कौतुक आणि कुतूहल वाटूं लागलें. परंतु नुसता उपदेश श्रवण करून हैबती थांबला नव्हता. तो इतर रीतीनेंहि गोपाळनाथांची सेवा करीत असे. त्यामुळें या मुलांत कांहींतरी विशेष आहे, असें गोपाळनाथांना वाटूं लागलें. परंतु हैबतीच्या अंतर्यामींची तळमळ किती जबरदस्त होती, हें पुढच्या एका घटनेवरून दिसून आलें.

हैबती गोपाळनाथांचें प्रवचन जरी लक्षपूर्वक ऐकत असे, तरी ऐकलेल्या गोष्टींपैकीं त्याला नंतर कांहींच आठवत नसे. या गोष्टीचें हैबतीला फार वैषम्य वाटे. कितीहि प्रयत्नपूर्वक श्रवण केलें तरी तेवढ्यापुरतें लक्षांत यावें, पण पुढें कांहींच लक्षांत राहूं नये, अशा दुःखदायक अवस्थेंत हैबतीनें कांहीं वर्षें काढलीं. भाविकपणें गुरुसेवा करूनहि कांहीं लाभ झाला नाहीं. अशा नैराश्याच्या स्थितींत 'अर्थं वा साधयेत्, देहं वा पातयेत्' या न्यायानें त्यानें आपल्या प्राणाचा अंत करण्याचें ठरविलें. या हेतूनें तो कृष्णेच्या कांठीं जाऊन प्राणांतिक उपवास करूं लागला. गोपाळनाथांच्या कानीं ही गोष्ट जाताच त्यांनीं हैबतीचें मन वळविलें व निराशेनें प्राणत्याग करण्यापेक्षां चिकाटीनें प्रयत्न करीत राहणें अधिक श्रेयस्कर होय, असें त्यास पटवून दिलें. गोपाळनाथांच्या सांगण्यावरून हैबतीचे प्रयत्न पूर्वींपेक्षांहि अधिक जोरानें आणि नेटानें चालू झाले. हैबतीची

२०२९८ दि: क्रमांक नों दि:

आत्यंतिक तळमळ गोपाळनाथांच्या दृष्टोत्पत्तीस आली व त्यानंतर नाथपंथाच्या प्रथेप्रमाणें त्यांनीं हैबतीवर गुरुकृपा केली.

हैबतीची उन्नति यापुढें झपाट्यानें होऊं लागली हें खरें, परंतु त्याच्या उन्नतीला ज्या नाथपंथाची दीक्षा कारणीभूत झाली व पुढेंहि हैबतीनें आपल्या उत्तर आयुष्यांत ज्या पंथाचीच निष्ठापूर्वक उपासना केली, त्या नाथपंथाविषयीं थोडी माहिती येथें देणें आवश्यक आहे. कारण नाथपंथीयांच्या श्रद्धेप्रमाणें गुरुकृपेला किती मोठें महत्त्व आहे व त्या कृपेमुळेंच मोठमोठीं कार्यें कशीं सिद्धीस जातात, हें त्यावरून स्पष्ट होणार आहे.

नाथसांप्रदायाचें उपास्य दैवत दत्तात्रेय त्रिमूर्ति हें आहे. या सांप्रदायाचे मूळ पुरुष आदिनाथ हे होत. त्यांच्यानंतर मच्छिन्द्रनाथ, गोरखनाथ इत्यादि नवनाथांची परंपरा सांगण्यांत येते. या नाथसांप्रदायाच्या शाखा-उपशाखा नेपाळ ते रामेश्वरपर्यंत साऱ्या भारतांत पसरल्या आहेत महाराष्ट्र संतपरंपरेंतील मुकुंदराज, ज्ञानदेव, एकनाथ हे नाथसांप्रदायीच होते. एकनाथ म्हणतात—

> " आदिनाथ गुरु सकल सिद्धांचा। मच्छेन्द्र तयाचा मुख्य शिष्य।
> मच्छेन्द्रानें मंत्र गोरक्षासी दिला। गोरक्ष ओळला गहिनीमाजी।
> गहिनीनें खूण निवृत्तीसी दिली। निवृत्ती ओळला ज्ञानराजा।
> ज्ञानराजें मंत्र जगाशीं पै केला। एका जनार्दनीं झाला पूर्ण बोध ॥"

अशा या नाथपंथांतील गोरखनाथ हे फार मोठ्या योग्यतेचे पुरुष होऊन गेले. अनेक प्रकारच्या सिद्धि त्यांना प्राप्त झाल्या होत्या. आपले गुरु मच्छिन्द्र-नाथ यांनाहि गोरखनाथांनीं मोहांतून सोडविलें, अशी हकीकत मच्छिन्द्रा-ख्यानांत सांपडते. गोरखनाथ नाथसांप्रदायाच्या प्रसारासाठीं साऱ्या भारतांत हिंडले; जेथें गेले तेथील भाषेवर त्यांनीं प्रभुत्व मिळविलें व त्या त्या भाषेंत कवित्वहि केलें. गोरखनाथ महाराष्ट्रांत प्रचार करीत असतांना त्यांनीं मराठी अभंगरचनाहि केली, अशी माहिती मिळते. ज्ञानदेवांचे पणजे त्र्यंबकपंत यांना गोरक्षांनींच उपदेश केला होता (श. ११२९). ज्ञानदेवांचे आजे गोविंदपंत यांच्यावर गैनीनाथ (किंवा गहिनीनाथ) यांचा अनुग्रह झाला होता. गहिनी-नाथांनींच निवृत्तीस उपदेश केला व त्यावरूनच निवृत्तिनाथ हें नांव पडलें. निवृत्तिनाथांनीं पुढें ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई यांना नाथपंथांत घेतलें.

उपनिषदांतील " तत् त्वम् असि " या मंत्राचें सतत चिंतन हें नाथ-सांप्रदायाचें प्रधान तत्त्व आहे. अज्ञानी असणें नाथपंथाला बिलकुल मान्य नाहीं. या सांप्रदायाच्या मतें जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घ्यावयाची. नाथसांप्रदाय मृत्यूला मानीतच नाहीं. या सांप्रदायाप्रमाणें सिद्धावस्थेला गेलेला पुरुष इच्छेला येईल त्याप्रमाणें एकाच देहांत राहूं शकतो. योगबलानें व गुरुकृपेनें महाशक्तीची सिद्धि नाथसांप्रदायिक प्राप्त करून घेतो. तो मनोजयानें पंचमहाभूतांवर आपलें वर्चस्व प्रस्थापित करूं शकतो. गुरुकृपा झाली म्हणजे तात्काळ ज्ञान व सिद्धि यांचा लाभ, हें नाथसांप्रदायाचें वैशिष्टय आहे. ज्ञानदेवांनीं अवघ्या बाराव्या वर्षीं गीतेवर टीका लिहिली, या अलौकिक गोष्टीचा कांहींसा उलगडा नाथसांप्रदायी गुरुकृपेनें होऊं शकतो.

ज्ञानदेवानंतर जनार्दनस्वामी ही नाथपंथांतील अधिकारी व्यक्ति होय. त्यांच्यापासून पुढें अखंड अशी एक शिष्यपरंपरा आढळते. जनार्दन स्वामी–एकनाथ–कृष्णानंद–नित्यानंद–विसोबानंद– मल्हारनाथ– रंगनाथ– गोपाळनाथ ही ती परंपरा होय. स्वतः गोपाळनाथ यांना रंगनाथांकडून गुरुकृपा कशी झाली याचें साद्यंत वर्णन गोपाळनाथांचे धाकटे बंधु श्यामराज यांनीं एका ओवीबद्ध पोथींत केलें आहे.

या माहितीवरून असें दिसून येईल कीं, नाथसांप्रदायांत गुरुभक्तीला आणि गुरुकृपेला परम महत्त्व आहे. हें महत्त्व लक्षांत घेतलें म्हणजे हैबतीसारख्या निरक्षर माणसाच्या हातून पुढें जी असामान्य कामगिरी झाली तिजवर प्रकाश पडतो. गोपाळनाथांनीं हैबतीच्या जिभेवर कांहीं अक्षरें लिहिलीं व सरस्वतीला आवाहन करून तेथें बसविलें. अशा प्रकारें गोपाळनाथांना अनुग्रह झाल्यानंतर हैबती अज्ञानरूपी अंधकारांतून बाहेर आला व प्रकाशमय ज्ञानाची वाट चालूं लागला. यापुढें त्याची प्रगति झपाट्यानें होत गेली. निरनिराळ्या प्रकारच्या अनेक विषयांवर त्यानें कवनें केलीं. नाथपंथाचा पहिला शाहीर म्हणून त्याजकडे बोट दाखवितां येईल. नाथसांप्रदायाप्रमाणें योग-साधना करीत तो बसला नाहीं. कदाचित् गोपाळनाथांनींच त्याला कवनशक्ति देऊन शाहिरी वाङ्मयाच्या शुद्धीकरणाच्या महत्कार्यासाठीं त्याची योजना केली असावी. असो. हैबतीच्या आत्म्याची अशा प्रकारें जागृति झाली असतां त्यानें आपल्या जीवितकार्याला कशी सुरुवात केली, याचा विचार यापुढें करूं.

# प्रकरण ३ रें

# जागृति

गोपाळनाथांच्या कृपेनंतर हैबती एका क्षणांत ज्ञानसंपन्न झाला असें नव्हे, परंतु अंधारांत मार्ग चांचपडत असलेल्या हैबतीला गोपाळनाथांनीं योग्य ती दिशा दाखविली, हें मात्र खरें. गुरुकृपा होणें हा पुण्याईचाच परिणाम म्हटला पाहिजे, परंतु तेवढ्यानेंच कांहीं सगळें साधत नाहीं. नाथपंथाप्रमाणेंहि मानवी प्रयत्नांवरच प्रगति अवलंबून आहे. केवळ गुरूच्या कृपेवरच जो सर्वस्वी अवलंबून राहील त्याला प्रगतीची आशाच करावयास नको आणि गुरुकृपेनें तो जें कांहीं करील त्याचें श्रेयहि त्याला देतां येणार नाहीं व त्याला कुणी महत्त्वहि देणार नाहीं. अर्थात् हैबतीनें आपल्या आयुष्यांत जी कामगिरी केली तिचें बरेंच श्रेय त्याच्या चिकाटीच्या प्रयत्नांनाच दिलें पाहिजे.

गुरुकृपेनंतर हैबतीची स्मरणशक्ति तल्लख झाली. तो जें जें ऐके व वाची तें सर्व त्याला चांगलें समजूं लागलें व लक्षांतहि राहूं लागलें. गोपाळनाथांजवळ असलेल्या विपुल ग्रंथभांडाराचें अध्ययन करण्यास त्यानें सुरुवात केली. रामायण, महाभारत इत्यादि महाकाव्यें, निरनिराळीं पुराणें, वेद, उपनिषदें, गीता इत्यादि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ, कोकशास्त्र, संगीतशास्त्र, ज्योतिषशास्त्र, गणितशास्त्र, इत्यादि शास्त्रें अशा विविध विषयांचा सांगोपांग अभ्यास त्यानें गोपाळनाथांजवळ राहून केला. अर्थात् गुरुकृपा आपल्या प्रगतीला मूलतः कारण आहे, त्याशिवाय आपलें पाऊल पुढें पडलेंच नसतें, याची पूर्ण जाणीव त्याला होती. आपल्या एका कवनांत हैबती म्हणतो —-

अवघड गुरुरायाचें राहणें मोठें कठीण ।। रान आउटहाताची गणती, तयामध्यें कीं सावज फिरती। तीं परमार्थाच्या वाटेवरतीं। बैसलीं मुख पसरून ।। ज्याला सद्‌गुरुकृपा नाहीं, तो रान धुंडाया जाई। तो जिता मेला जाळींत गुंतून। राही व्याकूळ होऊन ।। ज्यानें ज्ञान कुऱ्हाड घेतली, त्यानें अवघी झाडी तोडिली, सावजें गेलीं, केलें मैदान ।। ज्यानें ज्ञान मैदान केलें। ते आत्मस्वरूपीं मिळाले। नाथकृपेनें हैबती बोले। शाश्वतीचें वचन ।। ३ ।। *

---

* कवन क्र. ३ पहा.

हैबती परमार्थाच्या मार्गावरचा सराईत पांथस्थ झालेला या कवनावरून दिसून येतो त्यानें ' आउट हाताची गणती ' असलेल्या मनुष्यदेहाला ' रान ' असें म्हटलें आहे. षड्रिपूंच्या रूपानें हिंस्र श्वापदें या रानांत हिंडत असतात. अशा वेळीं सद्गुरूचें मार्गदर्शन नसलें तर मनुष्य या श्वापदांच्या तावडींत सांपडून व्याकुळ होतो. गुरुकृपा असेल तर मात्र मनुष्य योग्य मार्गानें जाऊन आपला उद्धार करून घेतो. हैबतीच्या सांगण्याचा आशय असा आहे.

परंतु हैबतीनें ' ज्ञानकुन्हाड ' हातीं घ्यावी असें जें सुचविलें आहे तें अधिक महत्त्वाचें वाटतें. नाथपंथांतच ज्ञानाला महत्त्व दिलेलें आहे आणि हैबतीनें आपल्या आयुष्यभर जें कार्य केलें तें भरभक्कम अशा ज्ञानविज्ञानाच्याच पायावर उभारलेलें होतें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हैबतीची श्रद्धा प्रथमपासूनच अशी ज्ञाननिष्ठ, आणि म्हणूनच डोळस, असल्यामुळें त्याचें प्रतिबिंब त्याच्या कवनांतहि आढळतें.

हैबतीनें या साऱ्या विषयांचें अध्ययन दहाबारा वर्षें ( जवळजवळ एक तप ) केलें असावें. तो निरनिराळीं कवनें लिहू लागला. पुढें नाथांच्या अनुज्ञेनें त्यानें जेव्हां कीर्तनास सुरुवात केली, त्या वेळीं त्याचीं कवनें त्याला विशेष उपयोगी पडलीं. कंसवधावर हैबतीनें ' चुडा कटाव ' या नांवाचें कवन केलें आहे. त्यांत कृष्ण कासाराचें रूप घेऊन कंसाच्या राजवाड्यांत येतो. ' कंसाची नार कमळजा ' हिला बांगड्या भरत असतांना एक बांगडी अतिशय घट्ट झाल्यामुळें कमळजेला फार कळ लागली. बांगडी होती सोन्याची. तेव्हां ती कापून काढणें भाग होतें. बांगडी कापण्यासाठीं कमळजेनें कंसाच्या उशाखालचें खड्ग आणून दिलें. तेंच खड्ग घेऊन कृष्णानें कंसाला मारलें. हा सर्व कथाभाग हैबतीनें मोठ्या खुबीनें रंगविला असून कीर्तनांत रंग भरणारा आहे. हैबतीच्या कल्पकतेचा एक नमुना म्हणून त्याजकडे बोट दाखविता येईल.

याशिवाय महाभारतांतील गजगौरी व्रत, विराटपर्व इत्यादि विषयांवर आणि रामायणांतील सीताहरण इत्यादि विषयांवर हैबतीनें बहारदार कवनें केलीं आहेत. तींहि कीर्तनास अत्यंत उपयोगी अशीं आहेत.

परंतु हैबती ज्या वेळीं कीर्तन करीत होता, त्याच वेळीं तत्त्वज्ञानांतहि त्याची प्रगति होत होती. हें ज्ञान आपणांस गुरूपासून मिळालें असें हैबती सांगतो.

हैबतीच्या तत्त्वज्ञानाची बैठक कोणती होती, हें समजण्याच्या दृष्टीनें त्याचें खालील काव्य महत्त्वाचें वाटतें—

शिष्यांप्रति गुरुनाथ कथितो ब्रह्मस्वरूप ज्ञान ।
सगुण आणि निर्गुण अंतरीं घे हें समजून ॥ ध्रु० ॥
सगुण म्हणजे ॐकार गुणास अकार विश्वाचा ।
धारण केला ज्यानें ठाव तो सगुण ब्रह्माचा ।
जेथुन झाला असें पाहतों उगम त्रिगुणाचा ।
रजतम सत्त्वापासून झाला आकार पिंडाचा ।
पिंडीं पद तें पहा अनुभव घे या स्वरुपाचा ।
आत्माराम तो साक्षी असे या तीनही अवस्थांचा ॥

— — — — — —

षड शास्त्र संभव असे जरी वेद वक्ता पूर्ण ।
आत्मज्ञानाविण जळो तयाचें धिग् जन्म जाण ॥

अशा प्रकारें हैबतीनें पुराणांचें आणि तत्त्वज्ञानाचें अध्ययन केलें तरी तो केवळ पारमार्थिक साधु बनून राहिला नाहीं. तत्कालीन समाजांत प्रचलित झालेलें जें शृंगारप्रवण लावणी-वाङ्मय त्याच्या विरोधाला त्यानें सुरुवात केली. ज्यामध्यें एखाद्या लोकप्रिय विषयाची मनोरंजक माहिती आहे किंवा एखाद्या गूढ प्रश्नाची उकल आहे, अशा प्रकारचीं कवनें त्यानें करण्यास आरंभ केला. हैबतीचें सगळेंच चरित्र इतर तत्कालीन शाहीरांपेक्षां जसें निराळें आहे, तशींच त्याचीं हीं असंख्य कवनेंहि निराळीं आहेत. आपुकमापुकांच्या गाण्यांना चटावलेल्या तत्कालीन समाजांत हीं कवनें लोकप्रिय झालीं नाहींत, यांत आश्चर्य तें काय ? परंतु एका निरक्षर गुराख्याच्या हातून तडीस गेलेली विविध विषयांवरची अधिकृत अशी काव्यरचना, या दृष्टीनें तिचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. हैबतीचें वैशिष्ट्य त्याच्या या कवनांतच आहे. त्यांचा विचार यापुढें करूं.

———

## प्रकरण ४ थें

# प्रगति

त्रिपुटीस दरवर्षी कृष्णेच्या उत्सवानिमित्त बरेच लोक जमतात. वास्तविक हा उत्सव त्रिपुटीच्या जवळ दोन-तीन मैलांवर असलेल्या संगम–माहुली या गांवीं होतो. कृष्णेचें पाणी गंगेप्रमाणेंच पवित्र मानलें जातें व त्यांतल्या त्यांत संगम-माहुलीचें पाणी प्रयागतीर्थाप्रमाणेंच अधिक पवित्र मानलें जातें. यासाठीं तेथील पाणी नेऊन तें आपल्या इष्ट देवतांना वाहण्याची प्रथा फार जुनी आहे. कृष्णेचा उत्सव केला जातो तो या पवित्रतेच्या भावनेमुळेंच. संगम–माहुलीला निरनिराळ्या पंथोपपंथांचे साधुसंत आणि सत्पुरुष जमत, आणि मग तेथून जवळच असलेल्या त्रिपुटीची कीर्ति त्यांच्या कानावर गेल्यामुळें ते त्रिपुटीसहि येऊन जात.

हैबती-त्रिपुटीस राहून आत्मोन्नति करीत असतांना त्याच्या प्रगतीस जोरदार चालना देणारी एक घटना या उत्सवाच्याच निमित्तानें घडून आली. त्रिपुटीच्या आग्नेयेस खटाव तालुक्यांत पुसे-सावळी या नांवाचें एक गांव आहे. त्रिपुटीपासून तें जवळजवळ वीस मैलांवर आहे. त्या काळीं पुसे-सावळीस फार मोठी बाजारपेठ होती. धान्याचा व्यापार तेथें मोठ्या प्रमाणावर चालत असे. साहजिकच व्यापाराच्या भरभराटीमुळें तें गांवहि मोठें समजलें जात असे. अमृता कारंडे नांवाचे गृहस्थ तेथें राहत असत. अमृता हा वारकरी पंथाचा निष्ठावंत अनुयायी होता. या पंथांत व गांवांतहि त्याचें वजन चांगलें होतें. एके वर्षी कृष्णा-उत्सवाच्या वेळीं तो त्रिपुटीस आला असतां त्याची हैबतीशीं भेट झाली. हैबतीनें एवढ्या अल्पवयांत निरनिराळीं कवनें करून आपल्या प्रतिभेची जी चमक दाखविली होती, तिचा चांगलाच प्रभाव अमृता कारंडे याजवर पडला. हैबतीच्या सद्गुणांचें चीज पुसे-सावळीसारख्या मोठ्या गांवीं अधिक होईल व अशा सत्पुरुषाच्या निवासानें पुसे-सावळीचेंहि महत्त्व वाढेल, अशा हेतूनें प्रेरित होऊन अमृतानें त्यासंबंधीं हैबतीस विचारून पाहिलें. लौकिक दृष्टीनें पुसे-सावळी भरभराटीस आलेलें होतें हें खरें, पण तेवढ्यानें हैबतीचें मन वळणारें नव्हतें. पुसे-सावळीला धार्मिक आणि आध्यात्मिक पार्श्वभूमिदेखील होती. पंढरपूरची वारी करणाऱ्यांची जुनी परंपरा तेथें

होती. त्या ठिकाणीं पूर्वी सोळा गिरिमठ होते. मारुतीचें एक अतिशय जुनें आणि विस्तीर्ण मंदिर तेथें आहे. अयाचित नांवाच्या ज्या भागवत सांप्रदायी गृहस्थांनीं आळंदीस २१ दिवसांचा उपवास करून ज्ञानेश्वरमहाराजांचा दृष्टान्त मिळविला त्या अयाचितांचें घराणें पुसे-सावळीचेंच. आळंदीच्या पवित्र अजान वृक्षाची फांदी अयाचितांनीं आपल्या अंगणांत आणून लावली व ती तेथें वाढली. महाराष्ट्रांत इतरत्र कोठेंहि ती वाढत नाहीं. या अजान वृक्षामुळें पुसे-सावळीस धार्मिक पवित्रता आलेली होती. शिवाय कृष्णदेव नांवाचे साधु तेथें होऊन गेले. त्यामुळेंहि गांवाला धार्मिक महत्त्व होतेंच. या सर्व गोष्टी हैबतीला कळून आल्यामुळें त्रिपुटी सोडून पुसे-सावळीस जावें, असा विचार त्याच्या मनांत डोकावूं लागला. परंतु त्रिपुटीस उत्पन्न झालेलीं भावबंधनें तोडणें फार कठीण होतें. पण स्वतः गोपाळनाथांनींच त्याची या द्विधा मनःस्थितींतून सुटका केली. हैबती त्रिपुटीसच राहिला असता तर पुढें तो नाथपंथी योगी झाला असता व त्यानें आपली नाथपंथी परंपराहि तयार केली असती. परंतु गोपाळनाथ द्रष्टे पुरुष होते. हैबतीच्या हातून कांहींतरी 'युगकर्म' व्हावें हा जो ईश्वरी संकेत, त्याला सहाय्यक असाच सल्ला गोपाळनाथांनीं हैबतीला दिला.

परंतु हैबतीसारखेच दुसरेहि कांहीं गृहस्थ गोपाळनाथांचे शिष्य होते व तेहि मोठ्या योग्यतेचे असे पुरुष होते. गोविंदनाथ, देवनाथ व दयाळनाथ हे ते शिष्य होत. अर्थातच या जोडीदारांना सोडून जाणें हैबतीला कठीण वाटलें, यांत नवल तें काय ? हैबतीप्रमाणेंच हे शिष्यहि कवनें करीत असत. त्यांपैकीं देवनाथांचीं कवनें विशेष प्रसिद्ध आहेत. त्याच वेळीं शेख सुलतान नांवाचा मुसलमान गृहस्थ भागवत सांप्रदायाकडे आकर्षिला गेला होता. हा 'शेख सुलतान अवलिया' या नांवानें ओळखला जातो. त्याच्या अभंग-रचनेचा एक नमुना येथें देतों—

ऊंस सर्व अंगीं काळा । आंत साखर जिव्हाळा ॥
फणस अंगीं सर्व कांटे । आंत अमृताचे सांठे ॥
नारळ वरुता कठिण । परी अंतरीं जीवन ॥
हिरवेचि द्राक्षघड । रसा येतां बहु गोड ॥
शेख सुल्तान अविंध । त्याच्या हृदयीं गोविंद ॥

अशा प्रकारच्या ‘ समानशील व्यसन ’ माणसांत दाट मैत्री असावयाचीच. म्हणून पुसे-सावळीस जावयाचें म्हणजे या सहकाऱ्यांना सोडावयाचें हाच विचार हैबतीला कष्टदायक वाटत होता. अशा परिस्थितींत बरेच दिवस गेले, परंतु अमृतानें चिकाटी सोडली नाहीं. पुढें मित्रांच्या आग्रहावरून व गोपाळनाथांच्या सांगण्यावरूनच तो त्रिपुटी सोडण्यास तयार झाला. अमृता कारंडे व हैबती यांची भेट ही हैबतीच्या आयुष्यांतील दुसरी महत्त्वाची घटना होय. हा योग मोठ्या पुण्याईनेंच घडून आला, असें म्हटलें पाहिजे. कारण भवभूतीच्या शब्दांत—

सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति ।

त्रिपुटी सोडून हैबती पुसे-सावळीस आल्यानंतर त्याच्या आयुष्याला एक निराळीच दिशा लागली. आतां तो आपल्या तेजानें चमकूं लागला होता. जीवितकार्य असें ज्याला म्हणतां येईल, त्याची सुरुवात हैबतीनें पुसे-सावळीस येऊनच केली.

## प्रकरण ५ वें

# परमोत्कर्ष

हैबती त्रिपुटीस असतांनाच त्याचे आईबाप निवर्तले. त्यामुळें तो पुसे-सावळीस आला तेव्हां एकटाच होता. अमृता कारंडे यानें त्यास पुसे-सावळीस आणलें होतें व तोच हैबतीचा चरितार्थ चालवीत असे.

हैबतीनें त्रिपुटीहून निघतांना गोपाळनाथांचा निरोप घेतला, परंतु नाथांची कृपेची दृष्टि आपल्यावर सतत राहील, असें आश्वासन त्यानें मिळविलें होतें. पुसे-सावळीस आल्यानंतर हैबतीच्या कार्याचा व्याप फारच प्रचंड झाला. तथापि आपल्या सर्व कार्याच्या मागें गुरूची प्रेरणाशक्ति आहे, असें तो मानीत होता. वेळोवेळीं त्यानें सद्गुरुकृपेसंबंधीं जीं कवनें केलीं आहेत, त्यांवरून तो गुरूला किती मानीत असे, याची साक्ष पटते.

परंतु हैबतीचें कार्य हें आतां केवळ नाथपंथाचें कार्य राहिलें नाहीं. नाथसांप्रदायाप्रमाणें तो साधु बनला नाहीं कीं योगसाधनेंतहि रमला नाहीं. त्याच्यासभोंवतीं जें वारकरी मंडळ होतें त्याच्याच कार्यक्रमांत तो अधिकाधिक भाग घेऊ लागला. अमृता कारंडे याच्याबरोबर हैबतीनें एकदां पंढरपूरचीहि वारी केली. त्या वेळीं हैबतीनें केलेलें कवन अत्यंत रसाळ आहे—

पंढरीनाथा श्रीभगवंता नाम तुझें अमृत।
उदार देहाचा देता झाला तरले साधुसंत।

पंढरपुरास जातांना वाटेंत हैबतीनें ठिकठिकाणीं तमाशाचे फड पाहिले. अमृता कारंडे याला तत्कालीन तमाशाची फार चीड होती व त्यानें ती हैबतीपाशीं अनेक वेळां बोलूनहि दाखविली होती. परंतु हैबतीनें तमाशाचें घाणेरडें रूप जेव्हां प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां लोकरंजनाच्या या साधनांत कांहींतरी मूलभूत सुधारणा तात्काळ केली पाहिजे, अशी तळमळ त्याला वाटूं लागली. विशेषतः तमाशांत स्त्रीजातीची जी विटंबना केली जात होती, तिच्यावर नाथपंथाच्या शिकवणुकीप्रमाणें त्याचा कटाक्ष होता. तमाशाचें शृंगारिक रूप दवडून तो आध्यात्मिक करमणुकीचा प्रकार करावा, यासाठीं त्यानें प्रयत्न करण्याचें ठरविलें. त्याने ज्या अनेक विषयांचा अभ्यास केला होता त्यांचीहि माहिती कवन-

रूपानें देतां येईल असें त्यानें ठरविलें. तमाशाला जो विरोध त्याला करावयाचा होता, तो तमाशा हा प्रकारच नष्ट करण्याकरितां नव्हता. हैबतीचा हेतु तमाशाला मारून टाकणें हा नसून तमाशाला सुधारणें हा होता. याचें कारण असें कीं, तमाशाची लोकप्रियता व प्रचाराचें साधन या दृष्टीनें तमाशाची उपयुक्तता हैबतीला पटली होती. म्हणून तमाशांत कवनांची जी पद्धति होती तीच कायम ठेवून त्यानें आपली विशिष्ट काव्यरचना यापुढील काळांत केली. तमाशांतील कवनांप्रमाणें त्यानेंहि लावण्या, कटाव, फटके इत्यादि काव्यप्रकार रचले, मात्र त्याचे विषय निराळे होते. नाथपंथी व वारकरी या दोन्ही दृष्टींनीं त्यानें तत्कालीन वादांतील कलगी-पक्षाचा स्वीकार केला. त्या वेळचे प्रसिद्ध शाहीर होनाजी, रामजोशी, परशुराम इत्यादिकांपेक्षां अध्यात्मावर बोलण्याचा हैबतीचा अधिकार मोठा होता. तसेंच अनेकविध विषयांवर तो जीं कवनें करीत असे त्याला योग्य असा शास्त्राधार दिल्याशिवाय कोणतीहि गोष्ट सांगत नसे. म्हणून हैबतीनें कलगी पक्षाचीं जीं कवनें केलीं तीं अत्यंत प्रभावी ठरलीं. त्या वेळच्या कलगी-तुरा वादांत कलगी पक्षाचे जे समर्थक होते त्यांचा हैबती हा अध्वर्यु ठरला. कलगीवाले व तुरेवाले यांचे उघड सवालजबाब तमाशांतून होत असत. अशा वेळीं हैबती आपल्या विद्वत्तेमुळें नेहमींच अजिंक्य ठरत असे. हैबतीनें गुरुचरणांपाशीं राहून आपल्या पूर्वायुष्यांत जी तपश्चर्या केली होती ती इतर शाहिरांना दहशत वाटण्यासारखी होती. आपल्या तुटपुंज्या अनुभवावर आध्यात्मिक कवनें करणारे शाहीर याच कारणामुळें हैबतीसमोर टिकेनासे झाले. हैबतीला 'कलगी-सम्राट्' ही पदवी प्राप्त होण्याला त्याचीं हीं आध्यात्मिक कवनेंच कारणीभूत झालीं.

हैबतीनें कलगी-प्रचाराच्या कार्यासाठीं कांहीं शिष्यहि तयार केले. संभूराजू हा त्याचा पहिला शिष्य होय. परंतु या गुरु-शिष्यांच्या बाबतींत एक दुःखद घटना घडून आली. हैबतीनें आपलीं सर्व कवनें त्याला शिकविलीं, सवाल-जबाबाच्या कवनांतील गूढें स्पष्ट करून दाखविलीं, ग्रंथान्तरींचे दाखले कोठें मिळतात हेंहि सांगितलें. अशा रीतीनें हैबतीचीं कवनें गात व हैबतीच्या कलगी पक्षाचा प्रचार करीत संभूराजू कित्येक वर्षें हैबतीजवळ राहिला. पुढें आपण स्वतः कवनें करावींत व प्रसिद्धि मिळवावी, अशी ईर्ष्या संभूराजूच्या मनांत उत्पन्न झाली. त्याप्रमाणें तो स्वतंत्र रीतीनें कवनें करूं लागला. कृष्णा नदीच्या

तीरावर तासगांव तालुक्यांत ( द. सातारा ) भिलवडी या गांवीं जाऊन तो राहूं लागला. परंतु पारमार्थिक कवनांच्या मागें निष्ठा आणि गुरुभक्ति असल्याशिवाय तीं प्रभावी कशीं ठरणार? ईर्ष्येच्या आणि द्वेषाच्या भूमींतून अध्यात्माचीं मधुर फळें कशीं वर येणार? म्हणूनच संभूराजूच्या स्वतंत्र कवनांचा लोकांत कांहींच जम बसला नाहीं. परंतु ज्या कुबुद्धीनें संभूराजू हैबतीला सोडून गेला, तिचा अम्मल अनजूहि त्याच्यावर होता. एकदां संधि साधून त्यानें हैबतीच्या कवनांचें बाडच चोरून आणलें. या चोरीमुळें हैबतीचें किती नुकसान झालें हें स्वतः कविच जाणूं शकेल. चोरी कोणीं केली असावी, याचा विचार करतां करतां हैबतीला संभू राजूची शंका आली. तेव्हां एक दिवस हैबती भिलवडीस येऊन संभूराजूस भेटला. हैबती भेटण्यास आलेला पाहून संभू राजूमनांत चरकला. परंतु हैबतीनें पहिल्या दिवशीं चोरीची गोष्टदेखील काढली नाहीं. दुसऱ्या दिवशीं दोघे कृष्णेवर स्नानाला गेले. स्नानाच्या वेळीं संभूराजूनें ओंजळींत पाणी घेतल्यावर हैबतीनें त्याला म्हटलें, " संभू, माझीं कवनें तूं चोरलीं असावींस असा मला संशय आहे, तर कृष्णामाईची शपथ घेऊन खरें काय तें सांग." डोळ्यांत आंसवें आणून धडधडत्या अंतःकरणानें संभूनें आपली चोरी कबूल केली. तथापि हैबतीनें आपलीं कवनें परत आणलीं नाहींत. त्यानें संभूला म्हटलें, " तीं कवनें तुझ्याजवळ राहूं देत. पण लक्षांत ठेव कीं, तीं तुला उपयोगी पडणार नाहींत."

हैबतीनें तेथून आल्यानंतर परत काव्यरचना केली. त्याचीं बाडें अजून निरनिराळ्या ठिकाणीं सांपडतात. हैबतीचें सारें कवन कलगी पक्षाचें आहे. त्यांत कांहीं ' भेद ' ( रहस्य ) आहे, किंवा प्रतिपक्षाचा भेद करणारीं अशीं तीं कवनें आहेत, म्हणून हैबतीच्या या कवनांना ' भेदिक कवन ' अशी संज्ञा आहे. कलगी-तुरा वादांत प्रतिपक्षाला जिंकण्याचें साधन हें ' भेदिक ' कवनच होय. हैबती आपल्या तपश्चर्येमुळें असल्या कवनांच्या बाबतींत प्रतिपक्षाला निरुत्तर करून टाकीत असे. तत्कालीन शाहिरांनीं हैबतीचा पराभव करण्यासाठीं जंगजंग पछाडलें, परंतु हैबती अजिंक्यच राहिला. या वादांत हैबतीला विरोध करणारा मुख्य प्रतिस्पर्धी संभूराजू हाच ठरला. कारण, ' माझीं कवनें तुला उपयोगी पडणार नाहींत ' असें हैबतीनें सांगितल्यानंतर व आपलीं कलगीचीं कवनें निष्फळ ठरतात हें पाहिल्यानंतर संभूराजूनें कलगी पक्षच

सोडला व एकाएकीं तो तुरेवाला बनला. हैबतीच्या कवनांतील माहिती घेऊन, त्यांत कांहीं फेरफार करून, तो आपल्या नांवानें तीं कवनें म्हणूं लागला. अर्थात् हैबतीचीं अस्सल कवनें त्याच्या हातीं असल्यामुळें स्वतः हैबतीला त्याच्याशीं सामना करणें कठीण गेलें. परंतु कांहीं झालें तरी संभूराजूचा सगळा धंदा उसनवारीचाच होता. हैबतीसारख्या स्वानुभवी माणसापुढें त्याची कांहीं मात्रा चालली नाहीं.

हैबतीनें तमाशापद्धतीचें कलगी-कवन व इतर आध्यात्मिक कवन केलें, परंतु तेवढ्यानें तत्कालीन तमाशाच्या स्वरूपांत कांहीं बदल घडून येणें शक्य नव्हतें. शृंगाराला चटावलेला समाज एकाएकीं या आध्यात्मिक कवनांकडे कसा वळणार ? परंतु तमाशांतून उतूं जाऊं लागलेल्या शृंगारावर कांहींतरी उपाय-योजना केली पाहिजे, असा निश्चय हैबतीनें केला होता. त्यासाठीं हैबतीनें जो एक मार्ग अवलंबिला त्यावरून त्याची कल्पकता आणि योग्यता लक्षांत येते. शृंगाराचा अतिरेक टाळून, परंतु शृंगाराचा थोडासा भाग करमणुकीपुरता घेऊन तमाशा कसा रंगवितां येईल हें हैबतीनें नुसत्या शब्दांनीं नव्हे, तर कृतीनेंच करून दाखविण्याचें ठरविलें. अमृता कारंडे याला हैबतीची ही कल्पना पसंत नव्हती, परंतु हैबतीच्या दृष्टीला तिची उपयुक्तता पटली होती व ती कल्पना प्रत्यक्षांत आणण्यास लागणारें जें नैतिक धैर्य तें हैबतीजवळ होतें. आपल्या कल्पनेप्रमाणें आपण स्वतः एक तमाशाचा संच तयार करावा व तमाशाचीं प्रात्यक्षिकेंच लोकांसमोर ठेवावींत, असें हैबतीनें ठरविलें. त्यासाठीं दोन नाच्ये व दोन सुरत्ये ( ज्योती-बाळा या नांवाचे ) त्यानें तयार केले व पायांत घुंगरें घालून तो स्वतःदेखील नाचूं लागला. अशा प्रकारें तमाशाला तमाशाच्याच भाषेंत व स्वरूपांत त्यानें उघडउघड आव्हान दिलें. तत्कालीन तमाशाची लोकप्रियता किती होती याची ज्यांना कल्पना आहे, त्यांना हैबतीचा हा प्रयत्न किती अडचणीचा आणि धोक्याचा होता हें ध्यानांत येईल.

तमाशाचें हें नवीन तंत्र लोकांना दाखविण्यासाठीं हैबतीनें आळंदीपर्यंत दौरा काढण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें गांवोगांव मुक्काम करून तेथें तो आपल्या पद्धतीनें तमाशा करूं लागला. तमासगिरांच्या धंद्यावर यामुळें जो घाला येण्याची शक्यता होती त्यामुळें तमाशाप्रिय लोक आधींच चिडलेले होते. त्याशिवाय परमार्थवादी लोकांनाहि हैबतीचा हा मार्ग पसंत पडत नव्हता. कऱ्हाड

तालुक्यांतील कारखे गांवीं तर कांहीं मंडळींनीं असें स्पष्ट म्हटलें कीं, "बुवांच्यापासून आम्ही अशी अपेक्षा करीत नव्हतों. शृंगारासह अध्यात्म सांगणें ही गोष्ट आम्हांस पटत नाहीं." हैबतीनें त्यांना आव्हान दिलें कीं, "शृंगार आणि परमार्थ यांची सांगड घालणें शक्य आहे. माझ्या तमाशानें मी हें तुम्हांला पटवून देईन आणि तुमची खात्री पटली नाहीं तर तमाशाचा फड मोडून टाकीन." असें म्हणून त्यानें रात्रीं जो तमाशा सुरू केला तो सकाळीं सूर्योदय होऊन गेला तरी लोकांना सोडवेना. शृंगार आणि अध्यात्म यांचें इतकें मनोज्ञ मिश्रण होऊं शकतें, हें हैबतीनें दाखवून दिलें. हैबती शृंगाराच्या विरुद्ध होता असें नव्हे, परंतु तमासगिरांचा बीभत्स शृंगार त्याला पसंत नव्हता. व्यासांनीं लक्ष श्लोकांचें महाभारत लिहिलें, परंतु त्यांचें त्यामुळें समाधान झालें नाहीं. शृंगाररसमिश्रित असा भागवत ग्रंथ त्यानंतर व्यासांनीं लिहिला, या गोष्टीचा उल्लेख हैबती नेहमीं करीत असे.

हैबतीच्या तमाशाचा बहुतेक भाग प्रश्नोत्तररूपी कवनांनीं भरलेला असे. हे प्रश्न विचारतांना आणि त्यांचीं उत्तरें देतांना मनोरंजनाला आणि शृंगाराला भरपूर वाव मिळे. याचें एक उदाहरण येथें देतों. एकदां कोणी एक प्रसिद्ध शास्त्री व पंडित हैबतीच्या फडाला येऊन बसले. वाल्मीकिरामायणांत ज्या कांहीं गोष्टींचा उल्लेख आला आहे त्याविषयींच हैबतीनें प्रश्न टाकला—

एक अचंबा असा दिसाचे चंद्र पाहिले चार।
चारि चंद्र सारखे, सारखा नामाचा उच्चार ॥
चार चंद्र कोणते तयाचा करा मनीं विचार।
आहे सत्य, नव्हे असत्य, वाल्मीक मुनीचें कृत्य,
कथिलें भविष्य स्वतःनें ॥
आणिक एक विपरीत, अयोध्यानाथ जवळ असतांना।
सीता सती पतिव्रता हृदयीं धरिती लंकेचा राणा ॥
दिसतें विपरीत, कसा तो अर्थ मानसीं आणा।
शोध पहावा ठिकाण लावा, प्रत्यय तो यावा,
वाहवा म्हणतील गुणी सुज्ञान ॥

हे प्रश्न खरोखरच अवघड आहेत व त्या प्रश्नांना काय उत्तर द्यावें हें त्या पंडितालाहि सुचेना. परंतु प्रत्यक्ष रामायणांतच त्याचा उल्लेख आहे. वाल्मीकि

म्हणतात, " असा दिसाचे, म्हणजे भर दिवस असतां, चार चंद्र दिसले. " तसेंच, " सीता ही पतिव्रता खरी, पण रामचंद्र पहात असतांना तिनें रावणाला हृदयीं कवटाळलें. " हें कसें ? हैबती याचें उत्तर देतो—

चारि चंद्र सारखे देखिले एक दिसीं नयनीं ?
जरी म्हणाल विपरीत तरी परिसा अन्वयश्रवणीं ॥

लंकापति रावण वधिला पहा श्रीरामांनीं । ही रामायणीं कथा असे कथिली वाल्मीकांनीं ॥ सीतेसह निर्जर बंदीचे सोडविले त्यांनीं । ब्रह्मा, शिव, आधीं करून सुवेळास्थानीं ॥ दिव्य सितेनें घ्यावें ऐसें सर्वांचे वदनीं ॥ १ ॥

चेतवून महाअग्नी टाकिली उडी कुंडामाजी । निघे अग्नितून तेव्हां पडली आपशब्दांची मांजी । इंद्र, चंद्र साक्षीस कोटी तेहत्तीस त्या समाजीं । धन्य धन्य ते सिता माय म्हणती सर्व नमाजी ॥

चार चंद्र त्या वेळीं जमले असें ग्रंथ कथनीं । रामचंद्र तो एक, सीता-मुखचंद्र दुजा जाण । शिवमस्तकीं तिजा अत्रिनंदन चवथा जाण ॥ २ ॥

सीता हृदयीं धरी रावण तेव्हां कैसे गाण । विपरीतच अर्थ दिसतो, परी नीटच संधान । आंचळ नाम जो पदर तोचि रावण पहा मननीं । लज्जित होवुन सीता सावरून पदर हृदयीं धरला । तेहतीस कोटी सुरांसहित संशय सारा हरला । जयजयकारें गर्जती आनंद ब्रह्मांडीं भरला ॥ ३ ॥

यावरून, रामचंद्रांनीं रावणाचा पराभव केल्यानंतर तेहत्तीस कोटी देवांना बंदींतून सोडविलें व नंतर सीताशुद्धीच्या वेळीं हे सर्व देव साक्षीसाठीं हजर असतांना चार चंद्र भर दिवसां दिसले, असें हैबती सांगतो. त्याचप्रमाणें ' रावण ' याचा अर्थ ' पदर ' असा असल्यामुळें " सीतीनें लाजून आपला पदर सावरून हृदयाशीं धरला " असा दुसऱ्या प्रश्नाचा खुलासा हैबती करतो.

अशा प्रकारें आपल्या अभिनव तमाशाचे कार्यक्रम करीत हैबती आळंदीस येऊन पोंचला. " हैबतीबुवा तमासगीर झाला " अशी वावटळ आळंदीस अगोदरच येऊन पोंचली होती. त्याच्याविषयीं असलेला आदर कमी झाला होता. अशा स्थितींत ज्ञानेश्वरांच्या समाधीसमोर हैबतीला तमाशा करूं देण्याचें आळंदीकरांनीं नाकारलें. परंतु हैबतीनें परत पूर्वींसारखीच प्रतिज्ञा केली. हैबती आपल्या कवनांच्या जोरावर अग्नि चेतवूं शकतो व जळलेल्या लांकडांच्या राखेंतून परत लांकडें निर्माण करतो, अशी त्याची ख्याति सर्वत्र पसरली होती. त्यामुळें

त्याच्या प्रतिज्ञेचा अनादर करणें आळंदीकरांनाहि शक्य नव्हतें. नाखुषीनें कां होईना, आळंदीकरांनीं हैबतीला तमाशा करूं दिला, ही गोष्ट खरी. तमाशाला सारें गांव लोटलें. कधीं झाली नव्हती एवढी गर्दी झाली. हैबतीनें नवरसांची मुक्तहस्तानें खैरात केली. त्यांत शृंगाराचें भक्तीबरोबर केव्हां नि कुठें मिश्रण झालें हेंहि श्रोत्यांना समजलें नाहीं. सारे प्रेक्षक आनंदानें डुलत होते. सरतेशेवटीं ज्ञानदेवांची समाधिहि डुलूं लागली, असें प्रत्येकजण म्हणूं लागला. ज्ञान-देवांच्या पसंतीचाच हा शिक्का जणूं हैबतीच्या कवनाला आणि कार्याला मिळाला. असें होणें हें योग्यच होतें. कारण " तीरें संस्कृताचीं गहनें । फोडोनि केलीं शब्दसोपानें । मराठीया ॥ " ही आपली प्रतिज्ञा आपल्यामागून इतकी चरितार्थ करणारा शाहीर पाहिल्यावर ज्ञानदेव डुलल्याशिवाय कसे बरें राहतील ?

हैबतीचा हा नवीन तमाशा अशा प्रकारें विद्वन्मान्य व संतमान्यहि झाला, तरी त्याला लोकप्रियता लाभली नाहीं. एक नावीन्य या दृष्टीनें एखादे वेळीं ऐकण्यास हा तमाशा ठीक होता, परंतु प्रचलित तमाशासारखें मनोरंजन त्यांत आहे असें लोकांस वाटेना. शिवाय असें कीं, तत्कालीन चालूं तमाशा कोणीहि " ट ला ट, प ला प " लावून, ' गीत बनें आपोआप ' या म्हणीप्रमाणें कवनें बनवून, उभा करूं शकत असे. हैबतीच्या कल्पनेप्रमाणें तमाशा करण्यास लाग-णारी प्रतिभा आणि तपश्चर्या साधारण तमासगिरांजवळ कुठून असणार ? त्यामुळें हैबती पंथाचे तमासगीर तयार होईनात; आणि एकटा हैबती या नवीन तमा-शाचा प्रसार कोठवर करणार ? अशा परिस्थितींत कांहीं वर्षें एकट्यानें झगडून हैबतीचा उत्साह कमी झाला. तमाशाचें शुद्धीकरण शक्य नाहीं व त्यासाठीं आयुष्य वेंचणें व्यर्थ आहे, हें त्यानें ओळखलें. म्हणून ज्ञानदेवांच्या समाधी-समोर व्यासांच्या आक्रोशाप्रमाणें —

" ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न तु कश्चित् शृणोति माम् ।
धर्मात् अर्थश्च कामश्च, स धर्मः किं न सेव्यते ॥ "

अशी तक्रार दाखल करून हैबतीनें तमाशा सोडून दिला. तथापि कलगी पंथाचीं कवनें तो त्यापुढेंहि तयार करीत असे व त्या पंथाच्या शाहिरांना म्हणण्यासाठीं देत असे. अशा प्रकारचीं कित्येक कवनें अजूनहि पुसे-सावळी भागांत लोकांच्या तोंडीं आहेत.

यानंतर हैबतीनें हातीं घेतलेलें एक महत्त्वाचें कार्य ज्योतिषशास्त्राचें अध्ययन व प्रचार हें होय. तीनशें वर्षांपूर्वी ज्योतिषशास्त्रावरील ‘सहदेव-भाडळी’ मत फार प्रसिद्ध होतें. त्या मतावर प्रथम संस्कृतांत व नंतर मराठी-हिंदींतहि काव्यरचना झाली. ज्यांना संस्कृत येत नव्हतें, पण ग्रहगणित करणें व ज्योतिष सांगणें भाग पडे, अशा ग्रामजोशांना या मराठी काव्याचा उपयोग होई. पाऊसपाणी जन्म-मरण, शकुन-अपशकुन, शुभ-अशुभ, वार व घटिका इत्यादि सांगण्यासाठीं या मराठी काव्यावरच अवलंबून राहावें लागे. अशा ग्रंथांच्या कांहीं पोथ्या कै. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं प्रसिद्ध केल्या. आपल्या प्रस्तावनेंत कै. राजवाडे लिहितात--

“ ह्या पोथ्या महाराष्ट्रांतील एका प्रख्यात प्राकृत फलज्योतिषाच्या आहेत. हा प्राकृत ज्योतिषी म्हणजे महाराष्ट्रांत सर्वतोमुखी ज्याचें नांव गांवगन्ना घेतात तो सहदेव-भाडळी होय. ”

यावरून ‘सहदेव भाडळी’ हा एक गृहस्थ असावा, असें वाटतें, परंतु तसें नसून सहदेव व भाडळी या दोन व्यक्ति होत्या. त्यांच्या ज्योतिषमताचा प्रचार हैबतीनें केला. विषयाच्या अनुरोधानें सहदेव व भाडळी यांची थोडी माहिती येथें देणें आवश्यक आहे.

पैठण शहरांत मार्तंड जोशी या नांवाचे विद्वान् ब्राह्मण होऊन गेले. त्यांचें ज्योतिषाचें ज्ञान अगाध होतें. त्यांचा मुलगा सहदेव हा होय. परंतु तो मोठा झाला तरी ज्योतिषविषयक त्रिकालज्ञान त्याला आकलन होईना. पुढें एका शूद्र स्त्रीपासून मार्तंड जोशी यांस एक मुलगी झाली. तीच भाडळी ही होय. ती ज्या मुहूर्तावर जन्मली त्यावरून ही त्रिकालज्ञ होईल असें भविष्य मार्तंड जोशी यांनीं वर्तविलें होतें व त्याप्रमाणें खरोखरच ती त्रिकालज्ञ अशी झाली. परंतु तिला ही सिद्धि एका साधूच्या अनुग्रहामुळें झाली. मार्तंड जोशी यांच्या निधनानंतर सहदेवावरहि त्याच साधूची कृपा झाली होती. परंतु भाडळीवर जशी पूर्णांशानें कृपा झाली तशी सहदेवावर झाली नाहीं. यामुळें भाडळी ही ज्योतिषांत पारंगत झाली व ती जें जें सांगेल तें खरें होऊं लागलें. पुढें सहदेवानें आपल्या मातंग बहिणीचें शिष्यत्व पत्करलें व त्या दोघांनीं जें ज्योतिषाचें मत प्रसृत केलें तें सहदेव–भाडळी मत होय. या मताचें मूळ कवन सहदेव व भाडळी यांनीं एकमेकांना केलेल्या प्रश्नोत्तरांत आहे. परंतु हैबतीनें या मतावर विस्तृत काव्य-रचना करून तें ठिकठिकाणीं पसरविलें. एका कवनाच्या शेवटीं हैबती म्हणतो –

भाडळीचें सांगणें हैबती मुखें गात आहे ।
ज्योतिषांतिल हेतु कळवला, लटका न मानावा ।
भाडळीचा दाखला ग्रंथांतरीं शोधावा ॥

हैबती आपल्या काव्यांत आव्हान देतो कीं, सहदेव-भाडळीचें म्हणणें खोटें असेल तर तसें दाखवून द्या. भाडळी ही शूद्र, म्हणून तिचें ज्ञानहि शूद्र, असें तत्कालीन पंडितांनीं मानलें व त्यामुळें त्याची उपेक्षा होत होती. परंतु हैबतीनें हें मत पुढें आणलें. हैबतीनें या मतावर आपली रचना केली नसती तर हें सर्व ज्ञान कालाच्या उदरांत नष्ट झालें असतें. म्हणून हैबतीचें हें कार्य ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें आहे. हैबतीचीं एतद्विषयक कांहीं कवनें शेवटीं दिलीं आहेत. जिज्ञासूंनीं तीं अवश्य वाचून व पडताळून पहावीं. सहदेव-भाडळी मतासंबंधीं पहिलें पुस्तक १८७७ सालीं पुणें येथें नारो अप्पाजी गोडबोले यांनीं छापून प्रसिद्ध केलें. १९१२ सालीं मुंबईहूनहि 'सहदेव-भाडळीकृत ज्योतिषसंग्रह' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे.

हैबतीनें त्रिपुटीस राहूनच ज्योतिषाचा अभ्यास केला. सहदेव–भाडळी मताच्या पोथ्या त्याला तेथेंच मिळाल्या असाव्यात. परंतु हैबतीनें ज्योतिषाबरोबर गणितशास्त्राचाहि कसून अभ्यास केला होता असें दिसतें. त्यानें दिलेले कांहीं आंकडे खरोखरच आश्चर्य करण्यासारखे आहेत. ज्या कवनांना गणिताचा आधार आहे किंवा गणितग्रंथावरूनच ज्यांची रचना करण्यांत आली आहे, अशा कवनांस हैबती 'गणित कविता' म्हणतो.

तुम्ही चतुर बैसलां आतां परिसावी गणित कविता।
परिमाण सांगतों पहा चालतो किति सविता ॥

असें म्हणून हैबती सूर्याच्या गतीविषयीं सूक्ष्म माहिती देतो. त्याच्या कवनाला 'लीलावती' ग्रंथाचा आधार आहे.

कवि हैबती म्हणे गणित हे लीलावती साची ।
प्रसन्न नाथ महाराज पूर्ण आहे त्याचा आधार ॥

हैबतीनें एका तुरेवाल्याला लंकेच्या विस्ताराविषयीं सवाल विचारला. तुरेवाल्याला उत्तर देतां आलें नाहीं. परंतु हैबतीचा शिष्य ज्योतीबाळा यानें तें उत्तर दिलें. यांत लंकेसंबंधीं तपशीलवार व आंकडेबद्ध माहिती दिली असून कवनाला 'लीलावतीचा आधार' आहे असें स्पष्ट म्हटलें आहे.

'रोमावळी' अर्थात् शरीरावरील केंसांची संख्याहि हैबती सांगतो. या कवनांतहि हैबतीनें मोठमोठ्या संख्यांचा उल्लेख केला आहे. संख्याशास्त्रांत बरीच प्रगति झाल्याशिवाय हें कवन कुणीहि करूं शकणार नाहीं.

हैबतीला शिल्पशास्त्राचीहि किती सखोल माहिती होती हें 'घराच्या आयांविषयीं' त्यानें केलेल्या कवनावरून दिसून येतें. घरला आठ आये असावेत, ते अमूक ठिकाणीं असावेत, असें तो शास्त्राधारें सांगतो. शेवटीं हैबती म्हणतो —

अष्ट आये याप्रमाणें एका घरामध्यें यावे ।
महिना पाहून उत्तम घर बांधून नांदावें ॥
कवि हैबती म्हणे शिल्पशास्त्रामध्यें हें पहावें ।
हेंच आठाघरीं आठ आये सांगतो चित्त द्यावें ॥
ग्रंथ पाहिल्याविण शब्द कविवर न ठेवावा ।
शिल्पशास्त्र बोलिलें दाखला तो ऐकुन घ्यावा ॥

कवनें करणाऱ्या शाहिरांना संगीतशास्त्राची माहिती यथातथाच असे. परंतु हैबतीनें या शास्त्रांत पारंगतता मिळविली होती. तो प्रतिपक्षाला उघड सवाल करतो—

सहा राग हे कोठुन झाले खुण ठिकाणीं लावावी ।
माता पितां कोण तयाची वस्ती सांग कोणे गांवीं ॥
नांवें मुख्य रागांचीं कोणतीं खुण शास्त्राची लावावी ॥
दिवस मास नक्षत्र कोणते सांग कोण कोठुन झाली ॥
कोणीं प्रगट रागासी केलें कोणीं मिळविलें सुरतालीं ॥

या चढाचें उत्तर देण्यास कोणीहि धजलें नाहीं. हैबतीनें जें उत्तर दिलें त्याचा कांहीं भाग येथें देतों —

भ्रम युगांत निद्रिस्त शिव ते एका समयाला ।
हृदयांतून हुंकार शब्द तो वदनास गे आला ।
त्या शब्दापासुन पुरुष सहा आले जन्माला ॥
सहा रागांपासुन जन्म छत्तिस रागिण्यांला ।
स्त्रिया त्या कोणत्या सांगतो आणा ध्यानाला ॥
मातापित्यासहित परिसा नांवें सर्वांचीं ।
**शिवरामायणीं** कथा सर्व कथिली आहे याची ॥ ¶

---

¶ या चढाचा व उत्तराचा उपयोग श्री. म. ना. सहस्रबुद्धे यांनीं आपल्या एका लेखांत केला आहे.

काव्याला आवश्यक अशा छंद-शास्त्राचाहि हैबतीनें कसून अभ्यास केला होता. याविषयींहि त्यानें एक प्रश्न विचारला असून पिंगलाच्या§ आधारानें त्याचें उत्तर दिलें आहे.

हैबती विचारतो—

> कविमतांचीं पदें कोणतीं कशीं यांचीं नांवें।
> कुण्या पदांचीं किती अक्षरें संमित रथ छंदा पहावें।
> सर्व पदांची अक्षर गणती किती झाली आधिं बोलावें॥

आपल्या उत्तरांत हैबती सांगतो —

> निवड करून सांगतों पदाची जो कवितेचा आधार।
> कोणकोणतीं पदें कशीं हा पिंगल ग्रंथीं आधार॥

याशिवाय वनस्पतिशास्त्र, शरीरशास्त्र, प्राणिशास्त्र इत्यादि अनेक विषयांवर हैबतीनें कवनें लिहिलीं आहेत. विस्तारभयास्तव त्यांचीं उदाहरणें येथें देत नाहीं, परंतु येथपर्यंत जे उतारे दिले त्यांवरून हैबतीची विराट् बुद्धिमत्ता प्रत्ययास येते. हैबती हा त्या काळचा प्रकांड पंडितच होता. कोणतीहि गोष्ट त्याच्या नजरेंतून सुटली नाहीं व नजरेस आलेली कोणतीहि गोष्ट त्यानें अभ्यासल्याशिवाय ठेवली नाहीं. हैबतीनें आपलें ज्ञान लोकांना सांगण्याकरितां त्या वेळच्या लोकप्रिय काव्यप्रकाराचा-लावणीचा-आधार घेतला. परंतु एकीकडे प्राकृतांत केलेल्या या काव्याकडे तत्कालीन विद्वानांनीं दुर्लक्ष केलें, तर दुसरीकडे या काव्यांत शृंगार नाहीं म्हणून त्या वेळच्या बहुजनसमाजानें त्याकडे दुर्लक्ष केलें. ज्ञानेश्वरांनीं अध्यात्म मराठींत सांगून जी महनीय कामगिरी केली तीच-तितक्याच तोलाची आणि योग्यतेची-कामगिरी हैबतीनें शास्त्रज्ञान मराठींत सांगून केली. आज सर्व शास्त्रांचा अभ्यास मातृभाषेंतून व्हावा म्हणून प्रयत्न केले जात आहेत. अशा वेळीं हैबतीनें केलेली कामगिरी विशेष महत्त्वाची वाटते.

---

§ वैदिक छंदःशास्त्रावर यानें ग्रंथ लिहिला आहे.

लीलेनें हाताळण्यांत व तो विशद करून श्रोत्यांपुढें मांडण्यांत हैबतीचा कसा हातखंडा होता, हें दिसून येतें.

हैबतीनें आपली शिष्यपरंपराहि तयार केली होती व ती दूरवर पसरली होती. हैबतीचा प्रथम व प्रमुख शिष्य अमृता कारंडे हाच होय. कृष्णार्जुनांप्रमाणेंच यांची ही जोडी शोभते. हैबतीच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचें श्रेय एकमेव अमृता कारंडे यास आहे. त्याचा दुसरा शिष्य संभूराजू हा होय. संभूराजू स्वतःच चांगला कवनकार होता, परंतु अहंभाव व स्वार्थ यानें प्रेरित होऊन त्यानें आपल्या गुरूशींच प्रतारणा केली. यासंबंधीं माहिती पूर्वी येऊन गेली आहे.

हैबतीशिष्य ज्योति मुळे व गोपाळा हे हैबतीचे मुख्य सुरत्ये होते व स्वतः कवनकारहि होते. ते हैबतीशीं एकनिष्ठ राहिले व चांगले शिकून तयार झाले. कलगी-तुऱ्याच्या वादांत हैबतीला जेव्हां प्रश्न विचारले जात, तेव्हां त्यांपैकीं कांहीं प्रश्नांचीं उत्तरें ज्योति व बाळाच देऊन टाकीत असत. ज्योति मुळे याचें शिंपी घराणें अजूनहि पुसे-सावळीस आहे. हैबतीच्या हस्तलिखितांचीं बाडें या घराण्यांत आजहि आहेत, असें म्हणतात. गोपाळा ऊर्फ बाळा हा तासगांव तालुक्यांतील पलुस गांवचा होय. तेथें त्याची समाधिहि आहे.

भाऊ तुकाराम माळी हा हैबतीचा एकपाठी शिष्य होता. हैबतीवर त्याची फार श्रद्धा होती. कांहींहि करावयाचें झाल्यास तो हैबतीचा अभिप्राय घेत असे. इतकेंच नव्हे, तर हैबतीच्या मृत्यूनंतर त्याच्या समाधीपुढें चिठ्ठ्या टाकून भाऊ माळी कौल घेत असे. त्याच्या मृत्यूनंतर त्याची रक्षा हैबतीच्या घरांत स्थापन करण्यांत आली व तेथें खुणेसाठीं एक दगड ठेवण्यांत आला.

गुणी बाळानाथ लहरी हाहि हैबतीचा प्रिय शिष्य होता. कलगी पक्षाचा कवनकार म्हणून त्याची विशेष ख्याति आहे. तो इचलकरंजीस राहात असे. हबतीस गुरुस्थानीं मानून कवन करणारांपैकीं राजे बापू दुधंडीकर हे हयात आहेत. त्यांचें स्वतःचें बरेंच कवन असून त्यांच्याजवळ हैबतीच्याहि कवनांचा संग्रह आहे. मार्तंडबुवा पंढरपूरकर हे हैबतीचे समकालीन असून कलगी पक्षाचे थोर कवि मानले जातात.

'सवाई माधवराव' या टोपण नांवानें ओळखला जाणारा कलगी कवनकार हाहि हैबती परंपरेंतील होय. पेशवाईत गवळणींना जें हिडीस स्वरूप प्राप्त झालें होतें, त्याचा प्रत्यक्ष प्रतिकार करण्यासाठीं त्यानें कांहीं उत्तम गवळणी

रचल्या. देहाला गोकुळ कल्पून व श्रीकृष्ण हा त्या गोकुळांतील आत्मा कल्पून त्यानें जें रूपक एका गवळणींत रचलें आहे तें फार सरस आहे. त्याचा कांहीं भाग येथें उद्धृत करतों—

भाव-ज्ञान-वैराग्य जमवुनी गोपाळ श्रीहरी ।
प्रेम-पेंद्यास घेउनी चोऱ्या करी गौळ्याच्या घरीं ॥
इच्छा-वासनेची चेष्टा करी, कल्पनेचीं कुचें धरी ।
भ्रांति-कुबुद्धीचे पदर धरतो भररस्त्यावरी ॥
आट्यापाट्या खेळुनी त्ररी षड्रिपुची मस्ती जिरवी सारी ।
हमामा हुतुतुंत नंबर पहिला श्रीहरी ॥
अहंकार-कंस वधिला युद्ध करुनी घनघोरी ।
लोभ मोह क्रम दैत्य नच येती सामोरी ॥

याचप्रमाणें वारूगड (जि. सातारा) येथें राहणारा तात्या गडकर याचीहि परंपरा हैबतीचीच आहे. त्याच्या कवनांपैकीं सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधींचें कवन विशेष महत्त्वाचें आहे. या कवनाच्या प्रारंभीं तो म्हणतो—

अंघ अंधकार धुमधुमकार । देव नव्हे दुनियेला ।
स्मरण निर्गुण निजवस्तुला ॥
निर्गुणामध्यें दोन तीन वस्तू होत्या ठाया ठाया ।
अंधकार होता एकूण बेरजेला ॥

हैबती नाथपंथांतील असल्यामुळें तो जातिभेद व धर्मभेद मानीत नसे. त्यामुळें हैबतीच्या परंपरेंत कित्येक निष्ठावंत मुसलमानहि होऊन गेले. पंढरपूरचे नबी साहेब यांचें नांव कलगी पक्षाच्या फडांत आदरानें घेतलें जातें. रहिमतपूरचे अंड्यांचे व्यापारी दादूमिया हे हयात असून दर गुरुवारीं हैबतीच्या कवनांवरून मोठें भजन करतात. त्यांच्याजवळ हैबतीच्या काव्याचा फार मोठा संग्रह आहे.

सुप्रसिद्ध शाहीर पठ्ठे बापूराव ( रेठरेकर ) याचेवर जंगली महाराजांचा अनुग्रह असल्यामुळें त्यास अध्यात्मज्ञान झालें. परंतु बापूराव औंध येथें नोकरीस असतांना त्यानें हैबतीची कलगी परंपरा आत्मसात् केली. बापूराव सुरुवातीस हैबतीचें नांव सांगून त्याचीं कवनें म्हणत असे. परंतु हैबतीच्या नांवाची एवढी जरब होती कीं, नांव ऐकल्यावर प्रतिस्पर्धी उत्तर देण्यासच धजतना.

यामुळें पुढें पुढें बापूरावानें हैबतीचें नांव कवनांतून गाळून टाकलें. परंतु बापूराव शेवटपर्यंत कलगीवालाच राहिला व हैबतीचीच परंपरा त्यानें चालविली. एकदां बापूरावास एका प्रश्नाचें उत्तर सुचेना म्हणून त्यानें हैबतीच्या समाधीसमोर सात दिवस उपवास केला व त्यानंतर त्या प्रश्नाचें उत्तर त्यास मिळालें असें सांगतात. बापूराव यास हैबतीविषयीं इतका अत्यादर वाटत असे कीं, त्यानें 'हैबती रामायण' नांवाचें काव्यहि रचलें होतें. तें प्रसिद्ध करून त्याच्या उत्पन्नांतून हैबतीच्या समाधीची पक्की इमारत बांधावी असा बापूरावाचा संकल्प होता. परंतु बापूरावाची परिस्थिति खालावल्यामुळें हा संकल्प सिद्धीस गेला नाहीं.

सरतेशेवटीं हैबती परंपरेंतील हयात शाहीर श्रीपती राजाराम थोरवे याचा उल्लेख करतों. श्रीपती कोष्टी असून कवनकारहि आहे. पुसे-सावळीस दर गुरुवारीं हैबतीचीं कवनें तो म्हणतो. हैबतीचीं विविध प्रकारचीं कवनें ऐकण्याचें व हैबतीच्या कार्याविषयीं अधिकृत माहिती मिळविण्याचें आजचें साधन श्रीपती हाच आहे.

हैबतीच्या कार्याचा व्याप आणि पसारा केवढा मोठा होता, हें या सर्व माहितीवरून समजून येईल. इतक्या थोर योग्यतेचा हा कवि १८५४ सालीं दिवंगत झाला. त्याचा आद्य शिष्य अमृता कारंडे याच्या मनांत हैबतीची समाधि बांधावी असें होतें. परंतु स्वतः अमृताहि वृद्ध झाला असल्यामुळें त्याच्या स्वतःच्या हातून हें काम होणें शक्य नव्हतें त्याची ही अखेरची इच्छा त्यानें आपला ज्येष्ठ पुत्र बाबाजी याजपाशीं बोलून दाखविली. परंतु बाबाजीनें टाळाटाळ केल्यामुळें अमृता रागावून पंढरपुरास निघून गेला. पुढें बाबाजी व तिसरा मुलगा लक्ष्मण यांनीं पंढरपुरास जाऊन अमृताची समजूत घातली व त्यास परत आणलें. नंतर अमृताच्याच हस्तें समाधीची पायाभरणी झाली. गोपाळ गवंड्यानें ही समाधि बांधून दिली. त्यांतील पादुकांच्या पायाचें माप आपली चार वर्षांची मुलगी गंगाबाई हिच्या पायाचें घेतलें. सदर गंगाबाई आज हयात असून सुमारें पाऊणशें वर्षांची आहे.

## प्रकरण ७ वें

# हैबतीची योग्यता

हैबती ज्या काळांत जन्मला तो काळ कसा होता, याचें विवेचन आम्हीं प्रारंभीं केलें. पेशवाईच्या शेवटीं लोक सुखलोलुप झालेले होते. वीरांच्या प्रणय-रंगाचा भंग झाला होता व त्याची जागा षंढांच्या शृंगारानें घेतली होती. हैबतीस या अकर्मण्य परिस्थितीचें मनस्वी दुःख झालें व त्यानें या ऐंदी प्रवृत्ती-विरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. तमासगिरांचा विरोध त्यानें तमाशाच्या फडांत उभें राहूनच केला. लोकांना नुसता उपदेश करीत न बसतां त्यानें तमाशा कसा सुधारावा, याचें प्रात्यक्षिक लोकांपुढें ठेवलें. " आधीं केलें मग सांगितलें " अशी त्याची भूमिका असल्यामुळें हैबती ठिकठिकाणीं विजयीच झाला. कांहीं झालें तरी हैबतीचा पक्ष हा सत्पक्ष होता व तमासगिरांचा पक्ष अनीतीचा व अधर्माचा होता. त्यामुळें हैबतीचा पक्ष अगदीं सहजच लोकांस पटत गेला. परंतु हा हैबतीचा व्यक्तिशः विजय होता. त्याच्या विशिष्ट व्यक्तित्वाचा तो प्रभाव होता. हैबतीच्या शिष्यांपैकीं किंवा त्याच्या परंपरेंतील अनुयायांपैकीं कोणीहि हैबतीचें कार्य पुढें चालवूं शकलें नाहीं.

वास्तविक हैबती हा एक गुराखी मुलगा. शिक्षणाचा वा सुसंस्कृतीचा वारसा त्यास मुळींच नाहीं. परंतु बालपणीं त्यानें केलेल्या कवनांत व कथाकीर्तन ऐकण्याच्या तन्मयतेंत त्याच्यांत प्रसुप्त असलेला दैवी अंश दिसून येतो. आपल्या हातून महत्कार्य व्हावें, अशी तर मनापासून तळमळ, पण लक्षांत कांहीं राहत नाहीं म्हणून परम दुःख अशी मनःस्थिति, हें देखील असामान्याचेंच लक्षण आहे. अशा द्विधा मनःस्थितीनें बेचैन होऊन प्राणत्याग करावयास असामान्या-शिवाय कुणीहि उद्युक्त होत नाहीं. गोपाळनाथांच्या योगदृष्टीला हैबतींतील दैवी अंश स्पष्ट दिसला, किंबहुना हा दैवी स्फुलिंग जागृत करण्याची कामगिरी परमेश्वरानेंच त्यांच्यावर सोंपविली. बुद्धीवरचें मलिन पटल गुरुकृपेमुळें दूर झालें व तत्कालीन ज्ञानाच्या सर्व शाखांचें आकलन करण्यास समर्थ अशी प्रतिभा पुढें झळकूं लागली.

हैबतीची प्रकृतीच ज्ञानवंत पंडिताची होती. परंतु तत्कालीन पंडितांप्रमाणें तार्किक वाद आणि शब्दच्छल यांच्या जाळ्यांत गुंतून न राहतां तो एका

विशिष्ट ध्येयाच्या मागें लागला. त्या काळीं समाजाची जी अधोगति होत चालली होती, तिचेंच बाह्य गमक शृंगारिक लावणी हें होतें. समाजाला अंतर्मुख बनविल्याशिवाय त्याला आपली चूक कळून येणार नाहीं व अंतर्मुख बनवावयाचें असेल तर या आघुकमाघुकांच्या गाण्यांपासून त्याला परावृत्त केलें पाहिजे, अशा विचारानें हैबती आपली काव्यरचना करूं लागला. नानाविध विषयांवर त्यानें काव्यरचना केली व त्यावरून त्याची एकंदर कवनसंख्या एक लक्ष साठ हजार आहे असें सांगितलें जातें. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेवर त्यानें कवन केलें. प्रज्ञावंताला आकलन होत नाहीं असें काय आहे ? ज्ञानेश्वरांचेंच उदाहरण घेऊं. वास्तविक ज्ञानेश्वर हे विरक्त संन्यासी. संसाराचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना कोठला ? पण त्यांनीं असंख्य प्रकारचे दाखले आणि दृष्टान्त अगदीं समर्पक अर्थानें दिले आहेत. प्रज्ञा ही सर्वंकष असते. ' न कश्चित् धीमतां अविषयो नाम । ' हेंच खरें. हैबतीच्या बुद्धीची झेप पाहिली म्हणजे सूर्यबिम्बावर उडी घेणाऱ्या हनुमन्ताचीच आठवण होते. कोणताहि विषय हैबतीच्या नजरेंतून सुटला नाहीं. परंतु त्यानें हाताळलेले विषय गंभीर असूनहि त्यानें सर्व विषयांचें विवेचन अगदीं शास्त्रीय पद्धतीनें केलें आहे. कोणत्याहि गोष्टीविषयीं माहिती देतांना ग्रंथाधार दिल्याशिवाय हैबती बोलत नाहीं. म्हणूनच त्याचें काव्य अत्यंत आदरणीय वाटतें.

" नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते " या मल्लिनाथी प्रतिज्ञेप्रमाणें आपली रचना करणारा हैबती हा एकमेव शाहीर व कवि होता, असें म्हणण्यास कोणता प्रत्यवाय आहे ? हैबती आत्मविश्वासानें म्हणतो—

कविराज हैबती अखंडित शास्त्रयुक्त करितो गान ।
विन आधारी कवन करतां त्यास कोण करतो मान ॥
कवितेसी वरदान निरंजन नाथ मति देनेवाला ।
कृपाहस्त शिरीं आहे कृपेनें श्रीदाला ॥
कवि हैबती करि कवन ग्रंथाची सड धरून ।
नाथ निरंजन वरद अक्षर येती रस भरून ॥

आक्षेपकांना हैबती म्हणतो कीं, तुम्ही माझ्या कवनांवर अंधविश्वास ठेवूं नका.

आक्षेप घेणें असेल तर मग भागवतीं पाहणें ।
अंतर नाहीं यांत खचित सांगणें अर्थ भरती ॥

दीड लावणी रचून जे शाहीर झाले त्यांना हैब्रती सांगतोः—

ब्रिद डफावर लावुन गातां मनीं वाहतां अभिमान ।
उत्तर बोला सत्वर आतां पाहुं नका हो अनुमान ॥
जरी सुचेना तरी बसेल अब्रुला धोका या क्रमी नं ।
कवि हैब्रती म्हणे मिरविलें ज्ञान फार भरमानं ॥
प्रसन्ननाथ महाराज कृपेचे कृपा आवरण भवताली ॥

पांडित्याचा बडेजाव न करतां पांडित्यपूर्ण काव्यरचना करणारा हा शाहीर होता. रामजोशी, होनाजी इत्यादिकांची काव्यरचना अधिक रसाळ होती, कारण त्यांचे विषयच तसे होते. पण हैबतीसारखी काव्यरचना दुसऱ्या कोणत्याहि शाहिरानें केली नाहीं. शास्त्रीय उकल ज्यांत आहे अशी अर्थपूर्ण काव्यरचना करणारा हा पहिला शाहीर होय. याचें कारणच हें कीं, हैब्रतीची प्रतिभा ही खरी पंडिती प्रतिभा, परंतु केवळ देशकाल परिस्थितीला अनुसरून ती प्रतिभा शाहिरी स्वरूपांत अवतरली. हैबतीची प्रतिभा अशी उच्च दर्जाची होती. म्हणूनच—

कविराज हैब्रती कलगीवाला ।
धाक वैऱ्याला ॥
कविराज हैबती म्हणे काय करशिल नुसत्या ढोंगा ।
शरणांगत जावें कविला ॥
सभेंत उत्तर बोला गुरुकृपा आहे पुरती ।
परस्परा समजेल कुशलता ज्ञानाची होईल झडती ॥
सवाई डफावर ब्रिद कविता शास्त्र सम्मताची ।
वैरी पाहुन लाजती कविता निर्मळ अर्थाची ॥
तुम्ही बैसला पंडित शहाणे शास्त्र सांगणार ।
कळल प्रसंगीं आतां कसा ज्ञानाचा विचार ॥
फार बोलणें काय करावें बडबड शब्दांची ।
नेमकींच उत्तरें वदावीं निर्मळ यमकांचीं ॥
गैर अर्थी बोलणं नव्हे तें किरकिर कामाची ।
शहाणे ठेवतील नांवें तयाला म्हणतील अर्वाची ॥
समयोचित बोलतो त्यास म्हणती तार्किकवादी ॥

हैबती हा ' अणोः अणीयान् महतः महीयान् ' अशा सर्व गोष्टींचा विचार एकसमयावच्छेदें करणारा होता. ' पृथ्वीची मोजणी ' या नांवाच्या आपल्या काव्यांत तो लांबी मोजण्याचीं परिमाणें देतो.

| | | |
|---|---|---|
| २ अणु | = | १ त्रसरेणु |
| ८ त्रसरेणु | = | १ रथरेणु |
| ८ रथरेणु | = | १ बालाग्र |
| ८ बालाग्र | = | १ लिक्षा |
| ८ लिक्षा | = | १ यूका |
| ८ यूका | = | १ जव |
| ८ जव | = | १ बोट ( रुंदी ) |
| ४ बोटें | = | १ मूठ |
| ६ मुठी | = | १ हात |
| ४ हात | = | १ धनुष्य. |
| २००० धनुष्यें | = | १ कोस |
| ४ कोस | = | १ योजन. |

आज गणिताच्या क्रमिक पुस्तकांतून ' जवा 'पासून पुढचीं परिमाणें दिलेलीं आढळतात. परंतु त्यापेक्षांहि सूक्ष्मातिसूक्ष्म परिमाणें हैबतीनें दिलीं आहेत. एका जवाचा १/५१२ भाग म्हणजे एक बालाग्र किंवा सुईचें अग्र व एका सुईच्या अग्राचा १/१२८ भाग म्हणजे ' अणु ' असें हैबती म्हणतो. ही सर्व माहिती त्यानें ' लिलावर्तकानें ' गोळा केली असें तो शेवटीं सांगतो. याचा अर्थ ' लीलावती ' ग्रंथावरून व आपला स्वतःचा तर्क चालवून त्यानें ती माहिती गोळा केली असावी, असें वाटतें. ही माहिती आधुनिक अणुसिद्धान्ताशीं जुळणारी नाहीं हें खरें, परंतु कोणत्याहि साधनसामग्रीच्या अभावीं पूर्वीच्या विद्वानांनीं शास्त्राच्या बाबतींत जो दूरवर विचार केला होता तो ध्यानीं घेतां त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल कौतुक वाटतें. आधुनिक शास्त्रीय शोध प्राचीन लोकांना जसेच्या तसे माहिती होते असें म्हणणें दुरभिमान ठरेल, परंतु त्यांना कांहींच माहीत नव्हतें व सगळें शास्त्रीय ज्ञान काय तें पाश्चात्यांसच माहीत आहे, असें म्हणणें ही बौद्धिक गुलामगिरी ठरेल. प्राचीन लोकांस जें माहिती होतें तें आजच्या ज्ञानाच्या तुलनेनें स्थूल स्वरूपाचें होतें, इतकें

मान्य केलें तरी पुष्कळच झालें. कोणत्याहि शोधाचा इतिहास पाहिला तर असेंच दिसून येईल कीं, तत्संबंधीं स्थूल सिद्धान्तच प्रथम मांडला जातो व त्याचें सूक्ष्म विवेचन व विस्तार हा त्यापुढें शतकानुशतकें होत राहतो. म्हणून हैबतीनें जी माहिती दिली आहे ती विचार करण्यासारखी आहे. इतकेंच नव्हे, तर त्याच्या माहितीचीं साधनें जर आज उपलब्ध झालीं तर त्यांवरूनहि आपल्या प्राचीन ज्ञानोपासनेवर पुष्कळच प्रकाश पडण्यासारखा आहे.

वरील कवनाचा उत्तरार्ध याहिपेक्षां मनोरंजक आहे. हैबती सांगतो —

१०० गांवें = १ देश

१०० देश = १ मंडळ

१०० मंडळें = १ खंड

९ खंडें = पृथ्वी

यावरून पृथ्वीचा विस्तार ९० लक्ष गांवांचा आहे, असें हैबतीला म्हणावयाचें आहे. एका गांवाचा विस्तार किती हें या कवनांत दिलेलें आढळत नाहीं. परंतु पृथ्वीचें क्षेत्रफळ २० कोटी चौरस मैल आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे एका गांवाचें क्षेत्रफळ सुमारें २२ चौरस मैल भरतें. प्रत्येक गांव ४ ते ५ मैल लांब व रुंद असें सरासरीनें धरलें तर हैबतीनें दिलेला पृथ्वीचा विस्तार प्रत्यक्ष सत्याशीं किती जुळतो हें पाहून आश्चर्य वाटतें. याहि बाबतींत असेंच म्हणावेंसें वाटतें कीं, हैबतीनें दिलेली ही पृथ्वीची मोजणी शास्त्रीय परिमाणांत दिलेली नसली किंवा कोणत्याहि सूत्राच्या आधारानें दिलेली नसली तरी त्यानेंहि कांहीं परिमाणें दिलींच आहेत. परिमाणें ऐच्छिक असतात ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे हैबतीच्या परिमाणांवर निःपक्षपाती बुद्धीला आक्षेप घेतां येत नाहीं. हैबतीच्या काळीं आधुनिक शास्त्रज्ञांना उपलब्ध असलेल्या विराट दूरवीक्षिका नव्हत्या, कीं प्रयोगशाळेंत वापरल्या जाणाऱ्या सूक्ष्मवीक्षिकाहि नव्हत्या. तर मग प्राचीन लोकांना हें ज्ञान प्राप्त झालें कोठून, हाच महत्त्वाचा प्रश्न नाहीं काय ? त्यांनीं आपलें सर्व ज्ञान दीर्घ आणि सूक्ष्म अवलोकनानें व मानसिक चिन्तनानें मिळविलेलें असो, किंवा त्यांनीं तें अतींद्रिय साधनांनीं मिळाविलेलें असो, कांहींहि असलें तरी प्राचीनांच्या ज्ञानार्जनाच्या पद्धति आजच्यापेक्षां पुष्कळच भिन्न व म्हणूनच विचारणीय होत्या, असें म्हणावेंसें वाटतें.

वास्तविक शाहिरी काव्य हें मूलतः भेदिक स्वरूपाचें. आत्मानात्मविचाराचें रहस्य किंवा भेद ज्यांत चर्चिला जातो असें हें भेदिक कवन असतें. अध्यात्मा-विषयींचे कूट प्रश्न व त्यांची उकल हाच भेदिक कवनांचा गाभा होय. पेशवाईच्या उत्तरकालीं जे तमाशे उदयास आले त्यांत शृंगारावरच भर असे व भेदिक कवन केवळ नांवापुरतें असे. एखाद्या चंगीभंगी माणसानें लोकांना दाखविण्यापुरता गंधाचा टिळा लावावा तसें, किंवा अनीतीनें भरलेल्या पुस्तका-वर एखादें सोवळें नांव छापलेलें असावें तसें, शृंगारिक तमाशाची बूज राखण्या-करितां थोडेंसें भेदिक कवन शाहीर तमाशाच्या शेवटीं म्हणत. पेशवाईतील शाहिरी मध्यान्हीच्या या रखरखीत उन्हांत भेदिक कवनांचा होम होतो कीं काय, अशी आशंका विचारवंतांस वाटत होती. हैबतीनें या भेदिक कवनांचा जोरदार प्रचार करून त्यांना नवजीवन प्राप्त करून दिलें. हेंच हैबतीचें अवतारकार्य होय. खरोखरच, हें काम अत्यंत दुष्कर होतें. कारण अनीतीचा ढोल बडवला जात असतां अध्यात्माच्या टिमकीचा आवाज कोण ऐकून घेणार? तथापि हैबती हा खमक्या शाहीर होता. विरोधाच्या प्रचंड लढ्याला त्यानें एकट्यानें खंबीरपणें जन्मभर तोंड दिलें. सुष्ट आणि दुष्ट यांच्या झगड्यांत सुष्टांच्या बाजूला मनुष्यबळ नेहमींच कमी असावयाचें, हा इतिहास-पुराणांचा दाखला आहे. त्याचेंच प्रत्यंतर हैबतीच्या बाबतींत येत होतें. परंतु हैबतीनें हें कार्य केल्यामुळेंच आपल्या संस्कृतीच्या इतिहासांत त्याला फार मोठें मानाचें स्थान द्यावें लागतें.

जनकाच्या राजदरबारीं याज्ञवल्क्य हा नवविचारप्रवर्तक असल्यामुळें त्याचे इतर पंडितांबरोबर कडाक्याचे वाद होत. विषय अर्थातच आध्यात्मिक असत. एकदां गार्गी या विदुषीनें याज्ञवल्क्यास गैरप्रश्न विचारला असतां त्यानें गार्गीस बजावलें होतें कीं, गैरप्रश्न आला तर मस्तक अलग होईल. या प्रसंगाची आठवण हैबतीनें इतर शाहिरांबरोबर जे सामने केले त्यांवरून होते. आठव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेलेल्या शंकराचार्यांनीं मंडनमिश्रा-बरोबर जे वादविवाद केले त्यांचेंहि स्वरूप असेंच होतें. हैबतीची स्वयंप्रज्ञा आचार्यांइतकी उच्च दर्जाची होती असें नाहीं, परंतु सांस्कृतिक न्हासाच्या काळीं हैबतीनें केलेली कामगिरी मात्र आचार्यांच्या महनीय कामगिरी-सारखीच आहे.

हैबतीच्या अंगीं कोणत्याहि विषयाचें सार चटकन् ग्रहण करण्याची विलक्षण शक्ति होती. अगस्तिरामायण, वाल्मीकिरामायण, शिवरामायण, महाभारत, भागवत, वाल्मीकि श्लोक, शुक्राचार्य टीका, पिंगलग्रंथ, लीलावती ग्रंथ, गीता, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि अनेक ग्रंथांचा त्यानें खोल अभ्यास केला होता. याशिवाय त्यानें अनेक शास्त्रीय ग्रंथ वाचले असावेत किंवा त्या त्या शास्त्रांचा अभ्यास केला असावा असें दिसतें. ज्योतिष, गणित, स्थापत्यशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, शरीरशास्त्र, कामशास्त्र, संगीतशास्त्र इत्यादि नानाविध विषयांवर त्यानें कवनें केलीं. या साऱ्या विषयांचें ज्ञान संस्कृतांत होतें, तेंच मराठींतून बहुजनसमाजाला समजेल असें करून सांगितलें. संस्कृताचें कुंपण मोडून, संस्कृताची कोंडी फोडून, महाराष्ट्रीय संतांनीं बहुजनसमाजाला अध्यात्मज्ञानाची वाट मोकळी करून दिली. हैबतीनेंहि अध्यात्म, वेदान्त, ब्रह्मज्ञान इत्यादि विषयांवर कवनें लिहून हें काम केलें. पण तो तेवढ्यावरच थांबला नाहीं. मराठीच्या सोपानानें ज्ञानाच्या दालनापर्यंत जाऊन पोंचण्याचा मार्गहि हैबतीनें दाखवून दिला. यावरून हैबतीची योग्यता किती मोठी होती हें सिद्ध होतें.

इतक्या थोर योग्यतेचा हा शाहीर असून हैबतीच्या गुणांचें चीज कधींच नि कुठेंच झालें नाहीं. पेशवाईतला सारा समाज सुखलोलुप झाला होता. ‘ सुखं च मे शयनं च मे ’ हा मंत्र नुसताच उच्चारला जात नव्हता, तो एकांगीपणानें आचरिलाहि जात होता. अशा या निष्क्रिय आणि भोगलंपट समाजांत हैबतीच्या गुणांची कदर करणारा असणार कोण ? हैबतीला राजाश्रय मिळाला नाहीं, परंतु हैबतीला त्याची अपेक्षाहि नव्हती. शिवाजीमहाराजांनीं तुकोबारायांना नजराणा पाठविला, पण तुकोबांनीं तो तसाच परत केला. कारण —

आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ।।
तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ।।
कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ।।
म्हणतां हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ।।

अशीच वृत्ति हैबतीची होती. तथापि त्या काळच्या पंडित आणि गुणी लोकांनाहि हैबतीची योग्यता कळूं नये, हें महाराष्ट्र सारस्वताचें दुर्भाग्य होय. त्या वेळीं लोकांनीं हैबतीची उपेक्षा केली व इतर शाहिरांना डोक्यावर

नाचवून त्यांचा उदोउदो केला. आज काळानें या गोष्टीचा सूड घेतला आहे. उपेक्षित हैबतीचीं कवनें ज्ञानोबा-एकनाथ-तुकारामांच्या कवनांप्रमाणें आजहि भजनी मंडळींत गायिलीं जातात. " कवि हैबती नाथनिरंजन " चा नामोच्चार अजूनहि आदरानें आणि भक्तिभावानें केला जातो. परंतु इतर शाहिरांचीं शृंगारिक कवनें स्मृतिशेष होत आहेत. रामजोशी व होनाजीबाळा यांच्या आयुष्यावर चित्रपट निघतात, तेव्हांच लोकांच्या तोंडीं कांहीं दिवस त्या त्या शाहिरांचीं कवनें असतात व याचें श्रेय जातें चित्रपटाच्या संगीत-दिग्दर्शकाकडे. परंतु खड्या तमाशांत या शाहिरांचें नांवहि निघत नाहीं व त्यांचीं कवनेंहि कुणी गात नाहींत. तमाशांतून सरसहा चित्रपटगीतें म्हटलीं जातात. शाहिरांच्या काव्याला त्या काळीं जें महत्त्व दिलें गेलें तें अवास्तव नि अयोग्य होतें. काळाच्या ओघानें त्यांचें स्थान निश्चित केलें आहे. त्या काळच्या परिस्थितीची, रंगेलपणाची, सुखासीनतेची, गतवैभवाची आठवण करून देणारें सुरस काव्य म्हणून आजहि त्याचें महत्त्व आहे. परंतु हैबतीचें कवन यापेक्षां अधिक महत्त्वाचें आहे, कारण त्याचे विषय शाश्वत आहेत. (इतर तमासगिरांनीं बाया नाचविल्या, तर हैबतीनें फक्त नाच्या पोऱ्याच आपल्या तमाशांत नाचविला.) तत्कालीन तमाशाला स्त्रिया व मुलें जात नसत, इतका तो बीभत्स होता. उलट हैबतीच्या तमाशाला कीर्तनाप्रमाणें कोणीहि येऊन बसावें, इतका तो सोज्वळ होता. करमणूक करतांनाहि नीतीचीं बंधनें पाळलीं पाहिजेत. कलेनेंहि नीतीचा कल सांभाळला पाहिजे, असा हैबतीचा कटाक्ष होता. म्हणूनच हैबतीच्या तमाशांत बायांना स्थान नव्हतें व बाया नसल्यामुळें दौलतजादाहि नव्हता. थोडक्यांत सांगावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, हैबतीच्या रंगतीचें बाह्यस्वरूप तत्कालीन तमाशासारखें, तर त्याचें अंतरंग कीर्तन-प्रवचनासारखें होतें. आजहि एखाद्या ' राष्ट्रीय कीर्तनकारा 'नें पायांत घुंगुर बांधून व एखादा पोऱ्या नाचावयास ठेवून कीर्तन केलें तर त्याचें स्वरूप हैबतीच्या तमाशासारखें होईल. यावरून हैबतीनें केलेल्या उपक्रमाची कल्पना करता येईल. हैबतीचा हा प्रयत्न निःसंशय एक क्रांतिकारक प्रयत्न होता. राष्ट्रीय कीर्तन आणि मातृभाषेंतून शिक्षण या ज्या गोष्टी हैबती-नंतर शंभर वर्षांनीं पुढें आल्या, त्यांचीं बीजें हैबतीच्या कार्यांत आहेत. यांतच हैबतीचें असामान्यत्व आहे. हैबतीच्या प्रयत्नामुळेंच पुसे-सावळी (किंवा

पुसावळी ) हें भेदिक कवनाचें केन्द्र अथवा आखाडा बनलें. आम्हीं हैबतीला कलगी-सम्राट् कां म्हटलें आहे तें त्याच्या या चरित्रावरून स्पष्ट होईल. हैबतीची बुद्धिमत्ता विशाल, कुशाग्र, प्रगल्भ आणि सर्वसंग्राहक अशी होती. तो एक चालताबोलता ज्ञानकोश ( Encyclopaedia ) होता. आजच्या भाषेंत त्याला त्या काळचा 'ब्रेन ट्रस्ट' (Brain Trust) म्हणतां येईल. शास्त्रसंमत कवनांचा अजबखाना त्याच्या एक लक्ष साठ हजार कवनांत भरलेला आहे. यांतील फारच थोडीं आज उपलब्ध झालीं आहेत. पुरेसें मनुष्यबळ व द्रव्यबळ मिळाल्यास हैबतीचें सारें कवन उपलब्ध होण्यासारखें आहे. ज्ञानाचें एवढें भांडार नामशेष होऊं नये म्हणून संशोधनाच्या कामाला उत्तेजन देणें हें लोकनियुक्त सरकारच्या हातीं आहे. त्यासाठीं स्वतंत्र अधिकारी नेमून व एक खातें उघडून हें काम पार पाडलें पाहिजे. महाराष्ट्र-शारदेच्या दरबारांतील या उपेक्षित मानकऱ्याचें काव्य जतन करण्याचें कार्य जनतेनें व सरकारनें तांतडीनें हातीं घ्यावें, अशी आग्रहाची विनंती करून आम्ही वाचकांची रजा घेतों.

# कवन

## गण

### १

श्रीगजानना गणपति । मंगलमूर्ति । द्यावी मज मती
समारंभाला । हो । प्रसन्न व्हावें मजला ।। ध्रु० ।।
तुझें नाम कोणी न घेती । शीघ्र कवि गाती । यश
नाहीं त्याला । फड प्रसंगाला । तिन्ही लोक सिद्ध
नाथ म्हणती । गंगा पार्वती । आवड सांबाला । हो ।
ब्रह्मा विष्णूला ।। १ ।। कविराज म्हणे हैबति । नमुन
गणपति । कलगी डफाला । हो । धाक वैऱ्याला ।। २ ।।

* * *

### २

( कलगी-तुऱ्याच्या गाण्यांतील हैबतीबुवांचा गण )
गणराज यावें गणपती । करतों मी स्तुती । सभेमध्यें
तुजला । प्रसन्न व्हा मजला ।। ध्रु० ।।
तुझें नाम कोणी न घेती । शीघ्र कवि गाती ।
यश नाहीं त्याला । फड प्रसंगाला । त्रिलोक
नाथ सिद्ध म्हणती । गंगा पार्वती – आवड
सांबाला । ब्रह्मा विष्णुला । कविराज म्हणे हैबति ।
कलगीवाला धाक वैऱ्याला ।। जी जी ।।

* * *

ह्या गणांत खोच आहे व ती खोच प्रभावी आहे. हैबतीचा पक्ष कलगीचा, हें या गणांतील स्पष्ट वचनानें सिद्ध होतें.

### ३

गण गणपति सरस्वती नमो गण थोर । आधि नमितो
माता-पिता । तेथुनी जग सारें । मातोश्रीनें दूध पाजिलें ।
अमृताची धार । केला हाताचा तिनें पाळणा । माया
लोभ फार । केले नेत्राचे दिवे जिनें भोगले कष्ट फार ।
कवि हैबति म्हणे मायेचा मोठा उपकार ।।

* * *

ह्या गणांत कवीनें आपल्या मातापित्यांना वंदन केलें असून आईचें ( मातेचें ) महत्त्व सांगून तिचा महिमा गाइला आहे. ( कोणी म्हणतात, कलगीला माया असें समजून तिचें महत्त्व रूपकांत दाखविलें आहे. )

# कवन

१

अर्थशून्य मनाचें चळण। ऊर्ध्व शून्य दुजा तो पवन।
जिवाची उत्पत्ती मायामय। प्रवाही कारण।
निश्चय मसुर पांडुरंग पाही। महाशून्य तेंच वीट जाण।
ऐशी शून्याची वाट दाविली। तोची सद्गुरु संपन्न।
कृपाहस्त शिरीं ठेवुनि दाविली अंतरींची खूण।

* * *

(शून्याकार परब्रह्माचा मार्ग जो दाखवितो तो सद्गुरु होय, असें हैबती या कवनांत सांगतो.)

२

धन्य आजी सद्गुरुपद जोडिलें। ध्रु० ॥
सद्गुरुची होतां भेटी। पवित्र झाली माझी रहाटी।
अचाट कर्म दंडिलें[1] ॥ १ ॥
धन्य सद्गुरुची कला। निजपद दाविलें डोळा।
आनंदमय बुडालें ॥ २ ॥
सद्गुरु धरितां हातीं। पालटली ही मनोवृत्ती।
षड्वैरी गाडिलें ॥ ३ ॥
हैबति पूर्ण माऊली। नाथ हरिनें कृपा केली।
पूर्वस्थळा धाडिलें ॥ ४ ॥

* * *

३

अवघड गुरुरायाचें राहणें मोठें कठीण। रान आऊट हताची गणती। तयामध्यें कीं सावज फिरती। तीं परमार्थाच्या वाटेवरती। बैसली मुख पसरून ॥ध्रु०॥ ज्याला सद्गुरुकृपा नाहीं। तो रान धुंडाया जाई। तो जिता मेला जाळींत गुंतून राही। व्याकूळ होऊन ॥ १ ॥ ज्यानें ज्ञानकुऱ्हाड घेतली। त्यानें अवघी झाडी तोडली। सावजे गेली केले मैदान ॥ २ ॥ ज्यानें रान मैदान केलें। ते आत्मस्वरूपी मिळालें। नाथकृपेनें हैबती बोले। शाश्वतिचें वचन ॥ ३ ॥

* * *

---

१. कर्मांचा नाश केला.

४

शिष्याप्रती गुरुनाथ कथितो ब्रह्म स्वरूप ज्ञान ।
सगुण आणि निर्गुण अंतरीं घे हें समजून ॥ ध्रु० ॥
सगूण म्हणजे ॐकार गुणास अकार विश्वाचा ।
धारण केला ज्यानें ठाव तो सगूण ब्रह्माचा ।
जेथून जाहला असें पहातो उगम त्रिगुणाचा ।
रजतमसत्त्वापासून झाला आकार पिंडाचा ।
पिंडी पद तें पाहा अनुभव घेया स्वरूपाचा ।
आत्माराम तो साक्षी असे या तीनही अवस्थांचा ।
" ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म[1] " हें बोले भगवान ॥ ध्रु० ॥
सगुण साक्षात्कार झाल्यावर मग निर्गूण ।
होय बोध तो सगुण कदा नोहे जाण ।
म्हणून आधीं सगुण ओळखी स्वात्मप्रचितीनं ।
ओळख पटली त्यासी म्हणती तें झालें आत्मज्ञान ।
षड्शास्त्र संभव असे जरी वेदवक्ता पूर्ण ।
आत्मज्ञानाविण जळो तयाचें धिक् जन्म जाण ।
काय करावें बहुत ज्ञान तें न कळे गुरु खूण ।
आतां ऐक निर्गुण बोध घे ओळखून हृदयांत ।
चौ देहामधीं परात्पर तो दावी गुरुनाथ ।
ब्रह्मांडिंचा चतुर्थ देह महाकारण म्हणत ।
त्यांत असे वास्तव्य तेंचि निर्गुण जाण खचित ।
अक्षर ब्रह्म म्हणती अथवा उनमनाही तेथ ।
पूर्ण जरी गुरुकृपा होईल तर येईल प्रचित ।
निरविकार निवृत्ती पदी त्या वृत्ती करी लीन ।
अहंभावें स्फुरण तेची माया जेथुन झाली ।
स्फुरण साक्षीत ओळखी हीच गुरुकिल्ली ।
ज्ञान ज्ञानादित अशाही निज वस्तु कळली ।
आपण तोचि झाल्या द्वैत भावना विरून गेली ।
म्हणे हैबति अद्वैतबुद्धि त्या समरसली । १

---

१. श्रीभगवद्गीता, अ. ८, श्लो. १३ पहा.

परब्रह्म मग वस्तु निरंजन तेचि होऊन ठेली ।
द्वैताद्वैत भान हरपलें गेलें मी–तूंपण ॥

* * *

( सगुण-निर्गुणाचा बोध झाल्यावर द्वैतभाव नाहींसा होतो, यावरून हैबती हा अद्वैतमताचा पुरस्कर्ता होता असें दिसतें. )

५

## ( गुरुमार्ग )

आपुल्या आर्तिंचे देणें देतासी । श्रीसमर्थ सद्गुरु
ध्यानी । तुला मिळविले आपल्या पणी । श्रीसद्गुरुनी ।
दिले बीजमंत्र अक्षर कर्णी पुटी पेरुनी । दाविले
नयनी । उद्धारुनी । स्थूल सूक्ष्म कारण ते तिन्ही ।
देह सारुनी । वस्तिशी केले महा कारणी । ती इति
उन्मनी सतरावी संजीवनी । तया सानंद उन्मनी ।
सहस्रदळा वरुते । प्रतिबिंब भासे दर्पण ॥ ध्रु० ॥
अनुहत[१] ध्वनी वरती । चंद्रमा आहे मरुथळा ।
अनु आग्रहा समगति । तयामधुनि नेलें मजप्रति ।
औट पिटाचे वरी दैवते पाच असें भासती ।
परंतु एकरूप असती । औट पिटाखाली राहिले
नेले मज वरले खणी ॥ ध्रु० ॥
तेथुन पश्चिम मार्गाहुन । गगन दिसे । एकली एकच
सुंदर असे । मार्गच नाहीं तेथें । जावें कोण्या युक्ति
कैसे । म्हणून शुन्यक चढतसे । उर्ध्व चिनमनी
नेत्रतुल्य असे । पुढें तिचें फळ भोगून जात असे ।
ते नर नाहीं नपुंसक असे । झाले अवघे पाणि ॥ ध्रु० ॥
तया नरेशी आंग मधुनी वाट दावील ।
लोट स्वरूपाची ही लागली । तया ठिकाणीं शुद्ध
ब्रह्म निर्वाण । वस्तु सापडली । ज्यातिमध्यें
समावली । हैबती म्हणे हित करारे सद्गुरु ॥ ध्रु० ॥

* * *

१. अनुहत ध्वनीचा उल्लेख योगविद्येच्या दृष्टीनें ज्ञानेश्वरादि संतांनीं केला आहे.

## ६

## ( गुरुमार्ग )

गुरुमार्ग मना सावध राहे स्वरूपीं अक्षय ब्रह्म स्मरुनि ।
निशि दिनी मनी ध्यास असु दे गुरुपद आठवोनी ।
भेट भ्रमातें सोडी निरंजन नाथपदा नमुनी ।
परब्रह्म तूं पूर्ण परात्पर ध्यानी हेंचि धरूनी ।
अव्यक्त ब्रह्म हें व्यक्तिस आलें विश्व स्वरूप मानी ।
निर्गुण तेची सगुण झाले अशी वेदवाणी ।
निराकारी आहाकार जेवी ब्रह्मी माया राणी ।
ॐकार झाला पाहतां दिसतो जैसा सुवर्णी ।
तरंग जैसा सोडून नाहीं आंत बाहेर पाणी ।। धृ०।।
पाण्यापासुनि गार झाली गारेमध्यें पाणी ।
तंतूपासुनि पट झाला पटी न दुजे तंतूवांचुनी ।
मृत्तिकेचा घट, घटीं मृत्तिका समजोनी ।
ब्रह्मापासून विश्व झालें ब्रह्मरूप मानी ।
आकाशापोटीं ढग येती जाती ।
जाती विरुनी तेवी ब्रह्मी विश्व होतसे नाथ असें मानी ।
होत जात हे विकार निर्विकार नसे म्हणुनी ।
होत जात कल्पना ज्ञानानें होत जात त्यासवे ।
जागृतीमाजी इंद्रिय राहती त्यासी जाणे स्वभावे ।
हे माया जेथुनि झाली । स्फुरण साक्षीत ब्रह्म ओळखी
हीच गुरुकिल्ली । ज्ञाना ज्ञानातीत अशी निजवस्तु
जरी कळली । आपण तेचि झाल्या द्वैत भावना विसरून गेली।
म्हणे हैबती अद्वैतबुद्धि समरसली ।
परब्रह्म मग वस्तु निरंजन तेची होऊन ठेली ।
द्वैताद्वैत मग भान हरपले गेले मी-तू पण ।।

* * *

७

( साकी )

धाव पाव सद्गुरू दयाळा तारका गोविंदा !
तुझें नाम स्मरिता साधुजन गेले वैकुंठीं निजपदा ॥
§ सहा, चार, आठरा, भागले अंत लागेना तुझा कदा ।
बोले गुणी हैबति देवा तुझे चरणावर मस्तक सदा ॥

* * *

८

पार्थ सखया देवकीतनया धाव पाव तूं लौकरी ।
दीन जनाकारणें येवुनी उभा राहिला विटेवरी ।
भक्तासाठीं होऊन कष्टी कर ठेवुनी कटेवरी ।
गुणी हैबति म्हणे चला जाऊं पांडुरंगासी पाहुं तरी ॥ १ ॥

* * *

९

पंढरीनाथा श्रीभगवंता नाम तुझें अमृत ।
उदार देहाचा देता झाला तरले साधुसंत ।
भक्तासाठी धरला अवतार या कलींत ।
करा दासावर दया महाराज रुक्मिणीच्या कान्त ।
प्रसन्न नाथ महाराज हैबती गातो नीत[१] ।
धरा गुरूचे पाय तुम्हां दावी विठ्ठलाची मूर्त ॥

---

§ सहा शास्त्रें, चार वेद, अठरा पुराणें.

१ नीत = नित्य.

# देवास प्रार्थना

## १

दिनजनतारक सुखदाई । ए पंढरपुरची आई ।।
विठ्ठला विषयलोभ मायाजाळीं । पडलों बहुत जंजाळी ।।
संसारदुःखाची जाळी । गुंतलों जसा मीन जळीं ।।
कामानळ हृदय जाळी । अंधार गडद तम जाळी ।।
चाल— याविषयीं मनीं जरी धरिसी । तरी यांतुनि पार करिसी ।
उद्धरसी अवघड कांहीं । घातली दृढ मिठी पायीं ।। १ ।।
हरि तारिलेंसी बहुताला । तें ठाऊक आहे संताला ।।
मी बुडतों या वक्ताला । मज काढि धरूनि हाताला ।।
मजविषयीं आळस चित्ताला । आग लागो या संचिताला ।।
चाल— तस्मात थोर प्रारब्ध । त्यानें तुज केलें स्तब्ध ।
ही वाटे मज नवलाई । सर्वोत्तम शेषशायी ।। २ ।।
चांडाळ पापी उद्धरले । हें माझें हृदयीं भरलें ।।
मजविषयीं कठिणपण धरलें । तरि काय देवपण उरलें ।।
नामानें पर्वत तरले । तें ब्रीद आज काय हरलें ।।
चाल— परब्रह्म भगवंत । तुजहूनि कोण आहे बळिवंत ।
किती गे अंत पाहसी विठाई । कटिकर गण आले ठायीं ।। ३ ।।
तुजवीण पंढरीराया । आहे कोण दुजा ताराया ।।
करूनिया कर कृपाछाया । दे मजला निजपदीं ठाया ।।
नुरवी सकळ हा भ्रम वाया । पुनरावृत्ति न लगे काया ।।
चाल— लडिवाळ तुझा मी तान्हा । पाजी प्रेमप्रिति पान्हा ।
वत्साप्रति जसि गाई । म्हणवुनि स्तुती हैबती गाई ।। ४ ।।

* * *

## २

स्वहित करून घ्या मनुजा कर्म असे नडवी ।
स्वहित करावें परन्तु योग जन अडवी ।
मुक्तिबंधन करावें परंतु मोह माया गडवी[1] ।
कवि हैबती म्हणे मायेचा फासा कोण सोडवी ।

* * *

१ गडवी = फसविते.

## ३

मूळ आधीं ओंकार बिंदु युक्त करा श्रवण ।
शब्द चक्र बीज प्रचिती घ्या संमतिला लावुन ॥ ध्रु० ॥
नसे नामरूप ब्रह्मनिरामय हा ज्याचा गुण ।
शुद्ध ब्रह्मीं ' ब्रह्म मी ' ऐसें झालें स्फुरण ।
' अहं ब्रह्म ' म्हणतांची ओंकार झाला त्यापासून ।
तोच्चि पहा ओंकार पंच प्रकार दीर्घ पूर्ण ।
भेदअभेदाविरहित सर्वगत तो भगवान ।
" एकमेवाद्वितीयं ब्रह्म " तैसी आहे ठेवण ॥ १ ॥
प्रथम तारक ज्ञात्वा रजोगुण ब्रह्मा अकार ।
द्वितीयं इंद्र कवच तो सत्वगुणी विष्णू उकार ।
तृतीयं कुंडलाकार रुद्र तमोगुणी देव मकार ।
अर्धचंद्र तोच चतुर्थ अभिदान त्यास ईश्वर ।
पंचम बिंदु तोच सदाशिव साराचें सार ।
सोहं ब्रह्म जे प्रणव पंच देवाचा हा ओंकार ।
" ऊर्ध्वमूल मधः शाखा " वृक्ष ' उच्चा ' आंत त्रिभूवन ॥ २ ॥
स्थूल देह ऋग्वेद वैखरी त्रिकूट ते विधिचें ।
मात्रा रहस्य ऐका स्थूळ तें आहे जागृतिचें ।
लिंग देह यजुर्वेद मध्यमा श्रीहाट विष्णुचे ।
दीर्घ शून्य मातृका हें विवरण श्रीहाटस्थळिंचें ।
पश्यंति सामवेद कारण गोल्हाट रुद्राचें ।
मातृका सुफलित नेत्रीं स्थान सुषुप्तीचें ।
त्यावरते त्यापरते त्याची घर आठवण ॥ ३ ॥
औटपीट हा सोमेश्वर तो आले चौथेस्थानीं ।
तो महा कारण देह अर्ध मात्रा आहे ते भुवनीं ।
वेद अथर्वण परावाचा ही आहे ते ठिकाणीं ।
तेथें दिव्य सुंदरी म्हणति जीस तुर्या कामिनी ।
पंच बिंदु सदाशिव भ्रमर गुंफा स्थानीं ।
अनिर्वाच्य तें परात्पर ज्ञान देह उन्मनी ।

अगाध महिमा तेथें त्रैलोक्याची सांठवण ।
कविराज हैबति सदोदित नाथांचें करी ध्यान ॥ ४ ॥

* * *

## ४

## नरदेहसाधन

योनि लक्ष चौऱ्यांशी फिरतां । एकदां या नरदेहा आला ।
येथें जरी साधन घडेना । तरी जन्म व्यर्थची झाला ।
सर्व देहांमध्यें उत्तम नरदेह । जाणपणा अंगीं असतां ।
ममता माया मोह भ्रमीं । लागुनी भ्रम पडला वेडा नसतां ।
अंश ब्रह्मींचा असुनी तरी । प्रपंचाची जडली आस्ता ।
क्षणिक अशाश्वत सत्य वाटलें । म्हणुनी चुकला सगळा रस्ता ।
सोहं सोहं विसरुनी धरलें । कोहं शब्द को मागीला ॥ ध्रु० ॥
' मनुष्याणां सहस्रेषु '[1] यापरी आहे गीतावाणी ।
सहस्र मनुष्यांमधि साधन करणार विरळा प्राणी ।
तया सहस्रामधें निवडला लक्ष जयाचें हरिभजनीं ।
भजनी नर सहस्रांत निवडला युक्तिवान ब्रह्मज्ञानी ।
ब्रह्मज्ञान वेगळें घरोघर चाहुलीवर भुकनेवाला ॥ ध्रु० ॥
' कश्चिद्देहांतर सिद्धिः '[2] या सहस्र ब्रह्मज्ञानियांमध्यें कळला ।
' यततामपि सिद्धानां '[3] सहस्र सिद्धि एक हरिकडे वळला ।
सिद्धिपुरुष नेमधारी जो का हरिस्मरणीं नाहीं चळला ॥ १ ॥
' कश्चिन्मां '[4] भजनीचें तत्त्व नाकळे यदर्थि अडकळला ।
जिव्हाळा नाहीं तरी मग काय करावें भजनाला ।
व्याप्तितत्त्वता तत्त्व जाणता तोचि हरिस्वरूपीं स्थिरला ॥ २ ॥
त्यानें ओळख मागील धरली ज्योतिरूप ज्योतिंत जिरला ।
जन्म सफळ लवणाचा पुतळा जळामध्यें जैसा विरला ।
म्हणे हैबति धन्य तोचि अक्षय्य पदीं नाहीं सरला ॥ ३ ॥
प्रसन्न नाथ महाराज मति देतसे कवनाला – कवित्वाला ।
तेथें जरी साधन घडेना तरी जन्म व्यर्थचि गेला ॥ ४ ॥

* * *

१,२,३,४ गीता अ. ७, श्लो. ३ पहा.

## ५
## देहावरील मळा

मळा मळा म्हणवितां मळ्याची लांब आहे कळा।
निराकार निर्गुण निराकारांत झाला मळा।
औट हताची विहीर काढली पाणी वाहे झुळझुळा।
होता पूर्वीचा मळा, मळ्याला पैलाच जीव्हाळा।
आधार चक्रावर बांधला वरोटा हरी नाम सोळा।
निराकार आकार मायेचे मकार बनविले चकार करी चाळा।
पंच तत्त्वाचा नाडा सुंदर कर्ता आहे वेगळा।
मन पवन बैल स्थानीं मळ्याचा धनी वनमाळा।
शंभर वर्षांची गणीत आहे पाही नित्य कळा।
पाय नसुन मोट हाकितो तो मायेचा सोहळा॥ ध्रु० ॥
चार पाटानें पाणी वाहतें सात वाकु-याला!
नऊ दंड भीजवले जागा कोर्डा कुठें राहिला।
चाल— पाणी मळांत वाहे झुळझुळा। सहस्र दळ मुखीं
जिव्हाळा। देह औट हताचा मळा। ठाईं ठाईं
लावल्या कला। मळ्याचा कर्ता धनी वेगळा।
मिळवणी—त्या मळ्याचा भाग निराळा वर्णू किती वेळां।
निराकार निर्गुण निराकारांत झाला मळा॥ १ ॥
तिनशें साठ रोप मळ्यामधीं लाविल्या केळी।
नाना तऱ्हेच्या खास लावल्या फुलांच्या करदळी।
दहा लक्ष मळ्यामधीं ज्वोरी आणि बाभळी।
सवा लाखाची गणीत फळाची चार घड नारळी।
देह मळ्याचा राखन धनी एक तो किती वेगळा।
चाल— शंभर वर्षें झाला करार। पंचवीसांत भर येनार।
मग झाला त्याचा करार। त्याचा मृत्यु भुमित खाणार।
मिळवणी—कविराज हैबति नाथपदीं अखंडित लळा।
निराकार निर्गुण निराकारांत झाला मळा॥ २ ॥

* * *

... म. ठा... स्थळ
... २०२९८ वि: ...
क्रमांक ६०९८ ... नों: दि: ...

# अध्यात्म ज्ञान वेदान्त

## ( चढ )

ज्ञान खुण गुरुकिल्ली मत अध्यात्म शोध पहावा ।
एक प्रश्न पुसतो करा उत्तर तरीच वाहवा ॥ ध्रु० ॥

लहानथोर बोलतात जें कां न पाहिलें रविनं ।
कविमत मत कठीण कळेल ते युक्तिचियेवीण ।
होईल जरी कृपा तरीच बोलेल मुळ पैरविन ।
घट कविता करून म्हणल कविच ब्रिद वागवीन ।
पुसतां भेटेल तेव्हां काय बोलावे एडझवीन ।
गुरुकृपा जे ठाई ते स्थळीं ज्ञानाचा राहावा ॥ १ ॥

पंचतत्त्वहि कोण एकासी काय नातं ।
दश इंद्रियहि कशीं काय व्हावीत या प्राणांत ।
दश वायोची जात करावी चवकशी ध्यानांत ।
कोण कुणाचा आस कोण कोणाचे वचनांत ।
बुध्ध कोण मन कोण लगत कशी अंतःकरणांत ।
कोण आली कोठून कोण आली भ्रान्तविती स्वप्नांत ।
मुख्य अंश शरिरांत आहे पांचात किंवा सहावा ॥ २ ॥

आली कुणें वाटेनें कोण रस्ता जायाचा ।
जीव कोण शिव कोण ठिकाणा कोठें राहण्याचा ।
नाद छंद कोण कोण घरणी सिध्ध राहण्याचा ।
पाप पुण्य तें काय कोण शरीर चालवायचा ।
नेत्रीं कोण पाहणार कोण श्रवणीं ऐकायाचा ।
झोपत जागा कोण स्वप्नीं चावळायाचा ।
कुणे ठिकाणीं कोण काय मजकूर कुणास लिहावा ॥ ३ ॥

आला गेला कोण आला कोठून कुठें गेला ।
येता आला कसा कोण राहिला कोण मेला ।
तंतु कोण रू कोण कोणता कोष्टी कोण शेला
कोण कुणाचा पुत्र कोण गुरुनाथ कोण चेला ।

---

वही १२ खुलासा पहा.

कवि हैबती म्हणे प्रश्न गुरुपुत्राप्रती केला।
हें जरी नकळे तरी जन्मा येऊनी व्यर्थ गेला।
गुरुपदी लीन झाला घावल ठिकाणीं दाहावा ॥ ४ ॥

* * *

७

## अमृतानुभव

### ( उत्तर )

गुरुकृपानुभव प्रत्यय परीसा उत्तर प्रश्नाचें।
ऐकावे रोकडे निगमसारात वामनाचे ॥ ध्रु० ॥
त्रिगुणापासुनी तत्त्व एक ती एकावुन जाण।
पुत्र पिता महपिता एक एकावुन निर्माण।
प्राण जोत ब्रह्मीची इंद्रिय पत्रा प्रमाण।
दशवायो ब्रह्मासी विजाती ऐसें अनुमान।
बंधुत्वें वर्तती नाहीं कोणामध्यें अभिमान ॥ १ ॥
बुद्धी कमळासन मनशशी हा प्रत्यय परिमान।
अंतःकरणाप्रति पुत्र शालक प्रमाणाचे।
एक एकाचे वचनीं ते आप्त एकमेकाचे ॥
भ्रांत विमनस्व वनांत सर्वही आली ब्रह्मीहून।
पांच मिळून एक प्राण ज्याला म्हणती निर्गुण ॥ २ ॥
येणें जाणें एकवाट अद्वय मार्गें करून।
जीव प्रकृती शिव पुरुष ब्रह्मीं वस्ती पूर्ण।
नाद छंद ते आपण धरणीसी धरता आपण।
पाप पुण्य ते आपण शरीर चालविता आपण।
कुर्म पाहे ते नेत्रीं कर्कशु एके कर्णाचे ॥ ३ ॥
झोपत जागे चित्त आहे चालवणें प्राणाचे ॥
आला अंश ब्रह्मीचा परी तो ब्रह्मींच राहणार।
गेला नाहीं कुठें आहे जेथील तेथें सार।
तंतु तोचि आपण रू, आपण ऐसा निर्धार।
कोष्ट तोचि आपण शेला तो आपण साचार ॥ ४ ॥

आपण आपला पुत्र वडील तो आपला विस्तार ।
आपण आपला चेला आपण गुरुनाथ सार ।
प्रश्नाचें उत्तर पाहावें वामन वचनाचें ।
वसिष्ट निर्णय ह्याचे सांगतो सिद्धलक्षणाचे ।
निज ध्यास मानसीं हेत श्रीगुरुपदीं धरिला ॥ ५ ॥
त्याच निश्चयें करून पार हा भवसिंधु तरला ।
ध्यास जसा आळींकेचा एकच तत्त्वी सरसरला ।
भृंगी झाली आळींकेची हा समभाग हेत ठरला ।
नाथपदीं हैबती ध्यान करिता हे स्तवनाचे ।
कृपाहस्त मस्तकीं मतीबळ देता कवनाचें ॥ ६ ॥

* * *

वरील कवन हें हैबतीच्या अमृतानुभवाचें कवन आहे. 'तत्त्व मसि'चा सिद्धान्त स्पष्ट करून, गुरूकृपेनें मी भव सिंधु तरलों, अळींकेचा गुरुकृपेनें भ्रमर झालों व तरलों, असा हैबती निर्वाळा देतो.

* * *

## ८

## ( गीतेवरील )

अंतःकरणीं पुनरावृत्ती हारी पदी लावावी ।
लक्ष स्वरूपीं लावुन धुरंधर वाचा त्यागावी ।
योनी लक्ष चौऱ्यांशीमध्यें नरदेह उत्तम रे ।
सर्व जाणता असुन आसती कां पडला भ्रम रे ।
विषय नादीं लावुन पाहा चुकला अनुक्रम रे ।
भ्रमीला मायाभ्रमीं म्हणोनी झाला बहु भ्रम रे ।
चाल— निश्चल बुद्धी नाहीं । न उमजे हीत पण कांहीं ।
हित असो हृदयांत बुरीत मम कृती । गांवी
गीताश्लोक बोलले हरी ऐकावे आर्था ॥ १ ॥
'सर्व धर्मान् परित्यज्य'[1] सांडी मुदिक स्वार्था ।
'मामेकं शरणं व्रज'[2] मज शरण ये पार्था ।

१–२ गीता अ. १८, श्लो. ६६.

सर्व धर्म त्यागोनि मदर्था माझिया हितार्था ।
पार टाकोनी भ्रम सारा करी परम स्वरूपीं घरी धारा ।
हीत असुन हृदय मम किती गावी ।
लक्ष ' अहंत्वा सर्वपापेभ्यो '[३] असे बोले श्रीहरी तो ।
हे पार्था दृढजीवी धरी म्हणून सावध करितो ।
मदवचनीं विश्वास अर्जुना, मी त्या उद्धरितो ।
चाल— मजला मनि धरती । ते निश्चळ उद्धरती ।
म्हणोनी ही शुद्ध मती । स्मरणीं वागावी ।
लक्ष स्वरूपीं लावुन धुरंधर वाचा त्यागावी ॥ २ ॥
' मोक्षयिष्यामि मा शुचः '[४] मोक्ष झाला ।
तद्रुपता लाधली पाहा गेला निज ठाया ।
मनु सकळ या धनामध्यें धरूनी स्मरणाला ।
स्वस्थ आसा पद शरण ये, घे हरी रूप सौख्याला ।
चाल— हैबती पदीं मन ठेवी । नामामृत रस सेवी ।
गुरुपदीं नित्य नवी । ही शिस्त लावावी ।
लक्ष स्वरूपीं लावुन धुरंधर वाचा त्यागावी ॥ ३ ॥

* * *

## ९

## ( चुडा कटाव )

गोकुळामध्यें कृष्ण नांदतो बहु आनंदानें । मातेच्या उसन्या साठीं देवानें घेतलें लहानपण ।

वैराळाचें[१] रूप घेऊनी निघाले भगवान । कौंसाच्या गांवांत जाऊनी देवांनीं केला मुक्काम ।

चुडा भरा बायांनो, आवघ्या जडितांचं लेणं । मिळून नगरच्या नारी चुड्याचें करती खंडण ।

उघड उघड पेटारा तुझा दाव सोनेरी । एका एका चुड्याचें मोल तुम्ही सांगा खरोखरी ।

---

३–४ गीता अ. १८, श्लो. ६६,
१ कांसाराचें.

सव्वा लाख सोने टक्के ऐक सुंदरी। कोठें सूर्याचें तेज पडलें त्या
चुड्यावरी।
झाक झाक पेटारा चुडा तुझा मोलाचा भारी। आम्ही
गरीब गवळ्याच्या सुना दुबळ्या संसारीं।
तुझा चुडा लेईल ती भाग्याची नार। भाग्याची
नार कमळजा कौंसाची थोर।
तशीच खबर गेली कमळजेच्या वाड्यास। कोण देशीचा
वैराळ आला आपल्या नगरास।
जा गं जा गं दासिंनो घेऊन यावे वैराळासी। सर्वे आणावें
वैराळासी चुडा मी भरतें मनगटासी।

चाल— कमळजेचा शब्द ऐकला। हुडकुं लागल्या वैराळाला।
उभा होता माणिक चौकाला। बोलती त्याला घराकडे चला।
पुढें दासी मागे वैराळ आणले वाड्यासी।
उठून तिनें चंदनाचा पाट टाकला बसायासी।
कोण गांव कोण नांव, कुठले रहिवासी।
तुझे सारखा भाचा माझा नांदे गोकुळासी।
नाहीं गांव नाहीं ठाव आम्ही मुलुखाचे रहिवासी।
चुडा भराया आम्ही हिंडतों दाही देशीं।
उघड उघड तुझा पेटारा दाव सोनेरी। एका एका
चुड्याचें मोल तुम्ही सांगा खरोखरी।
सव्वा लक्ष सोनें टक्के ऐक सुन्दरी। कोठें सुर्याचें
तेज पडलें त्या चुड्यावरी।
तेव्हां कमळजेनें हात दिला देवाचे हाताशीं। देवाचे
हातासी चुडा मी भरतें मनगटाशीं।

चाल— देवानें फिरविली माव,[२] लाविली कळ त्या मनगटाशी।
घाबरी नार तेव्हां बोले वैराळाशीं।
आरे आरे वैराळा, चुडा तूं माझा सैल कर। चुडा
सैल कर मनगटीं लागली कळ फार।

२ माया.

जा गं जा गं दासींनो आणा कुणी विळा खिळा सुरी ।
चुडा कापण्याचें खड्ग माझें राहिलें घरीं ।
उठून तांतडी कमळजा गेली पतीच्या महालासी ।
उशाखालचें खड्ग आणुन दिलें वैराळासी ।
अहो अहो मामी जावुन सांगा मामासी । गोकुळचा मी ।
कृष्ण देव आलों युद्धासी ।
अहो अहो महाराज, तुम्हांशीं काळझोप आली ।
उशाखालचें खड्ग चोरी भाच्यानें केली ।
कौंस गडबडून उठून त्यानें पाहिलें कृष्णाला ।
पाहुन देवाचें मुख कौंस चिंतागती झाला ।
अरे अरे भाच्या तू नको मारू मजला ।
तुझ्या घरचा बंदी होऊनी राहीन दरवाज्याला ।
कौंस जेव्हां पळूं लागला हाक मारून उभा केला ।
एका हातानें शीर उडविलें पडलें धरणीला ।
तसेंच शीर घेऊनी गेले बंदीशाळेला ।
कृष्ण ओवाळीता शीर त्यानें ठेवलें आरतीला ।
एकुलता एक बंधु त्वा कैसा मारीला ।
सहा मुलें मारलीं तुझीं तेव्हां कष्टी नाहीं झाली ।
एका शिरासाठीं आई तूं घाबरली ।
ऐसा वैरी मारिता दोष नाहीं जननी ।
कवि हैबति म्हणे आनंद झाला गोकुळ अंगणी ॥

* * *

## १०

## ( गजगौरीव्रत )

गजगौरीचें आख्यान । करा श्रवण । चतुर सुज्ञान । निरोपतो आता । गांधारीनें वाण वाटलें । भारती लिहिलें । ऐक गुणवंता ॥ ध्रु० ॥

चांडाळ होता दुर्योधन । आणि दुश्यासन । तिसरा तो कर्ण । जमले एके ठाई । पाप बुद्धिचा सागर । कपटाचें घर । अंत त्या नाहीं । एक आगळे शंभर । भाऊ कसे घर घेऊं जसे बागुल बावू । करती नवलाई ॥

अहंकार होता मनीं । तशांत नारद मुनी । आले लवलाही । सिंहासनीं नारद बसवोनी । पुजा करोनी कर दोन्ही जोडोनी लागली पाई । जन्मोजन्मी असें असावें । कमि नसावे । उपाय करूं काई ॥

तेव्हां बोलले नारदमुनी । सांगे वृत्तांत निवडुनी । तुम्ही शंभर बंधु मिळोनी । माता गांधारी तुमची जननी । गज मृत्तिकेचा करोनी । माता गांधारी वर बसवोनी ।

मिळवणी— सहज लाविली हो कळा । महान सबळ चढेल तुझ्या हता ॥

हेचि आहे स्वप्न एक वर्म । करी हेंचि कर्म । अंधाचे सुता । कळ लावुनी नारदमुनी । गेले निघुनी । बन्धु मिळुनी चिखल खुप केला । गाड्या परि हत्ती सजविला । खूप सजविला । जीव नाही त्याला लागला ॥

गांधारी वर बसविती । अंबर गर्जती । वाद्यें वाजती । निघाली वाणाला । नगरांत साऱ्या वाण दिलें । एक राहिलें । आतां म्हणे चला । वाड्यासमोर आली गांधारी । हाक एक मारी । यावें बाहेरी । जावुबाईला । हें वाण माझें उसनं । हत्तिवर बसून । देतें मी तुजला ॥

चाल— डाव्या पायाच्या आंगठ्यानं । लाविला वाण गांधारीनं । बोले दुर्योधन मोठ्यानं । गज फिरविला खोट्यानं । हाका मारी कुंती मोठ्यानं । नका जाऊ बाई थाटानं ।

मिळवणी— गेली निघून घरीं गांधारी । कुंती मंदीरीं । चिंतांभव करी । पांडव गेले शिकारीकरितां । येई येई द्वारकानाथा । करूं काय आतां लागली चिंता । पंचबंधु आले मिळोनी । ऐकले कानीं । गांधारी हत्तिवर बसोनी । वाण दिले येऊनी ॥

तसा हत्ति आम्ही एक करून । भीम खबर गेली यमुनेसी । यमुनेस पाडुन आट । माती लाट । महा प्रचंड दिले फेकुनी । तीन योजनें गांव त्रासला । सांगि धर्माला ब्राह्मण येऊन । केला विचार धर्मानं । भीमास बोलावून । वीर अर्जुन पत्र लिहून । इंद्रास पत्र पाठवा । तुमचा गज द्यावा । आम्हांला पाठवून । पत्र कसें लिहिलें होतें । ज्ञानी सकळ ऐका तें ॥ द्वारकानाथ हृदयांत । त्याचे चरण आम्ही वंदत । बाणासी पत्र बसवित । वर शिक्का प्रभुचा करत । गजगौरीचें आख्यान करा श्रवण ॥

सोडी बाण तेव्हां अर्जुन । प्रभुस स्मरून । मोठे गर्जुन ऐसे पाहता । ब्रहस्पती देवाचा गुरु । नारदमुनी । धरून पत्र सत्वर वाचुन पाहती । पत्राखाली उत्तर लिहिती । परत बाण देती । गर्व आला चित्तीं ॥

बाण आला हस्तिनापुरीं । अर्जुन क्षेत्री घेवुनी करीं । धर्मा दाविती । हत्ति आणणार कोण जावुन घेवुनी । खेद फार चित्ता । धर्म बोले तया घडीं । बाणाची शिडी करून तातडी । लावावी आकाशाप्रती । भीम बन्धु आहे बलवान । येईल घेऊन । इंद्राचा हत्ती ॥

चाल— बन्धुच्या आज्ञेप्रमाणं । शिडी करतां आला अर्जुन । भीम गेला वर चढून । मुखी कृष्ण कृष्ण गान ॥

द्वारपाळ होते द्वारीं भिडुनी । बोले भिमास चढून ॥

मिळवणी— तूं आहेस कोणाचा कोण । देतों जिवदान । जावें येथून निघून चालता । भीम हसला आपले मनीं । द्वारपाळ दोन्ही घाली पालथा ॥

चाल— भीम गेला इंद्राजवळी । पाहाती सकळी । देव मंडळी । धन्य त्याला म्हणती । शिरीं कृपेचें छत्र कृष्ण मुख स्मरून । शस्त्र म्हणून आला वरती । सहा हात सुंभळे अंदले । भीमास तेथें नेले । गज दाविले । घेवुन जा म्हणती । एक बुक्की त्यास मारीली । मस्ती त्याची गेली । पडला खालती । चारी पाय सोंड शेपुट । करून झटपट । बांधुन बळकट । भीम उचलून हो हत्ती ॥ घ्याया घुंगुर सारा । बांधून भारा द्यावा मजप्रती ॥

चाल— हत्ती आडकविला गदेशीं । साज मारीला खाकेशी । भीम आला हस्तिनापुराशीं । आनंद झाला धर्माशीं ॥ केला सनिगार ( शृंगार ) हत्तीशीं । वर बसविलें मातेशीं । दिले वाण साऱ्या नगराशीं । मग गेले कौरववाड्याशीं । जिचे उसने दिले तिसी । मग लाजली आपेसी ॥

मिळवणी— ग्रंथीं आहे बहू विस्तार । म्हणून सारासार । हैबती कविश्वर । नाथहि स्मरता । तिथी मास सांगी काढून । बैसे ठासून कवित्व गाता ॥

* * *

# ११

## रामायण
## ( उत्तर )

पिंडीं कोण दैवते रामलक्ष्मण भरतासी ।
याचा पर्या[1] कसा सांगतो निवडुन अर्थासी ॥ ध्रु० ॥

पिंड तीन तांदुळ साठ वीस होते एकांत ।
त्यांत साठ दैवतें पुढें सांगीत यमकांत ।
एक पिंड तो दोन शतेंच्याळीस जव जोकांत[2] ।
सवा तोळा वजन असे आहे वाल्मिक श्लोकांत ।
ऐकावी दैतवे ग्रन्थ अन्वयी मततार्थासी ॥ १ ॥
नवनारायण भास्कर दहावा दैवत रामासी ।
शेषी मंगळ गण अष्ट असे भरताचे नामासी ।
वरुण अष्टवसु कुबेर शत्रुघन आजमासी ।
पुढील दैवते आतां परीसावीं वचनार्थासी ।
याचा पर्या कसा सांगतो निवडुन अर्थासी ॥ २ ॥
सत्वचिरंजीव रुद्र एकादशी मारुतिची भरती !
विवेक भक्ति दोन्ही विज्ञातील पूर्वींच अवतरती ।
बिभिषण त्रिजटा दोनोसी ते त्यातील जमा धरती ।
मूळ काव्यार्थ अन्वये शुकाचार्यांची टिका वरती ।
समजीची खुण पाहावी शिवरामायण ग्रंथासी ॥ ३ ॥

तांदुळ दैवत पिंड वजन कथिले अर्थावरून ।
नये प्रत्ययांतरीं घ्या ग्रन्थीं शोध करून ।
कवि हैबती करि कवन ग्रंथाची सड धरून ।
नाथनिरंजन वरद अक्षर येति रसभरून ।
कृपा आहे परिपूर्ण मनी आठवि गुरुनाथांसी ॥ ४ ॥

* * *

१ पर्याय ( ‘ उत्तर ’ या अर्थी ) २ वजनांत.

## १२

## चारचंद्र

### ( चढ )

तुम्ही कवि सुज्ञान आतां कळेल प्रसंगीं ज्ञान ॥ ध्रु० ॥

सर्व शास्त्र जाणता थोरले कविराज ब्रिदवाले ।
मुखोत्तरें ऐकाया पंडित बैसलेत भवताले ।
ऐकत होतों नांव फार फार दिसानें दर्शन झालें ।
अर्थ आठवला सहज मजला । तोच पुसतो
तुजला मति आहे अज्ञान ॥ १ ॥

एक अचंब्रा असा दिसाचे चंद्र पाहिले चार ।
चारी चंद्र सारखे सारखा नामाचा उच्चार ।
चार चंद्र कोणते तयाचा करा मनीं विचार ।
आहे सत्य नव्हे असत्य । वाल्मिक मुनिचे
कृत्य कथिलें भविष्य स्वतःनं ॥ २ ॥

आणिक एक विपरीत अयोध्या नाथ जवळ असतांना ।
सीता सति पतिव्रता हृदयी धरिती लंकेचा राणा ।
दिसते विपरीत कसा तो अर्थ मनासी आणा ।
शोध पहावा ठिकाण लावा । प्रत्यय तो यावा ।
वाहवा म्हणतील गुणी सुज्ञान ॥ ३ ॥

कोण संवत्सर मास कोणता कोण वार तिथि बोला ।
शास्त्र युक्तिचें उत्तर बोलुन कवि मतामधें डोला ।
सुचेना शब्द तरी मग आहे अब्रुला धोका ।
बराच कविला अर्थ सेविला । नाथ हैबती
कविला प्रसन्न देता मति वरदाना ॥ ४ ॥

* * *

# १३

## चार चंद्र

### ( उत्तर )

चारी चंद्र सारखे देखिले एक दिशीं नयनीं ।
जरी म्हणाल विपरित तरी परीसा अन्वय श्रवणीं ॥ ध्रु० ॥

लंकापति रावण वधिला पाहा श्रीरामानीं ।
ही रामायणीं कथा असें कथिला वाल्मिकानीं ।
सीता सह निर्जर[1] बंदीचे सोडवले त्यांनीं ।
ब्रह्मा शिव आदि करून सुरेळा स्थानीं ।
दिव्य सीतेनें घ्यावें ऐसे सर्वांचे वदनीं ॥ १ ॥

रचवून मग अग्नी टाकिली उडी कुंडामाजी ।
निघे अग्नितुन तेव्हां पडली आप शब्दांचा मांजी[2] ।
इंद्र चंद्र साक्षीस कोटी तेहतीस त्या समाजीं ।
धन्य धन्य ते सीता माय म्हणती सर्व नामाजी ।
चार चंद्र त्या वेळीं जमले असें ग्रंथ कथनीं ॥ २ ॥

रामचंद्र तो एक, सीता मुखचंद्र दुजा जाण !
शिव मस्तकीं तिजा, अत्रीनंदन चवथा जाण ।
सीता हृदयीं धरा रावण तेव्हां कैसे जाण ।
विपरीतच अर्थ दिसतो परी तिथेंच संधान ।
आंचळ[3] नाम जो पदर तोचि रावण पहा मननीं ॥ ३ ॥

लज्जित होऊनी सीता सावरून पदर हृदयीं धरला ।
तेहतीस कोटी सुरांसहित संशय सारा हरला ।
जयजयकारें गर्जता आनंद ब्रह्मांडीं भरला ।
रामराम अती मधुरध्वना हा नादची एक सरला ।
कविराज हैबती मती देतसे नाथ कवनीं ॥ ४ ॥

* * *

---

१. ज्यांना जरा ( म्हातारपण ) नाहीं ते = देव.
२. आठा दिशांतून प्रशंसोद्गार आले.
३. अंचळ = पदर.

## १४
## सिमंतक मणी–भागवतावरील
### ( चढ )

तुम्ही शीघ्र कविराज कळेना बुद्धिचा अंत ।
कवन करितां शास्त्रयुक्त लावुनया दृष्टांत ॥ ध्रु० ॥
प्रतीसूर्य दुसरा सिमंतक मणी तेजवान ।
त्यावर भास्कर कंठीं शोभे अति प्रकाशमान ।
रविपासुन घेतला हिरावुन सत्राजित भुपानं ।
पुढें जांबुवंता अर्पण दे श्रीभगवान ।
हें कथ नुसंधान आहे भागवतीं साद्यंत ॥ १ ॥
मणी आधी जातीचा किती आहे सांगा वजनाला ।
किती तोळे किती शेर अर्थ आणावा ध्यानाला ।
सोनें देत नऊ भार ठाऊके लहान थोराला ।
भार कशाला म्हणती पाहा याच्या अनुमानाला ।
कशी आहे मोजणी करावा याचा सिद्धांत ॥ २ ॥
आधीं ठरवावें वजन काय तें एका भाराचें ।
प्रमाण त्याचें कसें श्लोक बोलावे शास्त्राचे ।
नऊ भाराचें सुवर्ण झालें किती आकाराचे ।
कळव कुशलता आतां ज्ञान कैसे कविमताचें ।
शोध करा ग्रथांत जाणता सर्व आदि अत ॥ ३ ॥
सिमंतकाचा प्रश्न पुसला तुम्ही ज्ञाते म्हणून ।
ज्ञानवंत बैसले ऐकतील तुम्ही बोलावी खूण ।
उत्तर केल्याविण गासील तर अब्रूला उणं ।
कवि हैबतीला आहे नाथकृपा पूर्ण ।
वेदांताचा अर्थ उघडा कथितो सिद्धांत ॥ ४ ॥

* * *

या कवनामध्यें हैबतीच्या स्वतःच्या कवित्वाचा निरहंकारी अभिमान व्यक्त होतो. भागवतातील अनुसंधान देऊन प्रश्न विचारण्याचा एक नवा घाटी कवनांत उघड झालेली आहे.

# १५

## सिमंतक मणी

### ( उत्तर )

मणी सिमंतक नित्य देतसे सुवर्ण नऊ भार ।
भार कशाचा म्हणतो याचा ऐका निर्धार ॥ ध्रु०॥
ग्रंथीं मासा पंच गुंज आणि आठ व्यवहारासी ।
दहा मासांचा कर्ष एक ऐसें म्हणतो त्यासी ।
चार कर्ष पळ एकवीस म्हणतो पळ विससो ।
पांच विसीची तुळा, तुळा शतभार एक ज्यासी ।
याप्रमाणें नऊ भार देतसे सोनें साचार ॥ १ ॥

पळास मासे चाळीस आठशे एकवीस जाण ।
एक तुळा ते मासे सहस्र चार परीमाण ।
चार लक्ष भाराचें मासें गणतीचे पाहाण ।
आतां सांगतों तोळे आणी मण शेराचा मान ।
पहावें याचें प्रमाण गणती खरा गुणाकार ॥ २ ॥

तोळे तेहतीस सहस्र तिनसे तेहतीस गणनीस ।
तोळे होवून मासे राहिले चारच बाकीस ।
शेर जाण तेराशे वर अठ्यांशी मोजणीस ।
शेर जमा होऊन राहिले तोळे एकवीस ।
मग साडेचवतीस बाकी आठ शेरच विचार ॥ ३ ॥
एकदर सांगतों जमबंदी एक भाराची ।
दिड खंडी मण साडेचार पावणेनऊ शेराची ।
तोळे सवातीन वरता मासा बेरीज नेमाचा ।
कवि हैबती म्हणे गणित हे लिलावती माची ।
प्रसन्न नाथ महाराज पूर्ण आहे त्याचा आधार ॥ ४ ॥

* * *

१६

( चढ )

चतुर ज्ञानी सभे बैसले तुम्ही येऊन ।
अज्ञ बाळ मी प्रश्न पुसतों तुम्हांलागून ।। ध्रु० ।।

कौरवांनीं द्रौपदीला छळली कोणा वेळेला ।
कोण वार तिथी होती सांगून द्या मजला ।
विराट नगरी कीचक मेला काय कारण त्याला ।
कोणता योग वार झाला त्याचा मरणाला ।
रुक्मिणीपायीं शिशूपाल तो रणीं पडून ।। १ ।।

सीतेसाठीं रावणानें भिक्षा मागितली ।
शंकराचेसाठीं पार्वती भिल्लीण झाली ।
कोणता वार तिथी तेव्हां आली ।
पुतना मावशी हरिनें शोशून स्वर्गीं पोचविली ।
गौतम शापें अहिल्या शिळा गेली होऊन ।। २ ।।

कवि हैबती म्हणे तुम्हांला द्यावें उत्तर ।
हात जोडुनी प्रार्थना माझी तुम्हां वारंवार ।
रामायण भागवताचा घेऊनी आधार ।
सांगा कवि तुम्ही सुज्ञ बैसला याचा विचार ।
हीच विनंती माझी तुम्हांला होऊनिया लीन ।। ३ ।।

* * *

पुराणांतील निरनिराळ्या घटना ज्या वेळीं झाल्या त्या वेळीं कोणता वार, तिथि व योग होता हें नेमकें सांगा, असा प्रश्न हैबती करीत आहे. हैबतीचें ज्ञान किती खोल होतें, हें यावरून समजतें. याचें उत्तर हैबतीला खात्रीनें माहीत असेल. परंतु तें उत्तराचें कवन मिळालेलें नाहीं.

१७

(चढ)

वाल्मीकी रामायणावरून श्रीधर टीकाकार ।
रामविजय प्राकृत संस्कृत मूळचा आधार ।। ध्रु० ।।

तीनशें योजनें त्रिकोनी बेट आहे लंका ।
तेथील राजा रावण त्याचा त्रिभुवनीं डंका ।
तेहतीस कोटी देव बदीला कोण गणतीलार का ? ।
कांचनमय तें गाव काय द्रव्याची आशका ।
सबळ हुडे[1] शाहानव आणि सहस्र चार ।
त्यावर चढले कपी वीर गरजती जयजयकार ।। १ ।।

येका वानरा आंगीं सांग किती गणती रोमाची ।
जागोजागीं किती करावी गणती नेमाची ।
किती सिरा किती सटीवर किती बेरीज पुच्छाची ।
चौगग्यावर किती मोजणी किती आहे तोंडाची ।
जमा एक शरीराची बेरीज करून साच्यार ।
मग एकंदर साग पदून आठराचा आकार ।। २ ।।

येक बुरुज किती उंच रुंद धरे फेरे मोजावा ।
किती हात गज किंवी तसु किती गणती लावाया ।
किती बुरुज थोरले धाकटे किती शोध लावा ।
दोन हुड्यांमधीं अंतर किती हात किती तसु पाहावा ।
आधीं काट गिरदीचो मोजणी करून निर्धार ।
मग बुरूज वाटणी नीट बमावी ताळेवार ।। ३ ।।

ज्या वेळीं वैश्रवणपुरी निर्मिली ब्रह्मानें ।
ते वेळीचा घडा ग्रथीं वर्णिला वाल्मिकानें ।
करून पहा चौकशी ग्रंथीचा लावा ठिकान ।
उत्तर केल्याविन गासील तर तुजला आहे आन ।
कविराज हैबति भेद गातो शास्त्र आधार ।
प्रसन्न नाथ महाराज मति कवितेसी देणार ।। ४ ।।

* * *

वही दोन पान ८७.    [1] कोट, बुरुज

## १८

### ( चढ )

ब्रिद डफावर लाऊन फिरतां कवि आडवा होऊन अडवील ।
त्या वेळीं जर शब्द सुचेना तर कुत्र्यावाणी बडवील ॥ ध्रु० ॥

घरांत आपल्या ब्रिद लावले गाण्याची चढली गुंगी ।
उदंड आला राग तरी का पर्वतास उचलील मुगी ।
भैरी ससाण्यावर त्या चालून गेल्या चिमण्याच्या चुगी[1] ।
दाहावीस त्यानें लोळविल्या, तुरासीच आली पुंगा[2] ।
शास्त्रसंमतांविण बोलतां कुणी तरी अकल घडवील ॥ त्या ॥

एक पाहिला नर चरण ना कर कांहीं नाहीं त्यासी ।
कुटुंब त्याला नसतां कन्यारूप वेती झाली खासी ।
त्या कन्येस कोणी पतकरेना गर्भित झाला अनायासी ।
तिजपासून कन्या उद्भवली बहून चांगली गुणरासी ।
तिच्या अंगीं फार करामत मेरू पहाड बगलत दडवील ॥ त्या ॥

त्या नारीला भ्रतार नसतां पुत्र एक तिजला झाला ।
पुत्र प्रतापी महा पराक्रमी एक अक्षर नांवाला ।
च्यार शिरें त्या नरास कन्या सोळा मग झाल्या त्याला ।
आणिक त्याला पस्तीस वर त्या आला प्रत्ययाला ।
त्यामध्यें एक होती सुलक्षण कैकाला अक्कल पढवील ॥ त्या ॥

प्रथम कोणता नर, त्या कन्या दोन कोण त्या कविराज ।
सोळा कन्या पस्तिस वर त्या तीन सांग सोडून लाज ।
कविराज हैबती सवाई प्रसन्न नाथ धनी महाराज ।
सबळ मती कवितेसी देतो अक्षरवटी जडणी जडवील ॥ त्या ॥

* * *

१ कळप. २ तुला तसाच गर्व चढला आहे.

## १९

### ( उत्तर )

ऐकुन घ्यावें उत्तर आतां निर्णय कथितों शास्त्राचा ।
चतुर ज्ञान संपन्न बैसला अन्वय पाहावा अर्थाचा ॥ ध्रु० ॥

नर म्हणण्याचा भाव वृथा तो ब्रह्मची ते निर्विकार ।
कन्या झाली अहं ध्वनी ते माया देव सोहंकार ।
ते पति नसता गर्भिण झाल्या कन्या व्याली सुकुमार ।
ते गुण माया असे बोलनी शास्त्रांतरी ते कविकार ।
मेरुसारखे दाविल दडविल अंतच नाहीं करण्याचा ॥ च ॥

पतिविणा ते पुत्र जन्मली ओंकारची म्हणती त्याला ।
शिरें च्यारही कशीं तयाचीं तुम्हीं आणावें ध्यानाला ॥
तिन गुण आणि माया चवथी शरीर नाहीं शून्याला ।
शून्य ब्रह्म तें आदी अंतीं चार शिरें त्या चौघाला ।
पांच मिळून ओंकार एकाक्षरी नाव अर्थ बहु त्याचा ॥ च ॥

ओंकारापासून कन्या सोळा आकारी झाल्या निर्माण ।
पुढें झाल्या पस्तीस ऐसे वार्टणिचें परिमाण ।
आदी माया ते मूळची सागधी साडे बावणावी पहावी ।
तिचें सुलक्षण आहे सर्वांमधीं सर्वांवर तिचें ठाण ।
बावनाला तिच चेष्टवी शब्द मायिना कवणाचा ॥ च ॥

अर्थ आहे प्रश्नाचा होसाचा समजून घ्यावें चित्तासी ।
पंचकर्ण सिद्धांत दाखला वेदांत आहे त्यासी ।
ज्ञानेश्वरीमध्ये अर्थ निवडला अनर नाहीं रती ज्यासी ।
कविराज हैबती कवन करी शास्त्रमत दृष्टातासी ।
प्रसन्न नाथ निरंजन समयोचित मति दे शुभवाचो ॥ च ॥

* * *

## २०

## अधर ताल

### ( चढ )

अधरा अधर न लागे गा गाणं । कळेल आतां हें ज्ञान ॥ ध्रु० ॥
घरच्या घरांत ते शाहिरी करिता । चित्तीं अहंता धरिता ।
रणांत लढतांना कां रे डरतां । गली गलो दडतां ।
गांठ सहज आज घडली आतां जर का अससी ज्ञाता ।
दाखले सांग आधार अर्थानं ॥ १ ॥

स्त्री एक ऐसी देखिली आचाट । हृदयीं स्त्रिया आठ ।
येकीला चरण रे तिनसे साठ । दिसले हागीनें दाट ।
तिचा हृदयीं कांत तिचा सदढ[१] । कीर्त जसी ग जगजगाट ।
त्याला चार लक्ष रे कान ॥ २ ॥

त्याचा आधार आहे सर्वांला । सृष्टी तारकवाला ।
सनकादिक हृदयीं ध्याती ज्याला । हात सातशें त्याला ।
नयन तर गणती नाहीं तेजाला । नर हा आण ध्यानाला ।
त्याला तीन लक्ष रे चरण ॥ ३ ॥

दाखला सांग शाहिरा आज याचा । कळेल तर्क ज्ञानाचा ।
रठा[२] आला हो नागेशाचा । असरा आहे नाथाचा ।
ध्यानीं अर्थ आणा रे शास्त्राचा । रंग टाक रे वेडाचा ।
ह्या अज्या आधीं लक्ष रतीचें गाणं ॥ ४ ॥

* * *

शाहीरश्रेष्ठ हैबतीबुवाला एकदां फडांत वरील प्रश्न नागेशाच्या रठांतील कवीन विचारलेला होता. हैबतीच्या ज्ञानाला हें जवळ जवळ आव्हानच होतें. तें हैबतीनें स्वीकारून त्याला खालीलप्रमाणें उत्तर दिलेलें आहे.

---

१ सुदृढ. २ समुदाय किंवा जत्था.

## २१

### ( उत्तर )

उत्तर ऐकून घ्यावें प्रश्नाचें । शब्द रोकडे याचें ॥ ध्रु० ॥

स्त्री एक अचाट ती पृथ्वी जाण । हृदय स्त्री
आठ म्हणनं । त्याचा आठ दिशानें नेत्रि पाहणं ।
दिशा चरण परिमाण । तिनसे साठ ग्राम चालून जाणं ।
ऐसें आहे संधान । दिशा पति दिसते वस्ती स्थळ
त्याचें ॥ ध्रु० ॥

अग्नी दिशापति अग्नी कळला । हात सात हे त्याला ।
कान ते चार लक्ष आपला । लक्ष म्हणती पाहण्याला ।
योगी मुनी हवनी नमती त्याला । श्रेष्ठ आहे सर्वाला ।
त्याचें प्रमाण तीन चरणाचें ॥ १ ॥

अग्नी तेज श्रेष्ठ सर्वांनाहीं आसी जाणती शाई ।
शांति स्थित अग्नी वाचून नाहीं । शास्त्रें देती ग्वाही ।
पाक सिद्ध अग्नीविण कांहीं । कदापी होणार नाहीं ।
ऐसें महत्त्व अग्नीचें साचे ॥ २ ॥

वदनें दोन, चार शिंगें त्यासी । ग्रंथीं कथिलें ज्यासी ।
अन्वय शोधुन पाहावा चित्तासी । येईल अनुभवासी ।
कवि हैबति ध्यातसें नाथासी । लक्ष गुरुचरणासी ।
मती दे कवनासी बळ आहे त्याचें ॥ ३ ॥

* * *

## २२

### ( चढ )

बराच लावून झोक तुम्ही कवि बसला गायासी ।
एक पुसतो पुसबोल उत्तर या ठायासी ॥ ध्रु० ॥

गाल ताल सुर धरून घातला डोल बरा मोठा ।
छ न चतुरता फारदिम वला ज्ञानाचा कोता ।
असाच सर्वा भरमनका अणु अब्रुला तोटा ।
उत्तर कमी पडतां म्हणतील माळावरला गोटा ।
कशास यावें पोटा गावें लौकिक नाथासी ॥ १ ॥

एक पाहिला शुभ्र चरा तो घ्यावा ऐकून ।
लांबी ऐसी सहस्र गज तो होता चहुकान ।
इस चौरस सारखा किता गति गज पाहवा मोजून
चोविस तसु गज एक ठाव आहे सर्वांसी खूण ।
कितेक झाल तसु जमाकर बेरीज अनायासी ॥ २ ॥

एक तसुचीं लिंगें तिनशें तेहतीस निर्धार ।
किती लिंगें झालीं कर गणती पाहे गुणाकार ।
येक लिंग किंमत ती मोहराचा सुमार ।
साडे पंध्रा रुपये एका मोहरेचा आकार ।
किती करसी वेडे विचार शहाणपण येईल प्रत्ययासी ॥ ३ ॥

तसु गज लिंगें द्रव्य न्यारी न्यारी कर संधान ।
किती रुके येक कर विश्व समजेल आज ज्ञान ।
कविराज हैबति नाथ निरंजन वरदान ।
सवाई इफावर ब्रिद करण अर्थधुक प्रमाण ।
तुरेवाले नादान मूर्ख लागले पळायासी ॥ ४ ॥

* * *

## २३

## ( उत्तर )

ऐकून घ्या चिरा सांगतों बेरीज नेमाची ।
गज तसु आणि लिंगें मोहरा गणित रुपयाची ॥ ध्रु० ॥
ऐसी सहस्र गज चरा सारखा ऐका गज गणती ।
निधा एकावन आणिक वत्तीस सर्वांची भरती ।
तसु शख सत्तर पद्म सत्याहत्तर म्हणती ।
निाघ आठ्याऐशा आणिक ऐसी सर्व गणित वरती ।
पुढें सांगतों आतां अटकल ऐका लिंगाची ॥ १ ॥

दोन रुंद पस्तीस कल्प एकून उत्तर शंक ।
छत्तिस पद्म सत्तर निधी च्याळीस सर्व ठीक ।
मोहरा झाल्या किती सांगतों ऐका तहकीक[1] ।
सत्तर रुप सत्तर कल्प आठ शंक पद्म दशक ।
सारा निधी विस खर्व गणांत ही आली मोहराची ॥ २ ॥

---

१. सत्य.

आतां सांगतों रुपये किती ते ऐका परिमाण ।
एक आहे हे कार आठ विस्तार असे जाण ।
पंधरा रुपे शतहात्तर कल्प घ्या ऐसी शंका मान ।
पदम सत्तावीस निधी एकवीस चाळीस खर्व पाहण ।
जमा बंदी एकंदर गणती झाली हो यांची ॥ ३ ॥
गज तसु आणि लिंग रुपये मोहराचा आकार ।
एकंदर सांगितला आवघा करून गुणाकार ।
लटके म्हणशील तर गुणून दावितों आतां सार ।
कवि हैबात म्हणे चुकी नाहीं यात रतिभर ।
कवितेसी आधार पूर्ण कृपा आहे नाथाची ॥ ४ ॥

* * *

## २४

## ( चढ )

कविनें कविसी बोलावें । काय तात्रा गैरीचा । ऐकून गप रहावें ॥ ध्रु० ॥ शाहाणपणाची जात घरोघर अर्थ नाहीं बरवा । दीड लावणीमध्येच मोठें झाला । बेपरवा । किती तुझा दम आहे गाण्याचा कळला कीं सर्वा । मनांत समजावें ॥ का ॥ एक पुसतो पुस तुम्ही कवि म्हणता सुज्ञान । कुणे युगीं जन्मला वीर जांबुवंत बलवान । कोण तयाची माता पिता लावा ठकान । शास्त्रीं शोधावें ॥ का ॥ कोण दिवशीं जन्मला नांव ठेवलें कुणीं त्याचें । कोणाचा अवतार काय कारण त्या जन्माचें । मेरुवरून टाकली उडी काय नांव दिवसाचें । प्रत्यया यावें ॥ का ॥ नका बसू भ्रमांत गावना हें उत्तर सांगा । जाईल लौकिक तुझा वाडवडिलास थांगा । कविराज हैबति म्हणे काय करशील नुसत्या ढोंगा । शरणांगत जाव कविला ॥ का ॥

## २५

### ( उत्तर )

पुसीचा जाब साल घ्यावा । रामायण ग्रंथा आन्वय कथितों प्रत्ययास यावा ॥ ध्रु० ॥ कृता युगाचा प्रथम संवत्सर परिमल हें नांव । ज्येष्ठ शुद्ध तृतिया दिन बुधवार कविराव । जांबुवंत जन्मला पुष्य नक्षत्रीं ऐकावें । पुढें ध्यान लावा । अर्थी या । रिष[1] मनुष्य अकृती रुक्षराज नाम आभिधानी । ज्यांबुवंती त्याची स्त्री असे त्या उभयतांनीं । आराधना ब्रह्मयाची केली तप आती निर्वाणा । पोटीं जन्म व्हावा । अंशरू ॥ रा ॥ आदि ब्रह्म तो शयनि असतां जांबई आली त्याला । जांब अंश म्हणून नाम ठविले जाबुवयाला । गोरज रुषी पहावा । उपाध्या[1] ॥ रा ॥ जन्म जांबुवंताचा झाला ऐसी या प्रमाण । जन्म कथन रामायणीं कथिलें आहे वाल्मिकानें । कवि हैबति म्हणे अगस्ती रामायणीं पाहणंभ नाथ हृदयीं ध्यावा अखंडित ।

* * *

## २६

### ( गणित काव्य )

शास्त्रमनाचें ज्ञान काय माहित अडाण्याला ।
हें उघड दिसतें पुसावें उत्तर शहाण्याला ॥ ध्रु० ॥
समयोचित बोलणें सुचवें प्रति उत्तर ।
तेंच कविचे शब्द जाणता कवि मतांतर ।
गैर अर्थ आक्षर काय करणें त्या गाण्याला ॥ १ ॥

---

१. अस्वल ( मूळ संस्कृत शब्द ' ऋक्ष ' असा आहे )

२०२९४ वि: ७७ नों: दि: २७/८

अर्थ एक पुसतो आतां शास्त्राची खुणगांठ।
उत्तर करण्यावरून समजल ज्ञानाचा घाट।
कोसाचे किती हात किती बोटें हात वहिवाट।
किती जवाचे बोट कोणती खूण जव भरण्याला ॥ २ ॥
शोध जवाचा लावुन आकार घाला कोसाचा।
च्यार कोस झाल्यावर ठरला नेम योजनाचा।
किती योजनें झालीं म्हणजे देश म्हणायाचा।
किती देशाचें मंडळ बोला नेम करून त्याचा।
किती मंडळें खंड मोजण्याला ॥ ३ ॥
शास्त्रावाचुन खरें मानिना कोणी वचनाला।
**गणित श्लोक** पाहिजेत तेव्हां येतें ध्यानाला।
घडघड बोलावें अंतर पडो नये याला।
कविराज हैबती करी शास्त्र अन्वयाला ॥ ४ ॥

*　　*　　*

## २७

### ( उत्तर )

तुम्ही चतुर बैसला म्हणून बोलावें अनुमान।
पृथ्वीची मोजणी गणित ऐकुन घ्या परिमान ॥ ध्रु० ॥
दोन अणुचा एक आहे त्रसरेणू नांवाला।
त्रसरेणू आठ धरिले तेव्हां रथरेणु झाला।
रथरेणू ते आठ असे म्हणती बालाग्राला।
आठ बालाग्रो लिक्षा, आठ लिक्षास यूका याला।
आठ यूका जव झाला ऐसा याचा आहे मान ॥ १ ॥
आठा जवाचें बोट मूठ झाली चव बोटाची।
साहा मुठीचा हात बोली ही आहे प्रत्ययाची।
चार हताचें धनुष्य आहे बोली शास्त्राची।
दोन सहस्र धनुष्य मोजणी भरली कोसाची।
चार कोस झालीया एक योजन हें संधान ॥ २ ॥

शंभर गांवें पृथ्वी जेव्हां आली मोजाला ।
तेव्हां गुणी राजसा संदोस एक देश झाला ।
शत देशाचें मंडळ, मंडळ ऐसें नांव आहे त्याला ।
शत मंडळातें खंड एक आलें बेताला ।
ऐसीं हीं नवखंडें गणिलीं लिलावतकानें ॥ ३ ॥

पृथ्वी नव खंड असी मोजणिला सापडली ।
किती कोसाचे जव किती जव नव खंडें भरलीं ।
आतां सहज अटकळ गणित जव खोटें सांगितलीं ।
कवि हैबती म्हणे असा गणती याची ठरली ।
शिरीं कृपासावली नाथ निरंजन वरदान ॥ ४ ॥

* * *

## २८

### ( चढ )

कवि बस झोका खाली । आतां वेळ प्रसंगाची आली ॥ ध्रु० ॥

तुम्ही तर थारले गाणार । शहरामधी राहणार ।
सिद्ध ग्रंथ पाहणार । अक्षरत्रटी कविता करणार ।
चतुरता ऐकुन मर्जी खुश झाली ॥ १ ॥

म्हणती वनस्पती आठराभार वृक्षाचा संभार ।
भार किती वृक्षाचा वद परभार । तुझ्या शिरावर भार ।
बैसली सभा नदर कर भवताली ॥ २ ॥

आठरा भार गणित किती योजावे । अंतरांत समजावे ।
भर मजलसींत सत्वर गर्जावे । गैरशब्द वर्जावे ।
बोलु धिटपणा कर अवधारे ॥ ३ ॥

मध्यम थोर लहान गणती करकी । चोलावे लवकर करकी ।
जरी सुचेना उत्तर की । मग आली अब्रु वर की ।
[1]म्हणे हैबती तेचि वाली पुरते ॥ ४ ॥

---

१. हैबता म्हणतो कीं, माझे पुरते वाली ( म्हणजे पाठीराखे ) ते नाथ आहेत.

## २९

### ( उत्तर )

तुम्ही चतुर बैसला म्हणुन कथितो शास्त्राधार ।
वनस्पतींचा भार सांगतो ऐका निर्धार ॥ ध्रु० ॥

वनस्पती आठरा भार बोली सर्वत्रांची ।
भार आहे केवढा खबर नाहीं त्या भाराची ।
आहे श्लोकाची गणित सांगणी लिलावतकांची ।
श्लोकाचा अर्थ सांगतो गणती नेमाची ।
स्वस्थता[1] करून चित्ताची पाहावा निर्णय साचार ॥ १ ॥

क्रोड एक दहा लक्ष वरते सहस्त्र एक्याऐंशी ।
या अंकाची दुणा करावी मोजुन अंखासी ।
दोन क्रोड एकवीस लक्ष ऐका वचनासी ।
वर सहस्त्र बासष्ट आला एक भार ताळयासी ।
ऐसे अठरा भार वनस्पती म्हणती शास्त्राकार ॥ २ ॥

एकंदर अठरा भार किती परिमान ।
सकळ जमा सांगतो करून भर मंडीचा मान ।
एकुन चाळीस त्रेपन्न लक्ष एकुण नव्वद पाहणं ।
वर ते सोळा सहस्त्र झाले गणती संधान ।
आतां सांगतो लहान थोर मध्यमा आकार ॥ ३ ॥

सतरा कोटी लक्ष एकुणीस बावन हजार ।
तेरा कोटी लक्ष अठावीस सहस्त्र बहात्तर ।
नव कोटी चाळीस लक्ष व्याणव सहस्त्र ।
कवि हैबती म्हणे वनस्पतीचा हा प्रकार ।
प्रसन्न नाथ महाराज देत तार्किक मती विस्तार ॥ ४ ॥

* * *

---

१ स्वस्थता.

## ३०

### ( चढ )

ज्ञानवंत बसला थोरले कवीश्वर । एक पुसतो पूस
शीघ्र बोलावें उत्तर ॥ ध्रु० ॥

ऐकत होतों कीर्ति फार नांवाचा बडिवार ।
कवि ब्रिदाचे भले जाणते शास्त्रांतील सार ।
मनांत होता गाठ पडण्याचा विचार ।
तो दिन आला आज भेट झाली समयानुसार ।
प्रश्न सुचला एक नाहीं बहुतेक अगोचर ॥ १ ॥

एक पळाचीं साठ अक्षरें ऐसी आहे बोली ।
एक अक्षरामधीं चाल सूर्याची किती झाली ।
साठ पळाची घडी घडीमध्यें किती गावें भरली ।
तिसा घडींचा दिन दिनाचें प्रमाण कोठेंवर ॥ २ ॥

तिसा दिसाचा मास योजनें किती झालीं त्याचीं ।
एक वर्षांमधे योजनें कितीक नेमाचीं ।
ऐसी गणती करून सांगा शंभर वर्षांची ।
किती योजनें झाली गणती सांगा कोसाची ।
किती एकंदर बेरिज होती वदावी सत्वर ॥ ३ ॥

नका उशीर करूं जरा मोल जलदिला आहे आतां ।
उत्तर केल्याविण रिकाम्या काय करून जाता ।
समजल अवघें ज्ञान तुम्ही जातीचें कवन गातां ।
कविराज हैबती अखंडित मनी आठवी नाथा ।
कवितेसी वर देता कृपाहस्त शिरावर ॥ ४ ॥

* * *

## ३१

### ( उत्तर )

तुम्ही चतुर बैसला आतां परिसावी गणित कविता ।
परीमाण सांगतों पाहा चालतो किती सविता ॥ ध्रु० ॥
एक अक्षरामधे एक रवि किती चाले ।
चार सहस्र चारशेचार योजनें गणित आलें ।
साठ अक्षरें पळ, पळामधें काय गणित जाहलें ।
दोन लक्ष चौसष्ट सहस्र दोनशे च्याळीस कळले ।
साठ पळाची घडी किती ऐका त्याची गणिता ॥ १ ॥
क्रोड एक आठावन लक्ष चोपन हजार ।
वर आणिक चारशे पुढील ऐकावा प्रकार ।
तिसा घडीचा दिन दिनाचा कितिक आकार ।
सत्तेचाळीस क्रोड लक्ष छपन्न ते साचार ।
वर ते बत्तीस सहस्र आला ताळा याचा गुणीता ॥ २ ॥
एक मास दिन तीस आर्व चवदा क्रोड सविस ।
ऐकुन नवद लक्ष साठ सहस्र मोजणीस ।
वर्षाचे एक खर्व आर्व एकाहत्तर खास ।
वरते बावीस क्रोड लक्ष्य पंचाहत्तर नेमास ।
वरते झाले विस सहस्र समजले ध्यानासी आणता ॥ ३ ॥
ऐसी शंभर वर्षें झालीं चाल भास्कराची ।
येक निधी खर्वें एकाहत्तर गणित याची ।
बावीस आर्वावर क्रोड पंचाहत्तर बेताची ।
विस लक्ष बेरीज असि गणती झाली त्याची ।
कवि हैबती म्हणे कवनमती नाथाची चालविता ॥ ४ ॥

* * *

ज्या कवनामध्यें अशी आकडेमोड आहे त्या कवनास 'गणित कविता' असें हैबतीबुवांनीं नांव दिलें आहे.

# संगीतशास्त्र

## ३२

## (चढ)

तूं काय गाशील भेद गायाला तुझी अक्कल समजु आली।
बोल संभाळून आत्ता शब्द तो अर्थाचा पडू नये खाली।
दिडच पैशामध्ये शेडजी, दीड लावणींत कवि अक्कल।
प्रसंगानुरूप शब्द वदावे तर ज्ञानाची मजा पटल।
रानदांडगा उगाच आपल्या शरिराकडे पाहुन नटला।
उदंड बोका पुष्ट माजला म्हण का वाघाशीं झटला।
रवीपुढें काजवा मिरवितो गोड प्रकाशा आव घाली।
गलेलठ्ठ कुनरा कीं मांजर शहाणी चुलीच्या भोवताली॥ १॥
कळल शहाणपण आता गावणा पुस पुसतो-सांगावी।
सहा राग हे कोठुन झाले खुण ठिकाणीं लावावी।
माता पिता कोण तयाची वस्ती सांग कोणे गांवीं।
नांवें मुख्य रागाचीं कोणतीं खुण शास्त्राची लावावी।
दिवस मास लक्षण कोणतें सांग कोण कोठुन झाली।
कोणी प्रगट रागाशी केलें कोणी मिळविलें सुरताली।
स्त्रिया एक एकाच्या सहा सहा त्याच रागाच्या छत्तीस।
ज्याचे त्याला करा वाटणी सहा सहा नांवें गणतीस।
नांवें न्यारी छत्तिसाचे भरतीस।
त्या कन्या कोणाच्या माता पिता कोणते वस्तीस।
कोणता मास कोणता संवत्सर कोण कोणे दिवशीं व्याली।
तुला कळेना तरी शरण जा गुरुनाथ होईल वाली।
ब्रिद डफावर लावुन फिरतां आकडबाजी मिरवायाची।
काय करावी आकड अमली वेळ अब्रु जायाची।
कविमताचें कलम वेगळें खुण नाहीं गवसायाची।
प्रसन्न नाथ महाराज शिरावर पाहुन पळती तुरेवाली।
डफावर झडे फडके, गर्द मंडळ भवताली॥

* * *

# ३३

## ( उत्तर )

ऐकुन घ्यावी आतां सांगतों उत्पन्न रागाची ।
येक येका सहा कन्या छतिस रागिणयाची ।
भ्रम युगात शिव निद्रिस्त तें एका समयाला ।
हृदयांतुन हुंकार शब्द तो वदनास गे आला ।

त्या शब्दापासुन पुरुष सहा आले जन्माला ।
विद्याधर गंधर्व कन्यका महा स्त्रिया सहाला ।
त्या साहापासून सहा राग ते आले आकाराला ।
सहा रागापासुन जन्म छत्तिस रागिण्याला ।

स्त्रीया त्या कोणत्या सांगतों आणा ध्यानाला ।
मातापित्यासहित पंरीसा नांवें सर्वांचीं ।
शिव रामायणीं कथा सर्व कथली आहे याची ।
जांबु द्विपीं श्रीराग पिता तो चंद्रमोळी त्यासी ।

गौडा माता संभव शष्टी मार्गेश्वर मासी ।
पौष शुद्ध शष्टीस जन्म स्त्री मालत नामासी ।
कन्या कौसुकी देवबळ गांधारी ग्रहवासी ।
मंडळी दशंती साहापुढें पाहा राग वसंतासी ।

मन्व पिता माता गोत्री कुटचळीं सिंहल द्विपासी ।
संभव माघे जन्म शुद्ध पौर्णिमा काल गुणासी ।
जयवंती स्त्री कन्या घनाश्री वैराटी ज्याशी ।
करमंजरी पडमंजरी कंसा देव गौडी साची ।

क्रौंच द्वीपिं उत्पन्नना एका पुढें भैरवाची ।
जयत्पिता कोलाटी माण त्या संभव चैत्रांत ।
वैशाखामधी शुद्ध एकादशीस माण त्यात ।
सुपर्णिका स्त्री कन्या भैरवी उळळीत म्हणतात ।

वेळ उळी गुर्जरी कर्णाटी हंसबाळी त्यांत ।
ऐशा झाल्या साहापुढें पाहा पंचम रागांत ।
झाला द्विपींश्रुत पिता माय आंघावळी नामात ।
संभव जेष्टी जन्म शुद्ध सप्तमी आषाढांत ।
स्त्री दशकारी मुली थोटकी मोटकी म्हणतात ।
तत्पदी नाटकी यम म्हागयण परत्परायाची ।
कुशद्विपीं उत्पन्नता पहावी मेघ राजाची ।
द्रावळी माता पिता श्रयंता पर्वत गांधारी ।
श्रावणी संभव जन्म विणायक चतुर्थी निर्धारी ।
ज्योतिका स्त्री कन्या कल्याणी आणि मधुकारी ।
बंगालिका सोर्टी सारेटी भुपाळी अवधारी ।
ऐशा झाल्या साहा पुढें तो नट राग विचारी ।
जन्म तयाचा झाला पाहा काश्मिरांत अधिकारी ।
पिता तयाचा विनट असा बाल्ती प्रजा सारी ।
माता ते मंगला साहावी सेवटची बारी ।
आश्विन माशी शुद्ध सप्तमी संभव खुण याची ।
कार्तिक मासी शुद्ध एकादशी तारीख जन्माची
कमल विलासी वधु कन्यका × × बल माही जाण ।
रंगाश्री असावरी येगदानी चौथी पाहणं ।
गांधारी जयवंता यासा नामें अभिदान ।
न्यारी न्यारी नांवें सांगितलीं या प्रमाण ।
सहा राग छत्तीस ऐशा निर्माण ।
**शिवरामायणीं** ग्रंथीं याचा लागेल ठिकाण ।
कवि हैबती नाथ निरंजन वरदान ।
कृपा हस्त आहे शिरीं देत कवितेसी मतिदान ।
सवाई डफावर ब्रिद कविता शास्त्रसम्मताची ।
वैरी पाहुन लाजती कविता निर्मळ अर्थाची ।

* * *

## ३४

### ( चढ )

तुम्ही चतुर बोलके विचक्षण बहुसूज्ञान । प्रश्न पुसतों
शोध करा कविमत तांत्रिक ज्ञानें ॥ ध्रु० ॥

कवि मताची किती पदें कोणती कसी याचीं नांवें ।
कुण्या पदाचीं किती अक्षरें संमित रथ छंदा पहावें ।
सर्व पदाची अक्षरगणती किती झाली आधि बोलावें ।
किती पुरुष किती स्त्रिया किती न पुस्तक दाखले सांगावे ।
कुण्या पदावर कविता करता कवन कोणत्या मतानं ॥ १ ॥

क पासुन पस्तीस आक्षर एका खडीची जाणावी ।
वो ची सत्रा एकून बावन मात्रुका खुण वळखावी ।
क जातीचा कोण ख जात तयाची शोधावी ।
क ख नातं एक एकाला कसी लागती तयाची पहावी ।
ब्राह्मण क्षत्रीय वैश्य शूद्र आधि लावा याचा ठिकाण ॥ २ ॥

काळी गोरी रज तम सत्व निवड करून काढा याची ।
त्यामध्यें आठरा वर्ण कोणते व खुण सांगा कविमताची ।
एक एक अक्षर ते कैसी अटकल बोला वचनाची ।
वजन ताजवा यांतच आहे जात कविता करण्याची ।
शास्त्रमतामध्यें शोधून पहावे अनुभव युक्ति संधान ॥ ३ ॥

तुम्ही कवि म्हणविता कवि अक्षरें दोनि कोठे असती ।
शरिरी एके जांगी सांगा ज्ञानाची समजल स्फुर्ती ।
कविराज हैवति कवन करी नाथ कृपा आहे पुरती ।
छंद रसिक रड अक्षर वटिका समयोचित कविता स्मरती ।
**पिंगळ ग्रंथाविण** कविता काय करावी आंधळ्यानं ॥ ४ ॥

* * *

# ३५

## ( उत्तर )

निवड करून सांगतों पदाची जो कवितेचा आधार ।
कोणकोणतीं पदें कसी हा पिंगल ग्रंथीं आधार ॥ ध्रु० ॥

पदें कविमताचीं पंधरा अक्षरें बावन जाण ।
बावन अक्षरांत पद हीं पंधरा नामें अभिधान ।
सात पदें शुभ कविमताची अशुभ आठ अपकारान ।
शुभ अशुभ कोणती सागतो ऐकून घ्य वें परिमान ।
पुरुष नारी नपुसक किती निर्णय कथितों खचिताकार ॥ को ॥

शुभ पदें कवणाची । अ आ इ ई । अखि । अंडज ठावी ।
घनक । आब्रोवा । घनतन । भवखम । पद सात ही उमजावी ।
अशुभ उरली । उयाली । झगचख । छायट । ही परीसावी ।
ढञयप । परमल । दळढ । यक्षहथ । ही आठ झाली ऐकावी ।
नव नारी नपुसक दोन ही बाकीची नर साचार ॥ को ॥

क ख सुधा बावन आक्षरें यासी वडील ।
ओंकार ख हा एक कविष्णु ख मधुमुदन अद्वैत पदी हाच दुसरी ।
दोनी पुत्र ते ओंकाराचे बंधु प्रमाणें ही जमा धरा ।
अ कारी ब्राह्मग । उकारी वैश्य । क वेघरा । ब कारी शूद्र ।
ब कारीं गोरा । ह कार काळी विचार ॥ को ॥

आ उ म ही रज तम सत्व वडील । ओंकाराची याला ।
कवि अक्षरें वो ची पोटी अनु हात स्थळ ओंकाराला ।
तेथुन ही अक्षरें जन्मती वजन परम महान त्याला ।
कवि हैबति म्हणे खरे खोटे पहा पिंगल ग्रंथाला ।
प्रसन्न नाथ निरंजन झाला कृपाकरून करितो पार ॥ को ॥

* * *

## ३६

### ( सवाल )

बस बसा कविराज शब्दाची घालुनिया आडती।
परस्परा समजेल कुशलता ज्ञानाची होईल झडती ॥ ध्रु० ॥

दुसऱ्याचे आश्रयानें बोलता आता प्रत्ययास येईल।
व्यर्थ कविला दुषण देता क्षणामध्यें अब्रु घेईल।
पाठीमागे गप्पा झोकिता क्षणांत अब्रु घेईल।
गैर अर्थ बोलणें बोलता शतमूर्ख तो होईल।
एक पुस सहज पुसतो सभेमध्यें होईल झडती ॥ १ ॥

मारुती अकरा एक सारखे होते ऐकून घ्यावें।
एक भक्त त्या ठाई सेवा करी नित्य सोने वाही।
एक मूर्तीला सोने वाहिले कीं पुन्हा दुप्पट व्हावे।
शेवटले मारुतीला साने वाहता सारखेच यावें।
अशी त्याची नित्यानें सेवा घडती ॥ २ ॥

प्रथम मुळीं किती सोने घेतले। अंक तेवढा सांगावा।
पुढें तयांचा प्रयोग पुसतां ऐसा समजावा।
चौदा कल्प सोने वाहिले किती आकार झाला पाहावा।
कितिक झाल्या खंड्या मण शेर करून दावा।
सभेमध्यें उत्तर बोला सर्वांत आवडती ॥ ३ ॥

किती मुळीं सोने होते वजन सांगा त्याचे।
कितिक झाले गुंजा तोळे जवू करून साचे।
कवि हैबता म्हणे गणू नका काम हे गाण्याचे।
नाथ निरंजन प्रसन्न होईल निरसन होईल प्रश्नाचे।
सभेंत उत्तर बोला गुरुकृपा आहे पुरती।
परस्परा समजेल कुशलता ज्ञानाची होईल झटती ॥ ४ ॥

* * *

## ३७

आम्ही एक सुंदर पाहिनी वरुशे तेरा ।
शीर उराला, उर शिराला शास्त्रीं पाहे कविश्वरा ॥ ध्रु० ॥
जिच्या कमरेला छपन्न हात पाय तीनशे खांद्याला ।
सर्व अंगाला एकच डोके नाके तीन तिच्या तळव्याला ।
गाल घोट्याला कान होटाला दात हताचा अंगठ्याला ।
कान सोळाशे योनी चारशे होत्या पायाच्या गुडघ्याला ।
मांड्या तिच्या गणतीस आल्या मोजुन पाहिल्या त्या सतरा ।
माय बाप नाहीं भ्रतार नाहीं नीर सुन्या मध्यें आहे थारा ॥ १ ॥
पाच काळजे त्या नारीला तीन पोटे परीयेसी ।
चोळी घातली पायामध्यें लुगडे गुंडाळलें शिरासी ।
एक थान ब्रिनदुधाचे होते तिच्या टिरीशी ।
गुदद्वार सहाशास्त्रे वेद वर्णीती परीयेसी ।
सर्वकाळ निपुण चांगली पुराणे बोलती आठरा ।
बाग वर्षांतुन येती एकदा पाहा कामिनी आकारा ॥ २ ॥
ब्रह्मा विष्णु महेश हे तिन्ही देव तिजला भिताती ।
सप्त द्विप नव खंडें चौदा दुर्गे मुखी वसती ।
आनंत हात विष्णु कारणें ते सेवा तिची करिती ।
परंप्रतापी महा अनुतापी स्वरूप सुंदरा रुपवन्ती ।
छपन्न कोटी भूमिका तेथील जाणावी रे खेचरा ।
ध्यानीं धरवेना स्मरणीं पाहावेना बुद्धिमंद तेथें अगोचरा ॥ ३ ॥
नार ऐवढी सांगून द्यावा कविराया मज लौकर ।
सद्‌गुरुला पुसुन येई देई पदाचे उत्तर ।
कविराज हैबती हमेशा गातो भेद-गुण-गभीर ।
तुरेवाल्याचे कान कापले गैरी पळती दुरदुर ।
तुला एक मुदत देतो कविराय जन्न आठरा ।
नाथ निरंजन प्रसन्न झाले सवाई जरीचा फरारा ॥ ४ ॥

* * *

## ३८

तुरेवाले प्रश्न विचारतात : ह्या पृथ्वीवर १०७ मस्तकें असणारा मनुष्य कोण? त्याचें नांव काय?

हैबतीबुवा प्रश्नाचें उत्तर खालील कवनांत देतो :—

### (उत्तर चढाचें)

तुम्ही ज्ञानसंपन्न बैसला सर्व जाणते मतांतर ।
जाबसाल पुसल्याचा निर्णय ऐकून घ्या उत्तर ।
लहान थोर बैसले सभेमध्यें चित्त द्यावें शब्दाला ।
शास्त्रमनी कविकार बोलले तेंच मागतो तुम्हाला ।
नर देखला स्वार नंदीवर सांब असें म्हणती ज्याला ।
मुगुटी गंगा जटेंत ज्याच्या कंठीं वासुकी विषवाला ।
अर्धचंद्र मस्तकीं शोभतो, शोभायमान सुंदर ॥ ध्रु० ॥
पंच वदन श्री सांब नंदी तो वदन सहावे म्हणतात ।
वदन सातवे आहे गंगेचे ऐसी ही झाली सात ।
शंभर वदनें, कंठीं वासुकी हे वदती शास्त्रांत ।
एकुन वदनें झाली एकशें सात ॥
नेत्र दोनशें चौदा मस्तकीं एक जमा पंधरा धरा ॥ ध्रु० ॥
कर्ण दहा तें सदाशिवाचे, दोन नंदीचे तें, तें धरले ।
वासुकिला तर कर्णच नाहींत, चक्षुश्रवा ऐसे कळले ।
शोभिवंत नर असा श्रेष्ठ शास्त्र तरी बोलुन गेले ।
शचिनाथ[1] सुरपति[2] ज्याला ध्यान, करिती निरंतर ।
प्रश्नाचें उत्तर केले हे समजावें चतुर ज्ञानी ।
तिन्ही लोकामध्यें सांब असा नमस्कारीला देवांनी ।
कविराज हैबति कविता करी शास्त्रसंमत ध्यानी ।
प्रसन्न नाथ निरंजन आहे, दतर प्रकटुन ध्यानी ।
वरदहस्त मस्तकीं तयाचा समयसुचक अक्षर ।

* * *

---

१ शची ( इंद्राणी ) चा नाथ = इंद्र.
२ देवांचा अधिपति = इंद्र.

## ३९

दहा प्रश्न पुसता ज्यास त्याम नित्य येता जाता।
अर्थ शुद्ध करून सांगतों कवि तुला आता ॥ ध्रु० ॥
सूर्य राज पुरुष तो एक सर्वांमधि धरती।
रवि नम्ता आंधारीं राज्य कसे करती।
रुपवान स्त्री तीच रात्र उडगण्या ठरती।
रात्र नसल्यास मग नाही विसावा। सर्व लोक मरती।
चंचल मन ते चक्र फिरे गरगरती। त्रिंत्र
तेज सूर्याचे पहा तुज वरती। हा अर्थ समजेना
तर कशाला गाता अर्थी। दोही थड्या भरती
नदी नव जाण। नदी बंद झाल्यावरी। नाहीं
कायेचें भान। आपला बाप तोच अंतरीं मान।
हे कळत नाही ज्याला त्यानें जन्माची केली हाण।
पृथ्वी होते पर्यटन कांहीं नाहीं मागें राहिले।
ध्यानासी आणा। सहा प्रश्न येथें आले
शास्त्राच्या बाता। गुणी हैबती दावी जन्माचा रस्ता।
प्रसन्न नाथ महाराज भगवा बाणा डफावरती ॥

# घरच्या आयाविषयीं

## १

### ( लावणी )

आये घराचे अष्ट कोण तो आया कुठें द्यावा ।
शिल्पशास्त्र बोलिलें दाखला तो ऐकून घ्यावा ॥ ध्रु० ॥
घर बांधितां अष्ट आयांचें साधन आहे त्यासी ।
कोण जागीचा कोण आया ऐका वचनासी ॥
मध्यभागीं ध्वज आया मोजणी आणा नेमासी ।
धूम्र आया देईजे ठिकाणा तो स्वयंपाकासीं ॥
सिंह आया नेमकाचि मोजुनि दरवाज्याप्रत यावा ।
शिल्पशास्त्र बोलिलें दाखला तो ऐकून घ्यावा ॥ १ ॥

पिछाडीचे दरवाजाप्रति देइजे श्वान आया ।
चोराचें भय नाहीं योजून घालावा पाया ।
वृषभ आया तो उत्तम योजून देणें ज्या ठाया ।
म्हैस गाई अश्वादि ठिकाण तथें बांधाया ॥
मुळींच ऐसा पाया चतुरें योजून घालावा ।
शिल्पशास्त्र बोलिलें दाखला तो ऐकून घ्यावा ॥ २ ॥

खर आया देईजे ठिकाणा तोच निजावयासी ।
गज आया देईजे देवघर करणें देवासी ॥
ऐसे आये सात आतां ऐकावें आठव्यासी ।
शेवटचा आठवा चतुरें आणावा ध्यानासी ॥
ढंक आया बालती शेनखान्यासी परिसावा ।
शिल्पशास्त्र बोलिलें दाखला तो ऐकून घ्यावा ॥ ३ ॥

अष्ट आये याप्रमाणें एका घरामध्यें यावे ।
महिना पाहुन उत्तम घर बांधून नांदावे ॥
कवि हैबती म्हणे शिल्पशास्त्रामध्यें हें पाहावें ।
हेच आठांघरीं आठ आये सांगतों चित्त द्यावे ॥
ग्रंथ पाहिल्याविण शब्द कविवर न ठेवावा ।
शिल्पशास्त्र बोलिलें दाखला ऐकून घ्यावा ॥ ४ ॥

* * *

## सहदेव-भाडळी ज्योतिषमतावर हैबतीबुवा घाडगे यांचीं कवनें

## २

## अमावास्येवरून धारणेचें फळ.

अमावास्येचें फळ तुम्हां सांगतें सहदेवा ।
भाडळीचा दाखला ग्रंथांतरी तो शोधावा ॥ ध्रु० ॥
रविवारीं हो आली अमावस तरी धान्य स्वस्त होय ।
राजा प्रजेसी सुख उपजे आनंदांत राहे ॥ १ ॥
सोमवारीं आली अवस जरी उत्तम ती आहे ।
सत्कर्मी वर्तावे धारण महाग न होये ॥ २ ॥
मंगळवारीं आल्या अवस दुःख होत आहे ।
काळ पडेल म्हणवोनी उपजे चित्तामधिं भय । ३ ॥
बुधवारीं ती अवस येतां शांति सुख जाय ।
सर्व जिवासी क्लेश न होतां धान्य सवंग होय ॥ ४ ॥
गुरुवारची अवस मोठी सदा सुख पाहे ।
प्रपंचाची नको काळजी धान्य स्वस्त होय ॥ ५ ॥
शुक्रवारची अवस मध्यम सर्व फळ पावे ।
कण मिळतां बहुत परंतु रोग वृद्धि होय ॥ ६ ॥
शनिवारीं आली अवस ती नाशक होय ।
धारण महाग होईल जिवासी पीडा न साहे ॥ ७ ॥
अवस आणि संक्रांत जरी एकेवारीं होय ।
धान्य महाग होईल जिवाला पीडा बहु आहे ।
एसें फळ हें एक महिना प्राप्त तें होय ।
भाडळीचें सांगणें हैबती मुखें गात आहे ।
ज्योतिषांतील हेतु कळविला लटिका न मानावा ।
भांडळीचा दाखला ग्रंथांतरी तो शोधावा ॥ ८ ॥

* * *

## ३

## घबाड मुहूर्त

घबाड महूर्त केव्हां येतो ओळख सांग त्याची ।
बोले भाडळी सहदेवासी खुणा ज्योतिषाची ॥ ध्रु० ॥
सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्र मोजावें ।
तिप्पट करुनि तिथी मिळवुनी सातें भागावें ॥ १ ॥
तीन शेष राहतां घबाड आले जाणावें ।
मध्यावरती येतां कार्यी सत्वर निघावें ॥ २ ॥
सर्व कार्या लाभकारक अवश्य घ्यावें ।
ऐसे मुहूर्ती गमन करितां सुख संपत पावें ॥ ३ ॥
म्हणे भाडळी सहदेवासीं घबाड साध वें ।
सांगे हैबती याचे दाखले ग्रंथातरिं पहावें ।
उत्तर मुहूर्त तुजला कथिला प्राप्ती यशाची ।
बोले भाडळी सहदेवासी खुणा ज्योतिषाची ॥ ४ ॥

* * *

## ४

## तिर्थांविषयीं शुभाशुभ फळें

भाडळी सांगे सत्यवचन हे सहदेवालागीं ।
तिथि ज्ञान परियेस तयाचें गुण एके वेगीं ॥ ध्रु० ॥
प्रतिपदा ती उत्तम आहे कार्यी योजावी ।
द्वितिया आहे कार्यसाधिनी आवश्य घ्यावी ॥ १ ॥
तृतीया तैशी क्षेमारोग्य प्राप्तिस्तव पाहावी ।
चतुर्थी आहे पीडादायक तिजला त्यागावी ॥ २ ॥
पंचमी तर लक्ष्मीकारक यश सदा दावी ।
षष्ठी पाहतां कष्टी करिते ती तर नसावी ॥ ३ ॥
सप्तमी ही सखी आदर सत्कार घ्यावी ।
अष्टमी तर व्याधी उपजे क्लेश भोगावी ॥ ४ ॥

नवमी मोठी नाशकारक तिजला सोडावी ।
दशमी आहे हितकारक न टाकावी ॥ ५ ॥
एकादशी ती उत्तम आहे कधीं न सोडावी ।
द्वादशी ती प्राणघातकी द्रव्याला हरवी ॥ ६ ॥
त्रयोदशी ही कार्यासिद्धि कामीं योजावी ।
चतुर्दशी पौर्णिमा वाईट सदा दुःख दावी ॥ ७ ॥
अमावस्या ही मोठी क्रोधी कार्या नसावी ।
ज्योतिषाच्या पोरा सत्वर टाकोनियां द्यावी ॥ ८ ॥
कवि हैबती म्हणे तिथि त्या पहा अंतरंगीं ।
तिथि ज्ञान परियेस तयाचे गुण एके वेगीं ॥ ९ ॥

* * *

५

## यमघंट योग

### ( लावणी )

यमघंट हा योग त्यावर कार्य तें नोहे ।
बोले भाडळी सहदेवासी ज्योतिषांत पाहे ॥ ध्रु० ॥
रविवारीं त्या मघा आल्यावर शुभ कार्य नोहे ।
नारदाची नारदी झाली शोधुनिया पाहे ॥ १ ॥
सोमवारीं आल्या विशाखा काय झालें आहे ।
दुर्योधनाचे मांडीवरती भीमगदा घाय ॥ २ ॥
मंगळवारीं येती आर्द्रा दुःख प्राप्त होय ।
चंद्रासी तो कलंक लागला अद्यापि आहे ॥ ३ ॥
बुधवारीं हें मूळ आलें तरी घातक तें पाहे ।
भस्मासुराचें भस्म झालें कांहीं न राहे ॥ ४ ॥
शुक्रवारीं कृत्तिका असतां दुःख भोगिताहे ।
तेवेळीं मारिला कीचक एक मुष्टिघायें ॥ ५ ॥
शुक्रवार अनुराधा असतां टाकुनिया जाय ।
इंद्रजिताचा घात झाला रामायणिं पाहें ॥ ६ ॥

शनिवारीं तो हस्त येईल तरी मोठें विघ्न होय ।
यमपाशाचें दुःख भोगिलें तो मार्कंडेय ॥ ७ ॥

यमघंटावर गमन मरेल करितां तो पाहे ।
गृहप्रवेश होतां त्याचा कुलक्षय होय ॥ ८ ॥

देवादिक स्थापितां मरणा कारण तें आहे ।
जन्मल बालक तरि तें मरूनिया जाय ॥ ९ ॥

कवि हैबती गातो गुण वानितो भाडळी ।
ज्योतिषामधों पहा दाखले मंडंगमताचे ॥ १० ॥ (मिळवणी)

* * *

६

## मृत्युयोग

### (लावणी)

भाडळी सांगे ऐक सहदेवा माझी ही गोष्ट ।
वर्ज करों कार्यासी मृत्युयोग सांगतसे स्पष्ट ॥ ध्रु० ॥

रविवारीं अनुराधा सीता रावणानें नेली ॥
सहा महिन बंदीत असतां वश नाहीं झाली ॥
चंद्रवारीं उत्तराषाढा द्रौपदिला हरविली ॥
वस्त्रें हरण केलीं हरीनें लज्जा रक्षिला ॥
मंगळवारीं शततारका विश्वामित्रें छळिलें ॥
तारामति हरिश्चंद्र दोघें नीचासी विकलीं ॥
बुधवारीं अश्विनी नळाची दमयंती पडिली ॥
कष्ट सोसले बहुत ती तर दैवाला भ्याली ॥
गुरुवारीं मृग आला ते दिनिं अभिमन्यू पडला ॥
यास्तव पार्था दुःख जाहले भीमहि घाबरला ॥
शुक्रवार स्वातीला राजधर्म राज्य हरला ॥
द्यूत खेळतां पण लाविला राज्यासी मुकला ॥
शनिवारीं तो हस्त लक्ष्मणा शक्ति लागली ॥
मारूतीसी बहुकष्ट झाले वल्ली आणविली ॥
असे कुयोग असतां कार्या गेले बहु योगी ॥
कार्य न होतां परत आले हैबतिची सांगी ॥ भाडळी सांगे ॥ १ ॥

* * *

## ७

## लग्नाविषयीं

### ( लावणी )

सहदेव मतावरुनि द खले पहा याची चौकशी ।
वर्जवार तिथि नक्षत्रावर लग्नें देतां कशीं ॥ ध्रु० ॥

बुधवारी अष्टमी हस्त नक्षत्र आलें जरी ।
तरी लग्न देऊं नका काळ पडेल दोहीं घरीं ।
गुरुवारीं रेवती आणिक पहा दशमी आली जरी ।
नवरी अथवा नवरा मरेल तिथ संभाळा बरी ।
बिजे उत्तरा आदितवारा वऱ्हाड पडतील फशी ।
वर्जवार तिथी नक्षत्रांवर लग्नें देता कशीं ॥ १ ॥

सोमवारी चौथ स्वाती तरी लग्न देऊं नका ।
प्रहायची कल्पना दोहीं घरीं बसेल कीं हो धका ।
मंगळवारी षष्ठी अनुराधा वारस तिथ घेऊं नका ।
विहीण किंवा व्याही मरतिल पुढें मारतिल हका ।
शुक्रवारीं अनुराधा वारस विघ्न करविली पाशीं ।
वर्जवार तिथी नक्षत्रांवर लग्न देतां कशीं ॥ २ ॥

सोमवारीं पुष्य पुनर्वसु पाडवा येईल ।
अनर्थ होईल पुढें नवरीचा बाप विष खाईल ।
तिजेस पडती तीन उत्तरा वरा नाश होईल ।
मूळ शनिवार किंवा रविवार उभयतांस खाईल ।
भरणी रोहिणी मंगळवारीं काळ उभयतां पाशीं ।
वजवार तिथि नक्षत्रांवर लग्नें देतां कशी ॥ ३ ॥

घातवार घातचंद्र टाकून निष्पंचक उत्तरा ।
त्यापरि लग्नें द्या सांभाळून तरिच ज्योतिषी खरा ।
कवि हैबती म्हणे पंचांग पाहुनी गणती करा ।
तंत्र मंत्र तांत्रिक याची ओळख कांहीं धरा ।
आळस करूं नये शाहिरा का डोळे झाकशी ।
वर्जवार तिथी नक्षत्रांवर लग्नें देतां कशी ॥ ४ ॥

*　　*

८

## लग्नाविषयीं

(लावणी)

भाडळीचा तो होरा ऐका लक्ष्य देऊन अंतरीं ॥
ज्योतिष ऐका तुम्ही सत्वरीं ॥ ध्रु० ॥

पूर्ण ज्योतिषी असेल त्यानें पाहावी वेळ घटिका ॥
करूं नये आळस पडेल तो फिका ॥

दिवस रात्रीं आठ वेळेचा विचार करीं तूं निका ॥
पाहूं नका काळाच्या कौतुका ॥

जरा मनामधिं शांत होऊनी तिथि नक्षत्रादिका ॥
नाहीं तर कार्या बसेल तो धका ॥

वार योग कर्णाचा मुहूर्त ध्यानीं आणी चालका ॥
पहा जरा कार्या लागेल बुका ॥

सत्य बोलावें म्हणे हैबती ज्योतिषाची टिका ॥
सहदेव सांगे भाडळी आका ॥

चंद्रबळ पाहुनी कार्या जाई तूं सत्वरी ॥
ज्योतिष ऐका तुम्ही सत्वरीं ॥ १ ॥

REFBK-0008916

अमृतसिद्धि योग कैसा समजेल हें चित्तीं
सहदेवासी सांगे भाडळी त्याची प्रचीती ।। ध्रु० ।।

रविवारीं तो हस्त आल्यावर कार्य होय पूर्ते ।
रामानें उचलिलें धनुष्य अंगुष्टमात्रें ।।

सोमवारीं मृग हा असतां सर्वही कार्याला ।
बिभीषणासी राज्यीं स्थापिला चिरंजीव केला ।।

मंगळवारीं अश्विनीवरती कार्या निघाले ।
पार्थ उद्धवा ज्ञान दिधलें त्यांसी उद्धरिलें ।।

बुधवारीं अनुराधा सुखाच्या असती निश्चितीं ।
प्रल्हादानें नाम स्मरिलें एकाग्र चित्तीं ।।

गुरवारचा पुष्य बरवा ऐका हो ख्याती ।
पांडवांनीं यज्ञ केला हरि झाला साथी ।।

शुक्रवार रेवती स्थाइक कार्या तूं घेई ।
ध्रुवबाळानें तप मांडिलें अढळपदीं जाई ।।

शनिवारीं रोहिणी कुंतिला ऐरावती मिळाला ।
वाण देऊन शेजीचें भीमानें स्वर्गी पोचविला ।
यांतुन पुष्य टाळीं विवाहीं सांगतसें तुजला ।
भाडळीचें सांगणें हैबती मुखानें वदला ।।

ऐसा योग उत्तम पाहुनी गमनादिक करिती ।
सहदेवासी सांगे भाडळी त्याची प्रचीती ।।

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ........ विः